१

# आनंदलहरी

## दैवी संपदा

श्री. शशिकांत दि. नागले.

२३-६-९४

जालना

।। श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ।।

# दैवी संपदा

## प.पू.श्री.दत्तमहाराजांची प्रवचने

संकलन

**श्री.गोपाळ गोडसे**

संपादन

**डॉ.सौ.माधुरी पणशीकर**

प्रकाशक

**श्री भगवती प्रकाशन**

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिवस**
२० एप्रिल १९९४
बुधवार, चैत्र शु. नवमी,
रामनवमी, शके १९१६.

**मुखपृष्ठ**
आमोद दामले

**मुद्रक**
के. जोशी आणि कंपनी
१७४५/२, सदाशिव पेठ,
पुणे-३०.


**प्रकाशक**
श्री भगवती प्रकाशन
६/१, साई विहार
कर्वेनगर, पुणे-५२.

**किंमत रु.३०/-**


**।। श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ।।**

अनुक्रम

| | |
|---|---|
| **देवाजवळ काय मागावे** | **१** |
| **देवाजवळ काय मागावे** | **११** |
| **उपासनापथ** | **१८** |
| **दैवी संपदा आणि उपासना** | **२८** |
| **सद्‌गुरु : स्वरुप आणि भक्ती** | **५५** |



॥ गुरो तुझी ही पदवारीधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ॥
॥ सदैव माझे मन वाणी शुद्ध । करो तुझे नाम पवित्र सिद्ध ॥





।। श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे ...

राष्ट्रीय पंडित विद्यावाचस्पती प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या प्रवचनांचे, **दैवी संपदा** हे पुस्तक रामनवमीला- श्रीभगवती प्रकाशना तर्फे प्रसिध्द करतांना आम्हाला विशेष आनंद होतो आहे. त्यात दुग्धशर्करा योग असा की रामनवमी ही प. पू. सौ. ताईमहाराज, जालना, यांची जन्मतिथी आहे. सर्व भारतीयांच्या सश्रध्द मनाला श्रीरामचंद्रांची जन्मतिथी किती पवित्र वाटते हे काही नव्याने सांगायला नको. हे सर्व सुयोग आज दाटून आले आहेत. प. पू. महाराजांच्या रौद्री शांतीच्या निमित्ताने त्यांची प्रवचने लोकांसमोर ठेऊन प्रकाशनाच्या क्षेत्रात पहिलेच पाऊल श्री भगवती प्रकाशनाने टाकले आहे. प. पू. महाराजांची प्रवचन संपदा विपुल असून यथावकाश ते सर्व ज्ञानभांडार लोकांसाठी खुले करण्याचा ह्या प्रकाशनाचा मानस आहे.

प.पू. महाराजांचा जन्म श्री क्षेत्र वाडी येथे माघ वद्य षष्ठी शके १८३१ रोजी झाला. कृष्णामाईच्या हिरव्यागार तीरांच्या सहवासात, वेदशास्त्रसंपन्न दीक्षित स्वामीमहाराजांच्या साक्षेपी नजरेखाली, औरवाडसारख्या छोट्याश्या गावात महाराजांनी शिक्षणाचे पहिले धडे गिरवले. पुढे योगिराज गुळवणी महाराजांच्या सानिध्यात भरभरून फुललेल्या दत्तमहाराजांना, दीक्षित स्वामीमहाराजांनी केलेले खोलवरचे संस्कार सदैव पूजनीय वाटले. पुण्याला सौ. आईसाहेबांबरोबर तृप्त सहजीवन अनुभवत, कुलधर्म- कुलाचारांचे निष्ठेने पालन करत परिणत-प्रज्ञेचे महाराज श्री वासुदेव निवासाचे उत्तराधिकारी झाले. महाराजांचा लोकसंग्रह विलक्षण आहे. निरनिराळ्या आर्थिक, सामाजिक स्तरातली माणसे त्यांना भेटायला येतात.जन्मभर विवेकाचा दीप हातात धरून, 'कारुण्यामाजी पाऊले लपवीत' चाललेल्या ह्या महामानवाची उत्तुंगता,

आमच्यासारख्या सरपटणाऱ्या जीवांना कशी कळावी ? महाराजांसारख्या 'हे विश्वची माझे घर' अशा जाणीवेने वावरणाऱ्या, अनुभवसंपन्न संतांच्या सहवासात आपल्या क्षुद्रतेच्या जाणीवेने जीव इवलासा होतो. तरी त्या माऊलीच्या घराकडे पावले परत परत वळतात. त्यांच्या दर्शनाला डोळे अधीर होतात, आणि त्यांचा शब्द ऐकायला अवघ्या शरीराला श्रवणेंद्रिये फुटतात.

प्रस्तुत पुस्तकातली प्रवचने साधकाला सुयोग्य मार्गदर्शन करणारी आहेत, जाणकाराला अभ्यासाच्या नव्या दिशा दाखवणारी आहेत. ही प्रवचने वाचतांना जाणवते, ती, सर्व आयुष्य तत्वविचाराच्या चिंतनात व्यतीत केलेल्या महाराजांच्या बोलण्याला असलेली शाश्वत मूल्यविचारांची पक्की बैठक ! महाराज रसाळपणे कथा निवेदन करत असले तरी त्यांचे सारे लक्ष नैतिक परिणामांवर केंद्रित झालेले असते. विविध विचारांच्या आघाताने नैतिकदृष्ट्या विस्कळित होत चाललेल्या समाज प्रवाहाला संत महात्मे सुयोग्य वळण कसं सहजपणे देतात, ते ह्या प्रवचनातून जाणवते. उदा. बारा वर्षांच्या वनवासानंतर एक वर्ष अज्ञातवासात राहिलेल्या पांडवांना कसे शोधावे हा कौरवांपुढचा पेच सोडवताना भीष्माचार्य काय म्हणाले ते महाराज सांगतात, 'ज्या देशामध्ये लोकांची मनोवृत्ती धर्मानुकूल झालेली आहे, गुणग्राहक लोक आहेत, केवळ दोषांकडे पहाणारे लोक ज्या देशात नाहीत त्या देशात पांडव असतात.' पांडवांच्या सदाचरणी सच्छील वर्तणूकीविषयी असे भरभरून सांगताना, महाराज नकळत आपल्यासमोर उदात्त जीवनाचा एक आदर्श उभा करत असतात. गुणसंवर्धनाच्या आणि श्रध्दायुक्त जीवनाच्या दिशेने अंगुलिनिर्देश करत असतात. प्रल्हादजींची कथा तर महाराजांची विशेष आवडती आहे. प्रल्हादजींना देव प्रसन्न झाल्यावर, ते मागणे मागतात की, 'माझ्या मनात कोणतीच इच्छा उत्पन्न होऊ नये असा वर द्या.' यावर

महाराज भाष्य करतात, म्हणजे प्रल्हादजींची इतकी भूमिका तयार झाली होती. पण ही भूमिका तयार व्हायला अनेक जन्मांचा अभ्यास पाहिजे. सद्गुरुंची कृपा व्हायला पाहिजे. सामान्य माणसाच्या श्रध्दा स्थिर नसतात हे जाणून, त्या वृध्दिंगत होऊन, त्यांचे भावरूप परिणाम त्यांच्या जीवनाला मिळावे, म्हणून महाराज कथा भागातल्या महत्त्वाच्या भागांवर सविस्तर भाष्य करतात.

वास्तविक पाहता ते प्रवचनातून, आपल्याला आधीच माहित असलेली गोष्ट सांगतात. मग ती कधी द्रौपदीच्या थाळीची असते, कधी यक्षप्रश्नाची असते तर कधी त्रिपुरासुराच्या वधाची असते. पण ती कथा, नव्या अन्वयासह ते इतक्या परिणामकारक पध्दतीने मांडतात की जणू आपण ती पहिल्यांदाच ऐकत आहोत असे वाटत रहाते. द्रौपदीच्या थाळीला चिकटलेले तुलसीपत्र कृष्णाने खाल्ले आणि पांडवांची फजिती करायला आलेल्या दुर्वासादी ऋषीमुनींची पोटे भरगच्च भरून गेली, ही द्रौपदीच्या प्रेमावरची परिणती ठाऊक असूनही, आपण ती गोष्ट उत्कंठेने ऐकतो, इथे महाराजांचे कथन कौशल्य सहजपणे जाणवते. परतत्त्वाचे निरूपण केवळ सैध्दान्तिक पातळीवर करण्यापेक्षा कथामाध्यमातून केले तर त्याचा प्रभाव जनमानसावर अधिक पडतो म्हणून आपल्याकडे कथा कीर्तनाची परंपरा जन्माला आली. ह्या परंपरेला महाराजांनी समृध्द केले.

महाराजांच्या प्रवचनांचा आणखी एक विशेष असा की त्यात आध्यात्मिक आणि सामाजिक, अशा दोन्ही पातळ्यांवर विवेकनिष्ठ नीती कल्पनेची मांडणी झालेली दिसते. एकदा मनुष्याला देहच महत्वाचा वाटला की तो त्यासाठी सर्व प्रकारची सुखे ओरबाडत रहातो. आणि त्यातून सामाजिक विनाशाची वाट तयार करतो. हे स्पष्ट करताना महाराज म्हणतात, 'आपण कर्म करायचे आणि आपण सुखी व्हायचे. म्हणजे देहाला सुखी करायचे. पूर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा,

नीतीअनीतीचा कशाचा विचार नाही, संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. मग न्यायअन्याय काही पाहिले जात नाही. आणि अशी कर्मे होऊन जातात. एकाला असे कर्म करतांना पाहून दुसराही तसेच करतो. त्याला जर अशा वागण्याने सुख मिळते मग मीही तसेच का करू नये ? पण त्यामुळे सामुदायिक दुरिते तयार होतात. वैयक्तिक दुरिते तर आहेतच. त्यात आणखी सामुदायिक दुरिते तयार झाली की त्याचा एकदम परिणाम होतो. सत्तर हजार वस्तीचे हिरोशिमा नगर एक बॉम्ब पडल्यावर भस्मसात झाले की नाही ! सगळ्यांचे दुरित एकवटून आले. अशी दुरिते तयार झाली समाजात, राष्ट्रात की शेवटी विश्वाचे सुख नाहीसे होते.' इथे वैयक्तिक पातळीवरचे अधःपतन राष्ट्राला विनाशाच्या दिशेने कसे घेऊन जाते याचे दर्शन मार्मिकपणे घडवलेले दिसते.

महाराज अनेकवेळा सांगतात की सद्-वस्तू उत्कट भक्तीभावाने प्राप्त होते. महाराजांची भक्तीमार्गावर दृढ श्रध्दा आहे. इथे संतकवी सूरदासांची कथा आठवते. अंध सूरदासांना, एकदा, रात्री एके ठिकाणी भजनाला बोलावले. रात्री दोन अडीच पर्यंत भजन केले. सर्वत्र सामसूम झालेली त्यांच्या लक्षात आली आणि ते घरी जायला निघाले. सर्व जग झोपलेले होते, सूरदास एकटेच रस्त्याने चालू लागले. दिसत नसल्याने चालता चालता रस्ता चुकून ते रानात गेले. आजूबाजूला माणूसकाणूस कोणीच नव्हते. आणि सूरदासांचा एक पाय समोरच्या विहिरीत पडला. दुसराही पडणार होता इतक्यात एक चार पाच वर्षांच्या छोट्या मुलाने त्यांना बाजूला खेचले. सूरदास वाचले पण त्यांना आश्चर्य वाटले की इतक्या अपरात्री हा छोटा मुलगा कुठून आला? म्हणून त्यांनी विचारले, 'बाळा तुझे नाव काय?' 'कोणत्याही नावाने हाक मारा, त्यात काय एवढे? ' मुलगा उत्तरला. आणि सूरदासांच्या काठीचे टोक धरून चालूं लागला. घनदाट अंधारात विज लखलखून जावी तसे सूरदासांच्या मनात आले की हे निर्गुण परब्रह्मच सगुण रुपाने आले आहे. त्यांनी काठीच्या टोकाला असलेला छोटा हात पकडण्याचा प्रयत्न केला पण तो निसटून गेला. सूरदास त्याला शोधण्याची धडपड करू लागले. तेव्हा त्याच्या हास्याच्या लहरी त्यांच्या मनाला प्रसन्न करू लागल्या.

सूरदासांच्या भक्तीसाठी निराकाराला आकार घ्यावा लागला तसे अनेक जीवांना मार्गस्थ करण्यासाठी गुरूतत्वाने प.पू. महाराजांच्या रूपाने देह धारण केला. गंमत अशी होते की केवळ स्वतःपुरते जगणारे आम्ही आमच्या सामान्य जीवनव्यवहाराच्या फुटपट्ट्यांनी त्या गुरूतत्वाला मोजण्याचा केविलवाणा प्रयत्न करतो. अलौकिकाला लौकिक निकषांवर तोलत रहातो. कारण श्रुती आणि युक्तीच फक्त आमच्याजवळ असते, अनुभूती मात्र नसते.

या गुरूतत्वाजवळ अपरंपार माया, करुणा, वात्सल्य आहे आणि कुठल्याही कृतीचे कर्तृत्व स्वतःकडे न घेण्याचा विलक्षण मोठेपणाहि आहे. म्हणून कोणाचा दुरितक्षय व्हावा यासाठी, त्या व्यक्तीच्या नकळत, अखंड नंदादीप महाराजांकडून लावला जातो तर कुणासाठीतरी वाडीला महापूजा सांगितली जाते.

ज्यांच्या सर्व कामनांचा क्षय झाला आहे आणि आत्मानंदातच जे मग्न असतात अशा महाराजांकडे बघितल्यावर गीतेतला श्लोक आठवतो,

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः।
नर्यमो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ।।२:७१।।

अशा संतांच्या शब्दाला स्वानुभवाचे पाठबळ असल्याने त्यांचे शब्द परिणामकारक ठरतात. म्हणूनच ही प्रवचने आम्ही आपल्यासमोर चिंतनमननासाठी ठेवली आहेत.

ही प्रवचने उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. गोडसे यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे ह्या पुस्तकाच्या कार्याला प.पू. महाराजांचे

चिरंजीव श्री. अजित कवीश्वर आणि त्यांच्या पत्नी सौ. जयश्री अजित कवीश्वर ह्यांचे सहकार्य लाभले.

संगणकावर प्रवचने लिहण्याचे काम ह्या दोघांनी केले. त्यांची मी ऋणी आहे. आणि शेवटी माझ्या घरादाराने अनुकूलतेचा स्वर आळवल्यामुळे मला हे काम फार आनंदाने आणि उत्साहाने करता आले हेही इथे नमूद करते.

प.पू. महाराजांच्या रौद्रीशांतीनिमित्त त्यांना दीर्घ आयुष्य आणि आरोग्य लाभो ही परमेश्वराच्या चरणी प्रार्थना ! शेवटी, प.पू. महाराजांनी एका प्रवचनात म्हटले आहे, 'सद्‌गुरुमूर्ती अदृश्यरूप नाही, ईश्वराचेच ते एक रूप आहे. ईश्वरानेच सद्‌गुरूंचं रूप घेतलेले आहे आणि त्यारूपाने ईश्वराचे कार्य चाललेले आहे.' अशा सद्‌गुरुरूपी ईश्वराच्या चरणी प्रल्हादजींनी मागितलेले मागणे मागून, ही प्रस्तावना संपवते.

- डॉ. सौ. माधुरी पणशीकर
११, गुडविल बिल्डींग,
मनमाला टँक रोड,
माहीम,मुंबई-१६.

## देवाजवळ काय मागावे

।। श्री गुरुःशरणम् ।।
पापम् तापम् व्याधिमाधिं च दैन्यम् ।
भितीम् क्लेशम् त्वम् हराशुत्वदन्यम् ।
त्रातारम् नो वीक्षईशात्स्तजुर्ते ।
घोरात्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते ।

सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी भगवान दत्तात्रेयांची प्रार्थना केली आहे. सर्व जीवांनी देवाजवळ काय मागावे हे यात सुचविलेले आहे. जीवांना त्याची आवश्यकता आहे, असेच हे मागणे आहे. ज्याच्याजवळ मागायचे त्याचीही योग्यता मोठी आहे. म्हणून इतरांजवळ मागण्यापेक्षा ईश्वराजवळ मागायला हरकत नाही, आणि हे (वर सांगितलेले) मागावे असे महाराजांचे म्हणणे आहे. सकाम भक्ती आणि निष्काम भक्ती असे भक्तीचे प्रकार आहेत. प्रल्हादजींच्या सारख्या निष्काम भक्ताला नृसिंहांनी पुष्कळ सांगितले. 'काही तरी वर मागून घे बाबा'. त्यावर प्रल्हादजी म्हणाले, 'देवा मी तर अकाम आहे'. काहीही न मागणारा भक्त आहे. देवांनी फारच आग्रह केल्या नंतर प्रल्हादजींनी

‘माझ्या मनात कोणतीच इच्छा उत्पन्न होऊ नये हा वर द्या’ असे शेवटी मागून घेतले. म्हणजे प्रल्हादजींची इतकी भूमिका तयार झाली होती. अभ्यास होता. प्रत्यक्ष बाप जीवावर उठलेला असतानासुद्धा त्यांनी देवाजवळ कधीही काही मागितले नाही. ‘मला वाचवा’ असे म्हणले असते तर देवाने वाचविले असते. पण काही न मागतांच देवाने त्यांची इच्छा पूर्ण केली. म्हणजे जीवनाबद्दलसुध्दा आसक्ती नाहीये, असे फार मोठे भक्त होते. पण ही भूमिका व्हायला अनेक जन्मांचा अभ्यास पाहिजे, सद्‌गुरुंची कृपा पाहिजे. भगवंताची भक्ती घडण्याकरितां काहीतरी स्वास्थ्य पाहिजे, त्यासी हे मागणे मागितले आहे.

पापम्, तापम्, व्याधीम्

हे सर्व आपण दूर करा अशी प्रार्थना आहे.

‘पापम् हर’, पाप हे मूळ कारण आहे. दुःखं, जी आपल्याला भोगावी लागतात, त्याचे कारण आपल्याकडूनच घडलेली पापं ! दैवयोग आपण म्हणतो. सुखं दुःखं दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ पूर्वी आपल्या हातून घडलेली कर्मे. दैव आणि प्रयत्न वेगळे आहेत असे नाही. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म असे म्हणतात. आणि ते जे कर्म घडलेले आहे - पुण्य किंवा पाप - त्याचे फळ हे निश्चित मिळते. ईश्वरानेच त्या कर्माची शक्ती निर्माण केली आहे. किंवा कर्म करणाऱ्याच्या, ‘मी करतो आहे’. अशा अहंकारामुळेही कर्मात शक्ती निर्माण होते आहे. आणि त्याचे फळ हे निश्चित मिळते. तेव्हा दुःखाला कारण म्हणजे पाप.

ताप म्हणजेही दुःखच - आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक- असे तीन प्रकार त्या तापात, दुःखात आहेत. आध्यात्मिक दुःख म्हणजे शरीरामध्ये काहीतरी रोग उत्पन्न होणे, त्यामुळे निर्माण होणारी दुःखं किंवा मनाच्या विरूध्द जरी घडले तरी दुःखच आहे ते. ही दुःखं जायची असतील



तर शरीरामध्ये कधीही रोग उत्पन्न होता कामा नये. पण असे तर प्रपंचामध्ये होत नाही. इंद्रासहीत सर्वांनाही ही दुःखं / ताप आहेत. दैत्यांनी युध्द करायचे, देवांचे राज्य काढून घ्यायचे, देवांनी निर्वासित म्हणून स्वर्गातून निघून जायचे इत्यादी, पुष्कळ गोष्टी मनाच्या विरुध्द घडतातच आहेत.

शरीरामध्ये काहीच विकार उत्पन्न व्हायचा नाही म्हणजे आध्यात्मिक ताप (म्हणजे दुःख) नाही. पण शरीरामध्ये कधीही विकृती उत्पन्न न होणे हे कसे शक्य आहे? कफ, वात, पित्त यांनी शरीराचे साम्य बिघडते. साम्य म्हणजे आरोग्य आणि वैषम्य उत्पन्न झाले म्हणजे अनारोग्य. शरीर नेहमी आरोग्य संपन्न राहीले म्हणजे रोगामुळे (उत्पन्न) होणारा ताप दूर होतो. पण हे शक्य नाही.योगशास्त्रकारांनीसुद्धा ईश्वराची भक्ती करायला सांगितलेली आहे. योग म्हणजे प्रयत्न आहेत. प्रयत्नांनी सर्व काही मिळविता येते. अनेक सिद्धी त्यांनी सांगितल्या आहेत. मानसिक शक्तींचा विकास म्हणजे या सर्व सिध्दी आहेत. अभ्यासाने मानसिक शक्तींचा विकास करता येतो. पण त्यांनीसुध्दा ईश्वराची उपासना आवश्यक आहे, असे मान्य केले आहे. अभ्यास करून वज्रासारखे शरीर करणे वगैरे सिध्दी मिळवता येतात. पण तो अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय कसे चालणार? मध्येच विघ्ने येतात. ती दूर कशी करणार? त्याकरीता ईश्वराची उपासना आवश्यक आहे असे त्यांनीही मान्य केले आहे. शरीरामध्ये विकृती उत्पन्न होणे, आळस निर्माण होणे, नैराश्य येणे, काय उपयोग आहे साधना करुन, एखादा दिवस साधना नाही केली तर काय होणार आहे असा विचार येणे इत्यादि-असे जे प्रतिबंध निर्माण होतात, त्यामुळे साधनाभ्यास नियमाने आणि दीर्घकाळ होत नाही आणि अभ्यास नियमाने आणि निरंतर न झाल्याने मानसिक, शारीरिक आरोग्य राखता येत नाही. त्यामुळे ताप होतो. आध्यात्मिक दुःखं सर्वांनाच अपरिहार्य आहेत. ती दूर करावी अशी प्रार्थना प्रथम केली आहे. पाप, ताप, व्याधि,

आधि इत्यादी सात दोष ईश्वरानेच दूर करावेत. कारण तो या दोषांपासून अलिप्त आहे. त्यामुळे या दोषांनी जर्जर झालेल्या जीवांचे दोष तो दूर करतो म्हणून ही प्रार्थना प्रथम केली आहे- आमच्या हातून घडलेली जी काही पापे असतील, पूर्वीचे प्रतिबंधक असे जे दैव आहे ते आपण नाहीसे करावे.

'आशू हर' म्हणतात. आता त्याचे (पूर्व कर्माचे) फळ म्हणजे काय? कर्म तर होऊन गेलेलं आहे. ते हरण करायचे म्हणजे ज्यावेळेला त्याचे फळ मिळायला सुरुवात झाली आहे त्यावेळेला काही हरण होऊ शकत नाही. फळ देऊन ते मोकळे होणार. तुरुंगवासाची शिक्षा होण्यापूर्वी जर वकीलाने बचावाचा प्रयत्न केला तर अपराध्याला निर्दोषी ठरवता येऊ शकते. पण एकदा न्यायाधिशांनी निर्णय दिला, त्याप्रमाणे तो तुरुंगात जाऊन शिक्षा भोगायला लागल्यावर काय करणार? शिक्षा संपल्यावर बाहेर यायचे.

याप्रमाणे आता ताप सुरू झालेला आहे. पण पूर्वीचे संचित कर्म भोगणें सुरू होण्यापूर्वी ती तरी आपण दूर करा. फळ देण्याची शक्ती ईश्वरानेच कर्मामध्ये निर्माण केलेली आहे. आणि त्या पूर्वीच्या पाप कर्मामुळे दुःख/ताप हा सुरू झालेला आहे. आता ते दुःखरूपी (कर्माचे) फळ नाहीसे करायचे म्हणजे त्या कर्माची शक्तीच नाहीशी केल्यासारखे होणार ! पण त्या प्रारब्ध कर्माचीही शक्ती नाहीशी करा, अशी प्रार्थना यात दिसून येते.

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।
हरिकृपे त्याचा नाश आहे ।

हरीकृपेमध्ये अशी फार मोठी शक्ती आहे. जी केलेली कर्मं आहेत त्यांचा अजून विचार व्हायचा आहे. पण ती कर्मंही नाहीशी होऊ शकतात. ज्या कर्माचा विचार झालेला आहे. आणि त्याचे फळ भोगायला



सुरवात झालेली आहे, तेही नाहीसे होते. त्याकरता ती प्रार्थना केली आहे. ईश्वराची शक्ती अमर्याद आहे.

### व्याधिम्, आधिम् च दैन्यम्

ही सगळी पापकर्माची फळे आहेत. 'तापम् हर' यात पापाचाच अर्थ आहे. व्याधिम् म्हणजे रोग. व्याधीमुळे ताप होतो. पापकर्म भोगायला सुरवात झाल्यानंतर ज्या व्याधी होतात त्याही दूर करा.

आधिम् म्हणजे मानसिक व्यथा. मनाविरुद्ध घडल्याने निर्माण होणारे क्लेशदायक विचार मानसिक व्यथा निर्माण करतात. मनाविरुद्ध घडल्यानंतर तेच तेच विचार मनात येतात. आणि त्यांचे मनांत येणे आपण थांबवू शकत नाही. आणि त्यामुळे होणारा मनस्ताप आपण सहन करु शकत नाही.

दैन्यम् म्हणजे दारिद्र्य आणि मनाची अत्यंत निराशाजनक अवस्था की, ज्या अवस्थेत आपल्या हातून चांगले कांही घडत नाही. 'माझ्या हातून काय घडणार, नशिबच माझ्या विरूध्द आहे' असे म्हणून मनुष्य निराश होतो. ध्रुवासारखा प्रयत्नवादी काही निराश झाला नाही. आईने सांगितल्यावर लगेच त्याने वनाचा रस्ता धरला. इतक्या लहान वयातसुध्दा 'काय नशिबच आमचे असे आहे, राजेसाहेबांची आमच्यावर कृपाच नाही.' असे म्हणत तो बसला नाही. नारदांनी त्याच्या मनाची परीक्षा पाहिली. नारदांनी त्याला सांगितले की तुला सिंहासनावर बसवण्यासाठी मी राजाला सांगतो. पण ध्रुव निश्चयाने म्हणाला 'नाही मी येणार नाही. ईश्वराच्या कृपेने स्वतंत्र स्थान मला पाहिजे आहे म्हणून तप करण्यासाठी मी निघालो आहे.'

तेव्हा हे दैन्य जर मनात उत्पन्न झालं तर व्यवहारही होत नाही, परमार्थही होत नाही. तेही दैन्य मनातून दूर होऊन उत्साह निर्माण व्हायला पाहिजे.

ही सगळी पापाची फळं आहेत. अनेक प्रकारची भीती आहे. देवादिकांनासुध्दा भीती आहे. हातात सत्ता असतानाही ती टिकेल की नाही, ही भीती आहे. काय त्या सत्तेचा उपयोग? सुख कसं होणार? इंद्रादिक सर्वही जीवांना सुख प्रत्यक्ष उपभोगत असतानाही जर 'हे आपलं सुख जाणार तर नाही ना?' असे वाटले की संपल. तर ही अशी भीती नसणं हे दैवी प्रकृतीचे ( कृपेचे ) लक्षण आहे. 'भीतिम् हर' म्हणजे माझी मनःस्थिती निर्भय करा. भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती वर्णन केली आहे. त्यात 'अभय' हे प्रथम वर्णन केले आहे. निर्भय असणे, आजारी असतांना, पैसा नसताना, इतर कोणतीही अनुकूलता नसतानाही निर्भयता असणं म्हणजे उत्तम सात्विक दैवी प्रकृतीचे लक्षण आहे. ते मागणं यांत मागितले आहे.

क्लेश आणि ताप याचा एकच अर्थ आहे असे वाटते. पण क्लेश शब्दाचा अर्थच योगशास्त्रात थोडा निराळा केलेला आहे. पुण्याला सुध्दा वेदांत शास्त्राप्रमाणे पाप असच नांव आहे. बंधन होते आपल्याला. पूर्वीच्या पुण्यकर्माप्रमाणे सुख भोगायचे आहे आपल्याला. ध्रुवाने चार-पाच महिने खडतर तपश्चर्या केली आणि भगवंताच्या कृपेने त्याला सर्वोच्च स्थान मिळाले. आणि नंतर त्याला पश्चात्ताप झाला. 'काय मागितलं' म्हणाला मी! आता या सर्वोच्च स्थानात राहायचे म्हणजे इतर हेवा करणारच. पुण्य असेपर्यंत ईश्वराच्या कृपेने ते सुख भोगायला मिळेल म्हणा. पण द्वेष करणारी मंडळीही असणारच. विरोध झाला म्हणजे पुन्हा मनात शंका येणार हे सुख टिकेल की नाही? हे असे जे प्रतिबंध निर्माण होतात त्यामुळे सुख कसे लाभणार? शिवाय याच्यामध्ये अर्थ तरी काय आहे, म्हणाला, अपमान धुवून निघाला, सर्वोच्च स्थान मिळालं, पण त्यामुळे अहंकारही होण्याचा संभव आहे. इतरांपेक्षा मी मोठा आहे असे



वाटू लागणार. म्हणजे ईश्वराकडे लक्ष कमी होणार.

ज्याच्या कृपेने हे आपल्याला मिळाले त्याची आठवण राहील की नाही, हा एक पुन्हा प्रश्न आहे. असे अनेक दोष ध्रुवाच्या लक्षात आल्यावर त्याला पश्चात्ताप झाला. 'चुकलो' म्हणला, पण आता कांही इलाज नाही. पुण्य केले आहे आता त्याचे फळ भोगलेच पाहिजे.

म्हणून सकाम कर्म नको जे म्हणतात, ते या करता. पण तशी आपली एकदम भूमिका होत नाही. तर क्लेश म्हणजे मनात सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, द्वेष, अज्ञान हे सर्व दोषच आहेत. देह म्हणजे मी आहे ही गैरसमजूत, भ्रांती आहे. त्यामुळे ही पुढची सर्व दुःखं निर्माण होतात. देहात्मवादाने सर्व ज्ञानी पंडितही ग्रासले आहेत. ते पांडित्य दाखवतात. पण मी देह आहे ही बुध्दी काही जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे- मी म्हणजे शरीर आणि शरीराला उद्देशूनच तो हे सर्व समजतो. असा हा देहात्मवाद बळावला की, इतर कुठे लक्ष जात नाही. फार काय, घरातल्या माणसांकडेही लक्ष जात नाही. फार मोठा अभिमान उत्पन्न होतो- 'मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहिले पाहिजे.' ज्यांचे पालनपोषण आपण करतो त्यांच्याबद्दल सुद्धा अभिमान आहे. त्यांनी जरा आपल्या मनाविरुद्ध केले की, आपल्याला राग येतो. मग ईश्वर, संत इत्यादी बाजूलाच राहिले. हे स्वाभाविक क्लेश मानलेले आहेत. आणि यामुळे सगळी कर्मंही दोषी होतात. शुद्ध कर्म होत नाही. या सगळ्यांला, मी देह आहे ही भ्रांती, अज्ञान कारणीभूत आहे. देहापेक्षा मी निराळा आहे, मी अजरामर आहे. आत्मा अविनाशी आहे, असे अनेक देह मी धारण केलेले आहेत. देहाचा आणि माझा संबंध काही काळापुरता आहे, अशी जर भावना असली तर कोणी मानसन्मान केला तरी त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही. निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्व वाटणार नाही. पण

मुळामध्येच अविद्या, भ्रांती आहे, त्यालाच क्लेश मानले आहे. देहात्मवाद सुटल्याशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही. आपल्या कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. देहात्मवादापुढे दैववादाला काही थारा नाही. आपण आता कर्म करायचे आणि आपण सुखी व्हायचे म्हणजे देहाला सुखी करायचे. पूर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा, नीतीअनीतीचा कशाचा विचार नाही, संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. न्याय अन्याय काही पाहिले जात नाही. आणि अशी कर्मे होऊन जातात. एकाला असे कर्म करताना पाहून दुसराही तेच करतो. त्याला जर या अशा वागण्याने सुख मिळते मग मीही तसेच का करु नये? पण त्यामुळे सामुदायिक दुरितं तयार होतात. वैयक्तिक दुरिते तर आहेतच, त्यात आणखी सामुदायिक दुरिते तयार झाली की त्याचा एकदम परिणाम होतो. सत्तर हजार वस्तीचे हिरोशिमा शहर एक बॉम्ब पडल्यावर भस्मसात झाले की नाही ? सगळ्यांचे दुरित एकवटून आले. अशी दुरिते तयार झाली समाजात, राष्ट्रात की शेवटी विश्वात सुख नाहीसे होते म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

'दुरितांचे तिमिर जावो'

वैयक्तिक, सामुदायिक इत्यादि सर्वही दुरितांचा क्षय व्हायला पाहिजे. त्याशिवाय काही नाही. आणि त्याकरता ईश्वराची प्रार्थना व्हायला पाहिजे. ही दुरिते ज्या राग, द्वेष,मत्सर, शत्रुत्व इत्यादि दुर्गुणांमुळे घडतात ते दुर्गुण नष्ट झाले पाहिजेत. म्हणून ही प्रार्थना केली आहे.

आणि मग बुध्दी शुध्द व्हावी, निर्भय व्हावी म्हणून पुढची प्रार्थना केली आहे. ती तशी झाली, म्हणजे प्रपंच काय, परमार्थ काय सुखाचा होतो.

'त्वम हर आशु'

म्हणजे हे पाप, ताप, व्याधि इत्यादी लवकर आपण दूर करा.

२५



९४-८

'त्रातारम् नो वीक्ष ईशात्स्तजुर्ते'

म्हणजे आपल्याशिवाय दुसरा कोणीही त्राता नाहीये. हे सर्व दूर करण्याची शक्ती आपल्याशिवाय कोणाच्यातच नाही. लौकिक जगतातला राष्ट्रपती, सेनापती, पंतप्रधान इत्यादी कोणीही सर्वोच्च पदाचा अधिकारी असला तरी त्याच्याकडेही ही शक्ती नाही, चालू झालेलं दुःख दूर करणं हे डॉक्टरला सुध्दा शक्य नाहीये. औषध देईल तो, पण थांबावे लागेल त्याला. रोग कोणता आहे ते जाणणे, औषधातली शक्ती जाणणे हे ज्ञान डॉक्टरला आहे. पण त्यामुळे तात्काळ तो दुःख, वेदना दूर करू शकेल असे नाहीये.

श्रीगुरूचरित्रातल्या कथेत सांगितल्याप्रमाणे नुसत्या कृपादृष्टीने पाहिल्यावरच राजाचा रोग बरा झाला. (त्यापूर्वी केलेले सर्व मानवी प्रयत्न असफल ठरले होते,) अशा या शक्तीवर ज्यांचा विश्वास आहे, त्यांना या शक्तीचा महिमा पटलेला आहे. ते म्हणतात, आपण हे दुःख लवकर दूर करा. आपल्याशिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. आणि त्यांची तशी मनाची खात्री आहे.

भक्तांची सर्व दुःखं, पीडा दूर करण्याचे आपले सामर्थ्य आहे. म्हणून

घोरात् कष्टात्..........

ही नम्र प्रार्थना / भावना या स्त्रोत्रामध्ये केलेली आहे. या एकाच जन्मात नव्हे तर अनेक जन्मांमध्ये या सर्व गोष्टी आपल्याला भोगाव्या लागणार आहेत. पशुच्या योनीत गेल्यावर चाबकाचे फटके खाल्ले तरी चालायचे. कारण त्यावेळी कांही जाणच नाहीये. हे दुःख आहे अशी कल्पनाच नाहीये. पण मनुष्य किंवा देव योनीत आल्यावर, विचारशक्ती प्राप्त झाल्यावर, हे सर्व दुःख घालवणं आपल्याला शक्य नाही, हे जाणवते. यज्ञयाग तीर्थ-यात्रा इत्यादि सारखी पुण्यकर्मे करून

20

पाप जातं. पण ती पुण्यकर्मे जर मध्येच बंद पडली तर काय करायचे? हाही प्रश्न आहे.

साधना सुरू झाल्यानंतर साधनेत जी विघ्ने येतील, त्यापासून सर्व बाजूंनी आमचे संरक्षण करा, अशी प्रार्थना केली आहे. त्यातूनही साधना पूर्ण झाली व तिचे फल मिळाले तर 'मी हे केले' असा अहंकार उत्पन्न होतो. ईश्वर बाजूलाच राहतो. पहिल्यापासून शेवटपर्यंत जीवाची बुध्दी निर्दोष ठेवणारा, फळ मिळाल्यानंतरही त्याचा अभिमान उत्पन्न न होऊ देणारा आपल्याशिवाय कोणीही नाही. खऱ्या भगवत् भक्तांनीच हे जाणलेले आहे. त्यांच्याजवळ हे ज्ञान आहे. भगवंताच्या शक्तीची जाणीव आहे. म्हणून त्यांना कधीही अहंकार उत्पन्न होत नाही.

'अहंकाराचा वारा न लागे
माझिया विष्णू दासा'

नामदेवांनी ही प्रार्थना मुद्दाम केलेली आहे. की, भाविक भक्तांना अहंकाराचा वारा कधी लागू देऊ नका. नाहीतर अहंकारामुळे केलेली भक्ती, साधना फुकट जाते. व्यवहारात समजले जाणारे सत्तेचे, संपत्तीचे, कीर्तीचे, सन्मानाचे जे सुख समजले जाते ते तात्कालिक आहे. किंवा असे सुख असताना तशाच प्रकारचे अधिक सुख असलेला माणूस बघितला की पुन्हा वैषम्याचे दुःख आहे. प्रांताचा मंत्री झाल्यावर, केंद्राचा मंत्री कधी होईन अशी इच्छा असतेच. त्यासाठी पक्ष बदलायची सुध्दा तयारी आहे. अशा सगळ्या वासना नाहीशा करणं, आहे त्या परिस्थितीत सुख मानणं, मन शांत ठेवणं हे सर्व ईश्वराच्या कृपेने जमू शकते.

ह्या सर्व भावना लक्षात घेऊन महाराजांनी ही प्रार्थना केली आहे. पाचच श्लोक आहेत. पण फार महत्वाचे श्लोक आहेत. रोज त्याचे पण केले पाहिजे. त्यातल्या त्यात हा श्लोक फारच महत्वाचा आहे. जपाला फार चांगला मंत्र आहे.

|| अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ||



१६-८ दुसरे प्रकरण

## देवाजवळ काय मागावे

|| श्री गुरुःशरणम् ||

धर्मे प्रीतिं सन्मतिम् देवभक्तिम्
सत्संगाप्तिम् देही भुक्तिं च मुक्तिम् ।
भावासक्तिम् चाखिलानंद मूर्ते
घोरात्कष्टादुध्दरास्तानमस्ते ||

ईश्वराजवळ काय मागावे हे ह्या श्लोकात महाराजांनी सुचविले आहे, आणि ईश्वरच तो देऊ शकतो. यांत 'धर्मे प्रीतिम्' ही पहिली मागणी त्यांनी मागितली आहे. धर्माबद्दल प्रेम असावे. आपला जो काही आचार विचार आहे तो प्रेमाने आपण केला पाहिजे. लोकांना दाखवण्याकरतां किंवा लोकांनी चांगल म्हणावं म्हणून करायचा नाही. धर्मराज धर्माचा आदर्श म्हणून प्रसिध्द होते. धर्माचरणाचे फळ मिळो अथवा न मिळो, पण जसे ईश्वराने सांगितले आहे त्याप्रमाणे वागायचे.

बारा वर्षे वनांत व एक वर्ष अज्ञातवासात राहायचं कबूल केलं त्यांनी. पराजय झाला होता त्यांचा. त्याप्रमाणे वनांत राहायला गेले, म्हणजे सत्य आपण जे कबूल केले आहे ते शेवटपर्यंत पाळले पाहिजे. असे धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनात ठेवून धर्माचरण केले म्हणून ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली. श्रीकृष्णांनीसुध्दा पांडवांचा पक्ष घेण्याचे कारण हेच आहे. पांडव हे धर्मशील होते.

धर्मराजांची एक गोष्ट महाभारतात दिलेली आहे. धर्मराजांना तहान लागली म्हणून भीम पाणी आणायला गेला. मोठा तलाव होता. त्याला पण तहान लागली. आणि तो पाणी पिणार इतक्यात समोर एक मोठा धिप्पाड पुरुष आला. तो म्हणाला, 'हा तलाव माझा आहे. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि पाणी पी.' भीमाने ऐकले नाही त्याचे. तो पाणी पिताच गतप्राण होऊन गेला. त्यानंतर अर्जुन, नकुल, सहदेवांचीही तीच अवस्था झाली. नंतर धर्मराजांनी आल्यावर जेव्हा आपली चारही भावंडे मरून पडल्याचे पाहिले तेव्हा त्यांना वाईट वाटले. यक्ष पुरुषाने काय झाले ते सांगून त्यालाही तेच प्रश्न विचारले. चारही बंधू मरून पडले असतानाही, धर्मराजांनी मन शांत ठेवून सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. यक्षप्रश्न म्हणून एक प्रकरणच महाभारतात आहे. यक्ष म्हणजे साक्षात यमदेवच होते. उत्तरे ऐकून समाधान झाल्यावर ते म्हणाले, 'माझ्या सर्व प्रश्नांची तू बरोबर उत्तरे दिलीस, म्हणून मी प्रसन्न झालो आहे. आता या चौघांपैकी कोणत्या तरी एका भावाला मी जिवंत करीन. कोणाला करु?'

धर्मराजांनी नकुलाला जिवंत करायला सांगितले. यमराज म्हणाले, 'नकुलाचा काय उपयोग होणार तुला? लहान मुलगा आहे तो ! भीम किंवा अर्जुन जिवंत झाला तर तुझ्या उपयोगी पडेल. तुला पुढे राज्य मिळवायचे आहे, तर नकुलाला जिवंत करा असे का म्हणतोस?'

धर्मराज म्हणाले 'मला कुंती आणि माद्री अशा दोन माता



आहेत. कुंतीचा मी मुलगा जिवंत आहे. त्याप्रमाणे माद्रीचा मुलगा नकुल जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल, म्हणून त्याला जिवंत करा.'

धर्माने वागायचे हा नियम. कोणत्या भावाचा उपयोग होईल आणि कोणत्या भावाचा नाही हा व्यावहारिक विचार धर्मराजांनी न केल्याने यमदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी चौघांनाही जिवंत केले. अशी मोठी धर्मनिष्ठा ! धर्माबद्दल अत्यंत प्रेम ! म्हणून महाराजांनी देवाजवळ हे पहिले मागणे मागितले आहे.

घोरात्कष्टात् च्या शेवटच्या श्लोकामध्ये महाराजांची 'धर्मे प्रितीम् .....' ही प्रार्थना आहे. 'धर्मे प्रितीम्' हे एक प्रथम उपादेय आहे. धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनात उत्पन्न होऊन, प्रेमपूर्वक धर्माचे आचरण होणे म्हणजे त्याचे फळ शुध्द बुध्दीरुपाने मिळते.

सन्मतिम् या शब्दाने दुसरे उपादेय मागितले आहे. धर्म, प्रेम आणि सन्मती! धर्म, प्रेमही सन्मतिच आहे. तरीसुध्दा आरंभाचे आहे ते. त्याचे फळ म्हणजे त्या बुध्दीचे जे काही शुध्दीकरण चालू आहे. जास्ती जास्ती आणखी बुध्दी चांगली होत जावी हे एक उपादेय आहे.

त्याच प्रमाणे 'देव भक्तीम् देही'। अंतःकरणामध्ये भक्ती जी आहे ती उत्पन्न व्हावी हे मागणे देवाकडेच मागावे लागते. जीवाच्या प्रयत्नाने हे साध्य नाहीये.

धर्मेप्रितीम्, सन्मतिम् आणि देव भक्ती उत्पन्न होणं याच्याकरता 'सत्संगाप्तिम्' पाहिजे. संतांची संगती आम्हाला मिळावी. संत हे व्यक्त अवस्थेमध्ये असेपर्यंत ज्यांना संगती झाली, त्यांना त्यांच्या सुकृतानुसार वरील सर्व उपादेय वस्तूंचा लाभ होतो. पण कदाचित अव्यक्त अवस्थेमध्ये जरी संत असले तरीसुध्दा त्यांच्या तपाचा प्रभाव असा आहे. त्यांचे स्थानही अत्यंत पवित्र होते. ते स्थानही संतस्वरुप होऊन जाते. त्यामुळे त्या स्थानाच्या दर्शनाने, त्या स्थानात निवास करण्याने, श्रध्देने या सर्वही

उपादेय वस्तूंचा लाभ होतो. म्हणून 'सत्संगाप्तिम् देही' असे मागणे मुद्दाम मागितले आहे.

आणि 'भुक्तिंच मुक्तिं। ' भुक्ति म्हणजे भोग आणि संसारही मागितलेला आहे. कारण संसार दूर करा असे देवाजवळ मागायचे म्हणजे तितका अधिकार पाहिजे. संसार नको असे आपाततः जे म्हटले जाते परंतु संसार सोडायची खरी जी इच्छा आहे ती अंतःकरणामध्ये उत्पन्न होत नाही. रजकाला श्रीपादांच्या जवळ राहून श्रीपादांची संगती घडलेली आहे. कुठपर्यंत? यवनराजाचे ऐश्वर्य पाहिले नाही, तोपर्यंत, श्रीपादवल्लभांची संगती असावी असे वाटत होते त्याला. परंतु त्या यवनराज़ाचे ऐश्वर्य पाहून अंतःकरणामध्ये असणाऱ्या वासना प्रबल झालेल्या आहेत आणि श्रीपादवल्लभांच्या सान्निध्यात असतानासुध्दा त्या यवनाच्या वैभवाचे चिंतन चालू आहे. त्यापेक्षा देवाजवळच मागावे म्हणतात महाराज. मागून घ्या देवाजवळ. भोग नुसत्या तपाने मिळेल. नाही असे नाही. परंतु तपाने मिळालेल्या भोगामुळे अहंकारही उत्पन्न होतो. भोग हा उपादेय आहे. अर्थात कोणता भोग उपादेय आहे तर ईश्वराजवळ जर मागून घेतला, शुध्दबुध्दीने देवा माझ्या वासना काही जात नाहीत मला भुक्ती पाहिजे. तर ती भुक्तीसुध्दा त्याला त्याच्यातून मुक्ती देणारी होते. सुदामजींनी मागितले नाही, त्यांच्या पत्नीने मागितले. परंतु तेही त्यांना गोपालकृष्णांनी दिलेले आहे. पण त्या भोगात असतानासुध्दा गोपालकृष्णांचे अखंड चिंतन आहे. हे देवाचे देणे आहे ही भावना आहे. अहंकारादिक विकार उत्पन्न झालेले नाहीत. म्हणून भुक्तिंच देहि आणि मुक्तिं देही अस महाराज म्हणताहेत.

त्या मुक्तीच्याही पुढचे मागणे म्हणजे भावासक्ती. अंतःकरणात नितांत प्रेम उत्पन्न व्हावे. भक्तीपेक्षाही अत्यंत श्रेष्ठ उपादेय वस्तू भावासक्ती मानली आहे.ही भावासक्ती जर अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली



तर सर्वही कल्याण होतं. मुक्ती आली काय आणि गेली काय. तेव्हा भावासक्ती आम्हाला मिळावी असे शेवटी महाराजांनी मागितलेलं आहे.

नवविधा भक्ती ही अपरा भक्ती आहे. ती साधनात्मक आहे आणि साध्य जी आहे ती परा भक्ती आहे. या भक्तीमुळे सर्वही क्लेश दूर होताहेत. संसारातून मुक्ती मिळते. सर्वही कष्टांचे निवारण होते आहे. तर या परा भक्ती मध्ये भावासक्ती हे श्रेष्ठ उपादेय म्हणून सांगितलेले आहे. हेय आणि उपादेय वैयक्तिक स्वार्थाकरता मागितलेले नाही. परंतु सर्व संत हितरत असतात म्हणून जगाचे कल्याण होते. याप्रमाणे सदगुरु महाराजांनी हेयोपादेय विवेक मांडलेला आहे. तीच प्रार्थना आपण करायची आहे.

त्यानंतर सन्मतिम्, उत्तम बुध्दी पाहिजे. भीम, अर्जुन इत्यादी भावंडांना कौरवांनी दिलेला त्रास पसंत नव्हता. कौरवांबरोबर युध्द करून आपण राज्य घेऊ, असे ते म्हणत. धर्मराज वावगे कधीही वागत नसत. ही धर्मबुध्दीही त्यांना ईश्वराच्या कृपेनेच मिळाली होती. बाकीचे पांडव म्हणत, काय तुमच्या धर्माचरणाचा उपयोग? अधर्माने वागणारे कौरव राजे झाले. तुम्ही धर्माने वागून राज्य घालविले. तुम्हाला वनवास मिळाला. पण शेवटी धर्मराजांच्या धर्मबुध्दीचा सर्वांवर परिणाम झाला व ते धर्मराजांच्या इच्छेला मान देऊ लागले.

'सन्मतिम्' हे मागणे देवाजवळ मागितले आहे. आपण प्रयत्न करून तशी सन्मती होईलच असे नाही. ईश्वरकृपेनेच शुध्द न्यायाने जाण्याची बुध्दी मिळते.

तिसरे म्हणजे 'देवभक्तिम्' ईश्वराची भक्तीही ईश्वराजवळच मागितली आहे. आपल्या प्रयत्नांनी आपण भक्ती, प्रेम करू म्हटले तर होत नाही, आणि झालच तर त्याला व्यापारी स्वरूप येतं. रावणाने, हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली. देव प्रसन्न झाले. वर दिला. परंतु

देवाबद्दल भक्ती, प्रेम नसल्याने आपले काम झाल्यावर त्यांनी तपश्चर्या वगैरे सर्व सोडून दिले. स्वतःचे असे काही दिले नाही, अशी त्यांची बुध्दी होती. ही खरी भक्ती नाही. म्हणून ईश्वराजवळ त्याची भक्ती मागावी लागते. तरच उत्तम बुध्दी, प्रेम आणि भक्ती मिळते.

चौथी मागणी आहे 'सत्संगाप्तिम्' संतांची संगती घडावी. ज्यांच्या जवळ सद्‌बुध्दी आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ती करतात त्यांची संगती धरली की, आपोआप सर्व दैवी कृपा मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरुषांची संगती घडून येते. मार्गदर्शन होते आणि त्याप्रमाणे वागण्याची बुध्दी होते. म्हणून आम्हाला नेहमी सत्संग घडावा हे मागणे मागितले आहे.

आणि शेवटी 'देही भुक्तिंच मुक्तीम्'। भुक्ती म्हणजे संसार. संसारही मागा म्हणाले. हरकत नाही पण देवाजवळ मागा. मुक्ती तर हवीच आहे. सर्व दुःखांची निवृत्ती हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मागायचा. परंतु त्यापूर्वी आपले मन जे विषयभोगांकडे जात असते त्यासाठी विषयभोगही मागायला हरकत नाही. पण देवाजवळ मागा. अढळपद मिळविण्यासाठी ध्रुवाने उग्र तपश्चर्या करून ते पद प्राप्त करून घेतले आणि देवाच्याच कृपेने त्यातून तो सुटला.

आधी जरी संसाराची वासना उत्पन्न झाली आणि त्यासाठी देवाकडे मागणी केली तर त्याच्या कृपेने ती पूर्ण होते. हळूहळू वासना कमी होतात. ही सुध्दा ईश्वराचीच कृपा आहे. ती व्हावी म्हणून महाराजांनी मुद्दाम या स्तोत्रामध्ये 'भुक्ती' हेही मागणे देवाजवळ मागून घेण्यास हरकत नाही, असे सांगितले आहे.

आणि मुक्ती तर घ्यायचीच आहे मागून. ती ईश्वराशिवाय दुसरे कोणीही देऊ शकत नाही. सर्वही दुःखं कायमची जाणं याला मोक्ष म्हणतात. आमची व्याधीरूपी दुःखं औषधाने जरी बरी झाली, तरी ती



पुन्हा कधीही होणार नाहीत असे सांगता येत नाही. पुढे केव्हाही दुःख उत्पन्न न होणे, याचे नाव मुक्ती. आणि केव्हाही दुःख उत्पन्न होणार नाही असे हवे असेल, तर जन्म कायमचा बंद झाला पाहिजे. देहाचा संबंध सुटला पाहिजे. देह म्हटला की, दुःखं आलीच. बरं देहाचा संबंध सुटायचा म्हणजे कर्म संपली पाहिजेत. आपल्या कर्माचे फळ म्हणून देहाचा संबंध, म्हणजे जन्म येतो. याकरता सर्व पाप-पुण्य कर्माचा ईश्वरकृपेने क्षय झाला म्हणजे जन्म, मृत्यू व दुःख कायमची संपली. ही अवस्था अनेक जन्मानंतर मिळते. अनेक जन्म साधना करून, ईश्वराची कृपा संपादन करायची. ईश्वराचे दर्शन, आत्मज्ञान झाले की, सर्व कर्मांचा क्षय होतो. पण तेही देवानेच द्यावयाचे आहे.

आणि सर्वात शेवटी 'भावासक्तींम्' हे मागणे मागितले आहे. भाव म्हणजे प्रेम. ते अधिकाधिक वाढत जावे हीही प्रार्थना केली आहे. पण 'भावासक्तीं' म्हणून स्वतंत्र मागणे मागितले त्यांनी. श्रीगुरूचरित्रातल्या चाळीसाव्या अध्यायात जी कथा सांगितली आहे, त्यात आपल्याला भावासक्तींचे दर्शन घडते. ही भावासक्तीसुध्दा त्याच्याच कृपेने मिळते.म्हणून या सातही गोष्टी ईश्वराने आपल्याला दान कराव्यात म्हणून ही प्रार्थना (स्तोत्र) केली आहे.

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

२०-८-१७ श्रीगुरुचरित्रातल्या ४० व्या अध्यायातील कथा

२१-८-१७ — सदर दुसरा भाग

प्रवचन लिसरे

दि. २२-८-९८

## उपासनापथ

।। श्रीगुरुः शरणम् ।।

त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी भगवान शंकरांनी त्रिपुर राक्षसाचा वध केला. दैत्यांनी तपश्चर्या करून तीन पुरे मागून घेतली. तीन पुरे म्हणजे तीन विमाने त्यांना करून दिली. एकाच बाणाने जर तीनही पुरांचा नाश झाला तर त्यांचा नाश होणार होता. अशी काही योजना त्यांनी केली होती. त्या विमानामध्ये अमृतकुंड त्यांनी केले होते. युध्दामध्ये नाश पावलेल्या दैत्यांना ते तिथे आणून अमृत पाजून जिवंत करीत. त्यामुळे त्यांची शक्ती बरीच वाढली होती. विष्णूंनी गायीचे, ब्रम्हदेवांनी



वासराचे रूप घेतले आणि त्या त्रिपुरात जाऊन अमृतकुंडातील सर्व अमृत त्यांनी पिऊन टाकले. मेलेल्या दैत्यांना पुन्हा जिवंत करायची शक्ती त्यामुळे कमी झाली. दैत्यांची माहिती झाली. हा काय प्रकार आहे हे दैत्यांना कळेना. एकाच बाणाने तीनही (पुरांचा) विमानांचा नाश व्हावा अशी वर योजना देवांनी केली होती.

असुरही तपश्चर्या करून आपली शक्ती वाढविणारे आहेत. शास्त्रीय मार्गावर विश्वास असो अगर नसो पण तपश्चर्या करून तात्पुरता संयम पाळून आपले बल ते वाढवितात. परंतु त्यांच्या तपाचा उद्देश केवळ स्वतः सुखी होणे एवढाच असतो. अर्थ आणि काम हे दोन सुखाचे पुरुषार्थ मानले गेले आहेत. पुष्कळ अर्थ आणि विषयभोग मिळावा या सार्वत्रिक वासना आहेत. देवसुध्दा या वासनेतून सुटले नाहीत.

ईश्वराने निर्माण केलेल्या स्वर्गलोकात सुखाची साधने पुष्कळ आहेत. शास्त्र, प्रमाण पाहून आपल्याला त्याबद्दल समजते. ऋषिमंडळी वगैरे सर्व लोकात फिरून प्रत्यक्ष पाहू शकतात. साधे हिमालयात चढले तर आपल्याला दम लागतो. तिथले हवामान सोसवेल की नाही याचा भरवसा नाही. पांडव तीर्थयात्रेला निघाल्यावर रोमळ नावाचे ऋषी त्यांच्या बरोबर होते. हिमालयात एका विशिष्ट प्रदेशात ती मंडळी येऊन पोहोचल्यावर त्या ऋषींनी सांगितले की आता यापुढे तुम्ही काही येऊ शकणार नाही, माझा मी जातो. आणि ते आकाश मार्गाने पुढे गेले. भीम म्हणाला, पुढे जायला काय हरकत आहे? आणि तो पुढे निघाला एवढ्यात वारा सुटला. कुठून तरी मार्गात मोठेमोठे दगड येऊन पडू लागले, आणि त्याला पुढे जाता आले नाही.

तेव्हा स्वर्गामध्ये पुष्कळ सुखाची साधने उपलब्ध असली तरी मानसिक दुःखंही आहेतच. कारण प्रत्येकाच्या पुण्याप्रमाणे सुखभोग कमी अधिक प्रमाणांत मिळणार. विषमतेमुळे मानसिक दुःख होते. आपल्याला

पगार कमी व दुसऱ्याला जास्ती, हे नुसते पाहूनसुध्दा दुःख होते आपल्याला. पण ही विषमता टाळता येत नाही ना ! ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे सर्व मिळत असंतं. तेव्हा इहलोकाप्रमाणे स्वर्गलोकातही विषमता आहे. पण सुखाची सर्व साधने तिथे असल्याने आकर्षित होऊन जीव तिथे जातात, जाण्याकरता शास्त्राप्रमाणे प्रयत्न करतात.

त्याचप्रमाणे दैत्यही निरनिराळ्या विद्येच्या सहाय्याने स्वतःच्या सुखासाठी तपश्चर्या / प्रयत्न करतात. आपण आपल्याला अनुकूल बनणे एवढच त्यांना माहिती. बाकीच्यांकडे लक्ष नाही. म्हणून त्यांना असुर म्हणतात. असु म्हणजे प्राण, आपल्याच प्राणाला जपणारे, आपल्या विषयीच विचार करणारे. तेव्हा शास्त्राप्रमाणे प्रयत्न करून स्वर्गलोकही जिंकतात ते. ही त्रिपुरे जी त्यांनी निर्माण केली होती वर मागून, तिथे स्वर्गाप्रमाणे सर्व सुखसोयी त्यांनी मिळवल्या होत्या. आणि त्या त्रिपुरांचा नाश करण्याचा सर्व देवांनी पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांना काही यश आले नाही. एका बाणाने तीनही विमानांचा नाश करायचा, हे कसे शक्य आहे? मग सर्व देवांनी शंकरांच्यावर ही कामगिरी सोपविली. शंकरांच सामर्थ्य मोठं आहे. तीनही विमाने नष्ट करण्याचा बाण कसा मिळवायचा? मग विष्णूंनी त्या बाणाचे रूप घेतले. ब्रह्मदेव त्यांचे सारथी झाले. आणि शेवटी त्रिपुरी पौर्णिमेला त्या तीन पुरांचा नाश केला व दैत्य आपआपल्या स्थानी निघून गेले. दैत्यांसाठी सुध्दा स्वतंत्र स्थान ईश्वराने निर्माण केलेलेच आहे. देवांसाठी जसा स्वर्गलोक तसा दैत्यांसाठी रसातल नावाचा लोक आहे. तरीही ते अधून मधून स्वर्गलोक मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. आणि मग ब्रम्हा, विष्णू, महेश एकत्र येऊन त्यांचा नाश करतात. नाश झाला तरी पूर्ण नाश होणे शक्य नाही. पुन्हा त्यांना अनुकूल काळ आला की, त्यांच्यापैकी कोणी तपश्चर्या करतो. स्वर्ग लोकात जाण्याचा प्रयत्न करतो. हे रहाटगाडगे चालूच आहे. देव-दैत्यांचे युध्द कधीही संपत नाही



म्हणतात. माणसाच्या मनात येते दुसऱ्यांना सुख का मिळावे? आपल्याला का सुख मिळू नये? उलट त्यांना सुख मिळू नये, अशाही कोणाकोणाच्या इच्छा असतात. मत्सर ज्याला आपण म्हणतो. दुसऱ्याचे चांगले पाहिल्यावर मनात द्वेष उत्पन्न होतो आहे. ही अगदी तामसी वृत्ती आहे. दुसऱ्याचे सुख पाहिल्यावर आपल्याला सुख व्हायला लागले म्हणजे त्याला सात्विक वृत्ती म्हणतात. तो अभ्यास केला पाहीजे. आपल्या मुलाला परीक्षेत फर्स्ट क्लास मिळाल्यावर आपल्याला सुख मिळते. कारण चांगला पास झालाय तो ! आपल्या मुलाप्रमाणे दुसरा एखादा मुलगा फर्स्ट क्लास मध्ये पास झाल्यावरही तसा आनंद वाटला पाहिजे. तसे घडले नाही तर ते गैर आहे. ही वृत्ती जोपर्यंत बदलता येत नाही तोपर्यंत व्यर्थ आहे सर्व !

मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा वगैरे उपाय योगशास्त्रकारांनी मनाला स्थिर करण्याकरिता, शुध्द करण्याकरिता सांगितले आहेत. त्याच्या पुण्याईने तो सुखी आहे. त्याच्याबद्दल प्रेम वाटले पाहिजे. दुर्योधनाला कांही पांडवांना पाहून प्रेमाची भावना निर्माण झाली नाही. त्यांना बाजूला करण्याचा त्याने प्रयत्न केला. राजनीतीला धरून ते कपट क्षम्य आहे. त्यांना वनवासात पाठवले. नुसती बारा वर्षे वनवासातच नाही तर एक वर्ष अज्ञातवासाची अट घालून जन्मभर पांडव वनवास भोगतील अशी व्यवस्था केली त्याने. अज्ञातवास म्हणजे जर ते पांडव आहेत असे उघडकीस आले की, पुन्हा बारा वर्षं वनवास ! आणि पांडव उघडकीला येणार. पांडवांचे गुण कांही लपून राहणार नाहीत. शिवाय पांडव वनवासात ( वनांत ) जायला निघाल्यापासून त्याचे हेर त्यांच्या मागावर होते. प्रयत्नवादी होता तो . दैववाद किंवा ईश्वरनिष्ठेपेक्षा प्रयत्नवाद श्रेष्ठ आहे असे त्याला वाटत होते. म्हणून कृष्णाची शक्तीसुध्दा त्याने ओळखली नाही. दुःशासनाने द्रौपदीची विटंबना करण्याचा प्रयत्न केला. सगळे गप्प

बसले. पण द्रौपदीची निष्ठा कृष्णावर असल्यामुळे तिने धावा केल्याबरोबर गोपाळकृष्णांनी सर्व वस्त्र तिला दिली. ही ईश्वर भक्ती आहे. कशी दिली? काय दिली? कोणत्या गिरणीतला माल आला? हे काही सांगता येत नाही. ईश्वरशक्ती ईश्वरइच्छा एवढेच सांगता येईल. वास्तविक पाहता, वस्त्रासाठी कापसाचा धागा, यंत्र वगैरे सर्व लागते. कृष्ण हे सर्व आयत्यावेळेस कुठून आणणार होता? पण द्रौपदीच्या मनामध्ये कृष्णाच्या सामर्थ्याबद्दल शंका बिलकुल नाहीये.

दुर्योधन द्रोणाचार्यांचा शिष्य असला, राजा असला तरी ईश्वराच्या शक्तीबद्दल त्याला काही कल्पना नाहीये. म्हणून पांडवांच्या सुखाकडे पाहून त्याला मत्सर निर्माण झाला. खरेतर सुखी माणसाबद्दल आपल्या मनामध्ये मैत्री निर्माण व्हायला पाहिजे. दुःखी माणसाला पाहिल्यावर मनामध्ये दया उत्पन्न व्हायला पाहिजे. म्हणजे त्याला मदत करणे, उपयोगी पडणे ही कार्ये होतात. ह्याने सुध्दा मनाला शांती मिळते.

त्यानंतर शास्त्रकारांनी तिसरा मार्ग सांगितला आहे. पुण्यवान माणसाच्याबद्दल मैत्री, करुणा आणि आनंद वाटला पाहिजे. आपल्याला काही जमत नाही. पण तो जे चांगले करतोय, त्याला सहाय्य करावे हा एक अभ्यास आहे.

आणि पापी लोकांची उपेक्षा करावी असे त्यांनी सांगितले आहे. पाप करणाऱ्याला शासन व्यक्तीने करायचे की समाजाने हाही एक प्रश्न आहे. व्यक्तीला आपल्या मनाची भूमिका तयार करायची आहे. त्या दृष्टीने त्याने पापी माणसाची उपेक्षा करायची. म्हणजे पाप करणाऱ्या दुर्जनांची उपेक्षा करावी असा त्याचा अर्थ नाही. आपण जेव्हा आपल्याला चांगली मनोभूमिका मिळावी म्हणून अभ्यास करतो त्यावेळी हे सांगतात. अर्जुनाला भगवंतांनी त्या विशिष्ट वेळी तुला अनैतिकतेने वागणाऱ्यांची



उपेक्षा करुन युध्द सोडून जाता येणार नाही असे सांगितले.

वर सांगितलेला अभ्यास केल्याने आपले चित्त प्रसन्न होते. परंतु या भावनांचा अभ्यास होण्याकरिता सुध्दा ईश्वराची कृपा पाहिजे. ईश्वरी सहाय्याशिवाय कसे होणार ! प्रयत्नांनी प्रेम उत्पन्न करु, आनंद मानू, हे सर्व म्हणणे सोपे आहे. मनाला तसे वाटले पाहिजे. मृच्छकटिक नाटकातला चारुदत्त श्रीमंत असतो आणि पुष्कळ दानधर्म करायची त्याला सवय असते. त्याचे सर्वस्व जाऊन तो दरिद्री झाला. दारिद्र्य आल्याचे त्याला वाईट वाटले नाही, पण आपल्याकडे कोणी याचक आला तर द्यायला आपल्याकडे काही नाही, याचे त्याला वाईट वाटले. आम्हाला तसे वाटत नाही. आम्हाला दारिद्र्याने सुखोपभोग मिळत नाहीत, म्हणून दुःख होते. वसंतसेना वेश्या असली तरी ती चांगली गुणग्राहक असल्याने तिचे त्याच्यावर प्रेम असते. एकदा तिने तिचे दागिने चारुदत्ताकडे ठेव म्हणून ठेवायला दिले. रात्री नेमके चोराने ते दागिने चोरुन नेले, सकाळी उठल्यावर त्याच्या मित्राने दागिने चोरीस गेल्याचे सांगितले. 'वा ! वा! चोर दागिने मिळाल्याने कृतार्थ झाला. त्याची खेप फुकट गेली नाही.' अशा शब्दात आनंद व्यक्त केला चारुदत्ताने. तो मित्र म्हणला, 'अरे तो चोर कृतार्थ झाला असे कसे म्हणतोस?' पण चारुदत्ताची निसर्गतःच तशी वृत्ती आहे.

आपल्याच मनामध्ये देव-दैत्य आहेत, असे उपनिषदामध्ये सांगितले आहे. सात्विक वृत्ती म्हणजे देव आणि तामसी वृत्ती म्हणजे दैत्य. यांचे युध्द नेहमी चालू असते. एखादे वेळी सात्विक वृत्तीचा जय होतो. त्याप्रमाणे आपल्या हातून पुण्यकर्म घडतात. दुसऱ्या वेळेस तामसी वृत्ती प्रबल होऊन मनुष्याचा अधःपात होतो. शेवटपर्यंत दुर्योधनाने काही माघार घेतली नाही.

आपल्या महाभारत, पुराणे इत्यादीत वर्णन केलेल्या प्रसंगात

कोण कोण कसे वागले, त्यांना दैवी सहाय्य कसे झाले, याचा अभ्यास केला म्हणजे आपल्यात धैर्य उत्पन्न होते, निराशा कमी होते. पांडव वनवासात असतांना व्यास महर्षींनी मुद्दाम अर्जुनाला जाऊन मंत्र दिला आणि तपश्चर्या करुन शंकरांना प्रसन्न करुन घेऊन अस्त्र विद्या मिळवायला सांगितले. म्हणजे ही महर्षि मंडळी नुसती 'अहिंसा परमोधर्मः' म्हणून गप्प बसत नाहीत, प्रत्येक वेळी प्रतिकूल काळ आला म्हणून तो कायम राहील असे नाही. प्रतिकूल काळात मंत्रांचे सहाय्य घेऊन संकटांना तोंड देणे अनुचित नाही. पांडवांनी वनवासात असतांना कितीतरी व्रतवैकल्ये केली. आणि प्रतिकूल काळाला तोंड दिले.

अर्जुन देवलोकातून सर्व अस्त्रे विद्या, शिकून आल्यावर बाकीच्या पांडवांनी त्या विद्येचे त्याला प्रात्यक्षिक दाखवायला सांगितले आणि तो दाखवणार इतक्यात व्यास महर्षि तिथे येऊन म्हणाले, 'ही अस्त्रविद्या दाखविण्याकरिता नाही,' म्हणजे अस्त्र विद्या शिकायची पण त्याच्याबरोबर संयमही पाहीजे. भारतीय संस्कृतीत संयमाला महत्व आहे. अर्जुनाचे मत होते समोर खरोखर तुल्यबळ योध्दा आला तरच अस्त्राचे प्रयोग करायचे, उगीच नाही. युध्दामध्ये हिंसा निराळी. तिथे ती अपरिहार्य आहे. संयमाचा उपयोग व्यक्ती व समाज यांनाही खूप होऊ शकतो.

अर्जुन जयद्रथाला मारण्याकरता चक्रव्यूहात गेलेला आहे. त्याचा शिष्य सात्यकीही मोठा पराक्रमी होता. तो अर्जुनाला सहाय्य करीत होता. इतक्यात कौरवांच्या एका मोठ्या योध्दयाने त्याला अडवले. दोघांचे तुंबळ युध्द सुरु झाले. शेवटी तलवारीने युध्द सुरु झाले व त्यात त्याने सात्यकीची तलवार मोडून टाकली आणि त्याला मारायला स्वतःची तलवार उपसली. अर्जुन त्यावेळी पुढे गेलेला होता. श्रीकृष्णाने अर्जुनाला तुझा शिष्य मरतो आहे असे सांगितले. तो होता तिथेही (अर्जुनाचे) भयंकर युध्द चाललेच आहे. इतक्यात पाठीमागे वळून अर्जुनाने एक बाण



सोडला आणि सात्यकीला मारायला आलेला हात त्याने तोडून टाकला. सात्यकीची सुटका झाली. कौरव योध्दा अर्जुनाची निंदा करु लागला. तो अर्जुनाला म्हणाला, 'मी दुसऱ्याबरोबर लढाई करत असताना तू माझा हात तोडलास हे काय धर्मयुध्द झाले का?' अर्जुनाने त्याला उलट विचारले, 'माझी प्रतिज्ञा तुला माहीत नाही का? माझ्या बाणाच्या टप्प्यात असलेला माझा मनुष्य मी कधीही मरू देणार नाही.' मग तो कौरव योध्दा गप्प बसला. म्हणजे सामर्थ्याचा असा वेळेला उपयोग केला पाहिजे. संयम संयम करत काहीही अनर्थ घडला तरी संयम करायचा म्हणजे त्याला काही अर्थ नाही. पण हे सर्व क्षत्रिय, राजनीतीज्ञ इत्यादींसाठी आहे.

पण ज्याला आपली पारमार्थिक उन्नती करुन घ्यायची आहे. व्यवहार कमी कमी करत आणायचा आहे, त्याच्या करता दुसरे उपाय आहेत. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा वगैरे यांच्या अभ्यासाने मनोवृत्ती पुष्कळ शांत होतात. ह्याने असे केले, तो तसे बोलला, त्याचे वागणे असे आहे, या सगळ्या गोष्टींचाच आपल्याला राग येतो, त्याचा उपयोग काय आहे? त्यावर उपेक्षा हाच इलाज आहे. तुम्हाला जर मनःशांती हवी असेल तर तुम्ही उपेक्षेचाच अभ्यास केला पाहिजे. तुम्ही एकटे काही प्रतिकार करू शकत नाही. त्याकरता काळ वेळही पहायला पाहिजे. आपली वृत्ती आधी व्यवहार सोडायला तयार आहे का? हे आधी तपासले पाहिजे. आणि तो व्यवहार सोडण्याच्या दृष्टीने हे सर्व उपाय आहेत. योगशास्त्र हे प्रयोगशास्त्र आहे.हा अभ्यास म्हणजे आध्यात्मिक प्रयोग आहे. तो प्रयोग करून पहायचा आहे. काम, क्रोध, लोभ वगैरे जे भयंकर विचार आहेत त्यांनीच मनःशांती नाहीशी होते ना ! त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून जर करूणा, मुदिता...... या साधनवृत्तींचा अभ्यास केला तरच त्या भयंकर विकारांवर जय मिळू शकतो. ज्या मुंबाजीबाबाने तुकाराम महाराजांना बडवून काढले; त्याचेच हातपाय दाबून द्यायला

तुकाराम महाराज त्याच्या घरी गेले. प्रल्हादाला त्याच्याच पित्याने ठार मारण्याचे पुष्कळ प्रयत्न केले पण प्रल्हादाची चित्तवृत्ती शांतच राहिली. नृसिंहांनी पित्याचा वध केल्यावर प्रल्हादजी म्हणाले, 'मला कांही वर वगैरे नको पण माझ्या पिताजींनी आपली पुष्कळ निंदा केली आहे त्यांना आपण क्षमा करा.' केवढे विशाल मन आहे.

आपापल्या कर्माप्रमाणे जग चालले आहे. हा एक मोठा सिध्दान्त आहे. कोणाची कर्मे कशी असतील, काय माहिती ? तेव्हा आपण मुद्दाम कशाला पक्षपातीपणा करायचा ? याचा किंवा त्याचा पक्ष घेऊन काय करायचं आपल्याला ? आणि तसा घेऊन कार्य होतंच असं नाहीये. जगामध्ये कितीतरी पक्ष होतात आणि जातात. म्हणून नियामक कोणीतरी आहे, असा विश्वास ठेवून शास्त्रांनी, संतांनी सांगितलेले आपले कर्तव्य आपण करीत राहायचे. पोष्यवर्ग आहे, इतर समाज आहे, या सगळ्यांसाठी आपल्या शक्तीप्रमाणे सेवा कार्य करायचे. थोडेसे आपण कोणाच्या उपयोगी पडलो, तर आपल्याला केवढा अहंकार निर्माण होतो. पण शंकर सर्व जगाचे पालन करुनसुध्दा त्यांना स्वतःला त्याची जाणीव नाहीये. व्याघ्रचर्म पांघरुन स्मशानात समाधी लावून बसले आहेत. म्हणून शंकरांची प्रार्थना मुद्दाम केली जाते. सन्मार्गावरुन चालताना जर बुध्दी शुध्द झाली नाही तर योग्य विचार होणार नाही. आमची तामसी वृत्ती शंकरांनी नाहीशी करावी. आणि आम्हाला योग्य बुध्दी द्यावी. ईश्वराच्या निरनिराळ्या अवतारांच्या, चरित्रांच्या किंवा त्यांच्या भक्तांच्या चरित्रांच्या चिंतनानेही मनाला शांती मिळू शकते. मैत्री, करुणा, मुदिता वगैरे साधनांचा अभ्यास निराळा. राजस, तामस असे अनेक विचार सतत मनात येत असल्याने, मनाची शांती जाते.

ज्याप्रमाणे जेवायला बसल्यानंतर जावई आला, मंत्री आला तर, 'जरा थांबा, पोळी व्हायची आहे', असे म्हणतो का आपण? नाही. कारण



जेवणाची सर्व सिध्दता आधीच करुन ठेवलेली असते. त्याचप्रमाणे पूजेला बसण्यापूर्वी सर्व तयारी करुन बसले पाहिजे. आत्मिक बल, सन्मार्गाने कर्तव्यकर्म करुन वाढविले पाहिजे. ईश्वराच्या शक्तीवर श्रध्दा ठेवून आपल्याला उपासना करता येईल तेवढी करायची आहे. 'उपासनेला दृढ चालवावे' समर्थांनी सर्व एका श्लोकात सांगितले आहे. संतांना भूदेव मानून त्यांचा आदर केला पाहिजे. जेवढी सत्कर्मे करता येतील, तेवढी केली पाहिजेत. उगीच एक दोन दिवसांनी काही होत नाहीत. उत्सवाच्या वगैरे निमित्ताने आपण भजन वगैरे करतो तेवढ्या पुरते, एरवी काही नाही. अखंड जन्मभर स्वतः सत्कर्म करणे, इतरांकडून करुन घेणे, दुसऱ्याने केले तर त्याला अनुमोदन देऊन अभिनंदन करणे हे सर्व सत्कर्म आहे. सर्वांनाही त्या मार्गाने नेण्याचा प्रयत्न करायचा. गेले तर ठीक. नाहीं गेले तरी हरकत नाही. सर्वामुखी मंगल बोलवण्याचा प्रयत्न करायचा.

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

## दैवी संपदा आणि उपासना

।। श्री गुरुदेव दत्त ।।

दत्तात्रेय त्वां नमामि प्रसीद

त्वं सर्वात्मा सर्वकर्ता न वेद ।

कोप्यंतं ते सर्वदेवाधिदेव

ज्ञाताज्ञातान्मे पराधान्क्षमस्व ।।

भगवान शंकराचार्य महाराजांनी सर्व देवतांची स्तोत्रे केलेली



आहेत. गणेश आहे, देवी आहे. शंकर, विष्णु, सूर्यनारायणाचीही स्तोत्रे आहेत. सर्वत्र एक परमेश्वर आहे हा त्यांचा सिध्दांत आहे. म्हणजे जीव सुध्दा निराळे नाहीत. ईश्वराची अनेक स्वरूपे आहेत. पण तो एकच ईश्वर आहे, अनेक रूपांनी ! इतकेच नव्हे तर जगामध्ये दिसणारे सर्व जीवसुध्दा परमेश्वर स्वरूपच आहेत. ईश्वररूप सगळे जग आहे, असे पहावे, असा अभ्यास करावा असे उपनिषदामध्ये सांगितलेले आहे.

म्हणून, जरी भिन्न भिन्न देवता आपल्याला व्यवहारात दिसतात, ज्याच्या त्याच्या आवडी प्रमाणे जो तो भक्ती करत असतो, तरी सर्वत्र एक परमात्मा आहे. जगाची उत्पत्ती करणं, तारण करणं आणि संहार करणं ही कार्य त्या ईश्वराकडून चालू आहेत. ब्रम्हा, विष्णू, महेश अशी भिन्न भिन्न रूपं त्याने धारण केली.

विष्णूंनी सर्व जगाचं संरक्षण करण्याचं कार्य आणखी घेतलेलं आहे. सगळ्यांचं पालन करायचं. 'भयकृत भयनाशन' ही दोन्हीही त्यांची रूपे आहेत. भय निर्माण करतो. भय दूरही करतो. आणि संरक्षणही सगळं तोच करतो. भय निर्माण केलं तरी ईश्वरच संरक्षण आहे, अशी भक्तांची भावना असते.

पांडव वनवासामध्ये गेले. बाह्य व्यवहार दृष्टीने त्यांचं साम्राज्य कौरवांनी घेतलं. आणि त्यांना वनवास पत्करावा लागला. व्यवहार दृष्टीने हे किती तरी विपरीत दिसते. पुष्कळ कष्ट पडले, दुःख झालं, असं आपण समजू. परंतु वनामध्ये असेपर्यंत पांडवांचा जसा गृहस्थाश्रम चालू होता तसा दुर्योधन राजाला सुध्दा करता येत नव्हता. मोठेमोठे ऋषी वनामध्ये यायचे. त्यांच्याबरोबर ते चर्चा करत. धर्माधर्माचा विचार प्रत्येक दिवशी त्यांनी केला.

प्रत्येकाने रात्री झोपेच्या वेळेला, सकाळी उठल्यापासून आत्तापर्यंत आपल्याकडून काय काय पुण्य झालं आणि काय पाप झालं

याचा विचार करुन निजाबं म्हणतात. आपण सत्पुरुषांच्या प्रमाणे वागलो का पशु प्रमाणे वागलो? आपलं आपण आत्मनिरिक्षण करावं.

धर्मराजा आणि त्याचे सगळे बंधू वनामध्ये गेले. काही ऐषआराम नाही. कुठे तरी आपले झोपडी बांधून राहायचे. परंतु पुष्कळ पुण्य त्यांच्याकडून घडलं, पुष्कळ अन्नदान घडलं. त्या द्रौपदीने अन्नदान केलेलं आहे. सूर्यनारायणाने पात्र दिलेलं होतं. आणि सूर्योदय झाल्याबरोबर त्याची पूजा केली की त्याच्यातून वाटेल तितक अन्न मिळायचं. काळजी नाही, 'आज इतकी मंडळी जेवायला येणार, स्वयंपाक व्यवस्थित झालाय की नाही, कमी पडणार तर नाही ना?' काही काळजी नाही. सूर्यनारायणाची प्रार्थना त्याकरताच धर्मराजांनी केली. येणारे जे काही ऋषि मुनी वगैरे आहेत, त्यांना अन्न मिळालं पाहिजे, ही भावना आहे.

आधिभौतिक विभागाकडेच आपले लक्ष आहे फक्त. पण अधिदैविक विभागही असतो. देवता ह्या पुष्कळ आहेत. प्रत्येक इंद्रियाच्या देवता आहेत. वेगळ्या वेगळ्या देवता. जोपर्यंत इंद्रियांशी त्या देवतांचा संबंध असतो, तोपर्यंत त्या इंद्रियांकडून कार्य होत रहातं. त्या आधिदैविक विभागाकडेही पांडवांचे लक्ष होते. आध्यात्मिक तर आहेच आहे.

आत्मा, परमात्मा, ईश्वर कोण आहे याचाही विचार करणारे ते होते. तर वनात जाऊन राहाणे यात व्यावहारिक दृष्ट्या काही सुख नाहीये. राजवाड्यामध्ये राहणारे हे, त्यांना वनामध्ये सुख कसे असेल? परंतु त्यांची जी दृष्टी होती, ती धर्म दृष्टी, पुण्य दृष्टी होती. लोमश ऋषि होते. चला म्हणाले, तीर्थयात्रेला जाऊ या ! तीर्थयात्रेला निघाले. राज्यावर असते तर रथ, सैन्य वगैरे घेऊन गेले असते इथे काही नाही. पायांनीच तीर्थयात्रा करायची. इथे जवळ साधन सामुग्री काहीच नाही ना। शरीराचेही श्रम आहेत. वाणीने भगवंताचे नामस्मरण चाललेले आहे.



मनात चिंतन चाललेले आहे. अशा तीर्थयात्रा सबंध भारतवर्षामध्ये केल्या.

काया वाचा मनाने जे पुण्य घडले ते पुण्य आयुष्यात त्यांना अनुकूल झालं की नाही? जरी अशी परिस्थिति आली असली तरीसुध्दा वनामध्येही ईश्वराने त्यांच्याकडून धर्माचरण करुन घेतले. अधर्माचं कधीही आचरण नाही. पायांनीच तीर्थयात्रा करावी लागली. सामुग्रीच नाही जवळ. वहानांची व्यवस्था नाही.म्हणजे साम्राज्य गेले ते बरे झाले की आणखीं वाईट झाले? हाही एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

साम्राज्य मिळविलं त्यांनी. स्वतः राजसूय यज्ञ केला. सगळी एकंदर पृथ्वी जिंकली. आणि नंतर सगळं गेलं, संपलं. परंतु ते साम्राज्य जवळ नसतांना सुध्दा आणखी त्यांच्या हातून कितीतरी सत्कर्म झाली. अहोरात्र देवाचं नामस्मरण चाललेलं आहे. बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. तेरा वर्षे काढावी लागली. पण त्याच्यामध्ये कितीतरी पुण्यसंचय झालेला आहे. अन्नदान करीत होते. कुणी पैसे मागायला आला तर त्यांच्याजवळ काही नाही ! काहीतरी व्यवस्था नक्की असेल. परंतु राज्यावर असताना जितकं धन देता येईल तितके यावेळेला कसे देता येईल?

तर हे सगळे दोष, मनाचे, वाणीचे, शरीराचे, कोणतेही दोष राहू नये याकरता जी काही सत्कर्मे शास्त्रकारांनी सांगितली ती सगळी सत्कर्मं त्यांनी केलेली आहेत. ही ईश्वराची कृपा समजले. वनामध्ये आपण राहिलो ही देवाची कृपा आहे अशीच त्यांची समजूत होती. एखाद्या वेळेला वाटायचं त्या द्रौपदीला, पण तिनं काही धर्म सोडला नाही शेवटपर्यंत. आपण मिळविलेलं राज्य शत्रुने कपटानं घेतलं, असे एखाद्या वेळेला विचार येत असतील मनामध्ये, परंतु समाधान होतं, कृष्णभक्ती होती. त्यामुळे तिच्या मनाचं समाधान होतं. म्हणून तेरा वर्षांच्या त्या दिव्यातून ते पार पडलेले आहेत.

पांडवांचा शोध करण्याकरता कौरवांनी पुष्कळ प्रयत्न केले. कारण त्यांनी ठरवले होते, एक वर्ष अज्ञातवासामध्ये पांडव राहिले पाहिजेत. त्या वर्षी जर पांडवांना शोधून काढलं कौरवांनी, पांडव अमूक ठिकाणी आहेत अशी जर बातमी मिळाली आणि जर त्यांचा शोध लागला तर पुन्हा बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास, अशी अट होती तरी धर्मराजाने ती कबूल केली. म्हणजे जन्मभर वनवासामध्ये राहाण्याची पाळी आली असती. परंतु भगवान गोपालकृष्णांची इच्छा आहे. त्या ईश्वराच्या इच्छाशक्तीने सगळी कार्य होत असतात. त्याचे (दुर्योधनाचे) हेर त्यांच्या पाठीमागे होते, कुठे जातात पांडव? काय करतात? बारा वर्षे संपत आल्यानंतर तर जास्तीच हेरांचे जाळे होते. कारण तेराव्या वर्षी कुठे राहतात ते शोधून काढायची ती सोय होती.

पण पत्ता लागला नाही. पांडव कुठे गेले ते कुणालाही कळले नाही. एक वर्ष राहिले. त्यांचा शोध कसा लागेल म्हणून चिंताग्रस्त होते सगळे, दुर्योधन वगैरे ! भीष्म द्रोणांनी सांगितले, पांडवांचा शोध तुमच्या सी.आय.डी. खात्याकडून होणं शक्य नाही. सापडणार नाहीत ते. त्यांना तर यमधर्मानी वरदान दिले होते. दुर्गादेवीने वर प्रदान केले होते, 'तुम्ही आपल्या मुळच्या वेषात जरी फिरलात तरी तुम्हाला कुणीही ओळखणार नाही.'

एक वर्षपर्यंत हा एक देवतांशी संबंध त्यांचा होता म्हणून तर ते अन्नदानाचे पात्र मिळाले त्याने त्यांनी अन्नदान केले. तर अशारितीने पांडवांना जन्मभर आणखी वनामध्ये. राहाता यावे अशी व्यवस्था जरी कौरवांनी केली असली तरी बारा वर्षे पर्यंत पांडव कुठे राहातात कोणत्या वनामध्ये राहातात, कुठे तीर्थयात्रेला गेलेले आहेत हे सगळे त्यांना कळत होते. पण शेवटच्या वर्षी पत्ता नाही कुठे गेले पांडव ! म्हणून भीष्म द्रोणांनी सांगितले पांडवांचा शोध असा लागणार नाही. कसा लागेल? ज्या



देशामध्ये लोकांची मनोवृत्ती धर्मानुकूल झालेली आहे, गुणग्राहक लोक आहेत, केवळ दोषाकडे पाहाणारे लोक ज्या देशात नाहीत त्या देशात पांडव असतात, म्हणाले. हे त्यांनी सांगितले. पांडवांच्या गुणांचा विकास ज्या ठिकाणी आलेला असेल तिथे तुम्हाला पांडवांचा शोध निश्चित लागेल.

पण तशी कौरवांची स्वतःची बुध्दी नव्हती. भगवत् भक्ती पांडवांच्या जवळ होती त्यांनी ईश्वराला आनंद व्हावा, संतोष व्हावा असे गुण मिळवले होते आणि गुणांकडे त्यांचे लक्ष होते. ते गुण कायम राहिले पाहिजेत. काही चांगल्या लोकांच्या संगतीमध्ये असेपर्यंत चांगले गुण असतात. बिघडली संगती की पुन्हा गुण जातात. तर गुण उत्पन्न होणं ते अधिकाधिक वृध्दिंगत होणं याकरता पांडवांचा प्रयत्न अहर्निश चालू होता. गुण महत्वाचे वाटले म्हणून राज्याकडे विशेष लक्ष नव्हते. मिळवल राज्य त्यांनी शेवटी !

गोपालकृष्णांची अशी इच्छा होती, धर्मराज राजा झाला पाहिजे, भरतवर्षाचा. त्याची इच्छा होती. ईश्वराची इच्छाशक्ती आहे. त्या इच्छाशक्तीपुढे कोणालाही जाता येत नाही. जरी दुर्योधनाने, कौरवांनी पुष्कळ सैन्य जमवले तरी धर्मराज राजा व्हावा अशी भगवंताना इच्छा का झाली?

युध्दाच्या ऐन वेळेला अर्जुन अगदी भिऊन गेला. काय, माझ्या हातुन केवढे पाप होणार ! सगळ्या लोकांना आणखी मारावे लागणार. अर्जुनाने मारले असते त्यांना. युध्दाचेही काही नियम आहेत. धर्मयुध्द म्हणून युध्द करायचं आहे. युध्द जरी करत होते लोक तरी संध्याकाळ झाल्याबरोबर युध्द बंद झालं की एकमेकांकडे जाणं येणं असं चालू होतं. हे काही कपट नाही, अधर्म नाही. शस्त्र हातातून खाली पडलेले आहे. निशःस्त्र झालेला आहे आपला प्रतिस्पर्धी, त्याच्यावर शस्त्र सोडायचे

नाही. असे सगळे नियम पाळत होते.

जरी पुष्कळ मोठी मोठी अस्त्र जवळ असली तरी वाटेल त्याच्यावरती सोडायची नाहीत. संयम होता त्यांचा. संयमाशिवाय धर्माचं पालन होऊ शकत नाही, धर्माचरण होऊ शकत नाही. संयमाची जरुरी आहे मनुष्याला मन मोकळं सुटलं आहे, इंद्रिय सगळी अनावर झाली आहेत, अशा वेळेला धर्माचरण होत नाही. आणि ते जरी झालं तरी ईश्वरचा प्रसाद, संतोष होऊ शकत नाही.

पांडवांच्या जवळ संयमही पूर्ण आहे. त्याशिवाय १२ वर्षे वनवासात कसे राहिले ? 'आम्ही राहणार नाही,' म्हटले असते मध्येच तर? कबूल केलेले आहे आणखी राहणार नाही असे कसे म्हणता येईल? तर त्यांनी तो संयम पाळलेला आहे. त्यामुळे त्याचे बल जास्तीत जास्ती वाढत चाललेले आहे. मनाचा संयम झाला पाहिजे, निग्रह झाला पाहिजे, म्हणतात. पाणी वाहातय सारख, त्याला जर बांध घातला, सेतु बांधला तर त्या पाण्याची शक्ती पुष्कळ वाढते आहे. किती तरी त्याचा उपयोग करुन घेता येतो. वीज निर्माण होते. किती तरी कार्य होते.

त्याप्रमाणे मनाच्या प्रवृत्ती सारख्या बाहेर जात आहेत हा प्रकार जर आवरला, मनाच्या वृत्ती जर थांबविता आल्या, तर त्या मनाची शक्ती किती तरी वाढणारी आहे. निरोध त्याला म्हणतात. चित्तवृत्ती निरोध. म्हणजे निग्रह करणे.

अर्जुनाला निग्रह करता आला नाही. धर्माधर्माचा विचार करता आला नाही. आणि, 'माझ्या हातून हिंसा होणार. इतक्या लोकांना मी मारणार. त्यापेक्षा युध्द न करता वनामध्ये जाऊन राहातो. आत्तापर्यंत वनातच होतो, बारा वर्षे.' पण ते वनात राहाणं. निराळे आहे. आणि आत्ता युध्दाकरिता उभा राहिलेला असताना वनात जाऊन राहावेसे वाटते ही चूक झाली, म्हणाले भगवान. त्यांना समजूत करावी लागली.



हे वनांत जाणे नाही. हा अधर्म आहे. समोर सगळे शत्रू येऊन उभे राहिलेले आहेत. आणि त्या वेळेला अहिंसेचा विचार करुन निघून जायचे हा अधर्म आहे. हा धर्म होणार नाही. म्हणून संपूर्ण गीताज्ञान त्याला सांगून, विश्वरुप दाखवून त्याची खात्री करुन दिली आणि त्याच्या मनाला स्वच्छ केले. निग्रह केला. हिंसा करावी का अहिंसा करावी ? काय करावे? त्याचे सगळे विचार चालले होते. ते विचार स्थित झाले. बुध्दी स्थिर झाली.

आणि मग तो उठलेला आहे युध्दाला. 'करिष्ये वचनं तव' तुमची आज्ञा मला मान्य आहे. ज्या वेळेला अर्जुनाच्या मनातला मोह निघून गेला, विचार सगळे निघून गेले, निर्मोह अंतःकरण झाले. चित्त स्थिर झाले. आपले कर्तव्य काय आहे याची पूर्ण जाणीव झाली. त्यावेळी तो युध्दाला उभा राहिला. संजयाने धृतराष्ट्राला शेवटी हेच सांगितलं. त्यांचाच मंत्री होता तो, संजय. त्याने सगळी गीता ऐकली .संजय संयमी होता, मनाच्या वृत्तीचा निरोध त्याला साधला होता म्हणून व्यासांनी गीता ऐकण्याची सगळी व्यवस्था केलेली होती. दूर श्रवणाच यंत्र काही तिथे नव्हतं. पण तो बसल्या जागेवरुन सबंध लढाईतील हकीगत रोज सांगत होता. दिसत होतं त्याला. गीता भगवंतांनी सांगितली अर्जुनाला रणांगणावर, संजयाने ऐकली. राजवाड्यात आणि धृतराष्ट्राला सांगितली. आणि शेवटी त्याने निर्णय दिलेला आहे.

अर्जुनाच्या मनातला मोह ज्याने दूर केला, अर्जुनाच्या मनाचा निग्रह ज्याने करुन दिलेला आहे, तो ज्या बाजूला आहे त्याच बाजूला विजय मिळणार -

यत्र योगेश्वरो । कृष्णयत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्धुवा नोतिर्मातिर्मम ।।

हे माझे मत आहे, म्हणाले. त्यांच्याच मंत्र्याने त्यांना

- धृतराष्ट्राला - अशा प्रकारचे सांगितले आहे. तुम्हाला विजय मिळणार नाही. त्या बाजूला विजय मिळणार. हे सगळे त्याने निरिक्षण केले आहे. बाह्य भौतिक शक्ती मोठी का मानसिक शक्ती मोठी हा विचार करणारे होते, संजय. चांगला उत्तम मंत्री होता. जरी कौरवांचा मंत्री असला तरी सुध्दा मनावर ताबा होता, विचारी होता. धृतराष्ट्राला- आपल्या मालकाला बरे वाटेल असेच सांगायचे असा विचार त्याने केला नाही. विजय शत्रुला मिळणार आहे असे कुणी आपल्याच पक्षाचा मंत्री, सांगेल का? त्याला ते ठेवतील का? पण संजयला काही भीती वाटली नाही.

याचे कारण असे आहे की पांडवांनी काही शक्ती मिळविली होती, मोठे धनुर्धारी होते पांडव. अर्जुन आहे- यत्र पार्थो धनुर्धर - याचाही त्याने उल्लेख केला आहे. ईश्वराची शक्ती पांडवांच्या बाजूने तर आहेच आहे, म्हणाले. 'यत्र योगेश्वर कृष्ण' त्या बाजूला ईश्वरशक्ती आहे. आणि शिवाय तो धनुर्धारी आहे, व्यवहारमध्ये असणारी आवश्यक ती शक्ती तीही त्याबाजूला आहे, म्हणाले, अर्जुनाच्या रुपाने. तुम्हाला विजय कसा मिळेल? काय तुमच्या बाजूला आहे? अर्जुनाने कितीतरी वेळेला तुमचा पराजय केलेला आहे पूर्वी. त्याला अशक्य काही नाही.

महाभारतामध्ये एका अध्यायात असा प्रसंग आहे, एकदा सगळी मंडळी बोलत बसली होती. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, अर्जुन सगळे होते. हे इतकं सैन्य किती वेळात मारता येईल हा विचार चालला होता. भीष्म म्हणाले, मला एक आठ दहा दिवस लागतील. कारण मारायचं म्हणजे नुसतं मारायचं नाही. सगळं नियमाने केले पाहिजे. कुणाजवळ शस्त्र नसेल त्या वेळेलां युध्द बंद करायचं. मग लवकर कसं मारता येईल. अश्वत्थामा म्हणाला, एक महिना लागेल.

अर्जुन म्हणाला, 'डोळे झांकून उघडे पर्यंत हे सगळे सैन्य मी मारुन टाकेन पण मला तसं करता येत नाही.' अस्त्र शक्ती त्याने



मिळवली होती. ईश्वराची आणि गुरुंची कृपा आहे- द्रोणाचार्य महाराज गुरु होते त्याचे. सगळी अस्त्रविद्या त्याच्याजवळ आहे. त्यामुळे तो अगदी आत्मविश्वासाने बोलतोय. बोलता बोलता त्याने आपली शक्ती सांगितली. पण तसं वागणं संयमाचं ठरलं नसतं. भीष्माचार्य काय, द्रोणाचार्य काय, मोठे वीर होते. परंतु त्यांनी आपल्या शक्तीला आवरलेलं आहे. मनाचं दमन केले. मनाचा निग्रह केला आणि युध्द केलं. ईश्वरी शक्ती आणि स्वतःच मन असं दोन्हींचंही सहाय्य पाहिजे. ह्या दोन्ही प्रकारचं सहाय्य आणि शक्ती पांडवांना मिळालेली आहे. त्यांच्याजवळ दया आहे. मनाचा निग्रह आहे. नम्रता आहे. कृतज्ञता आहे. गुरुजनांच्या विषयी अत्यंत आदरभाव मनामध्ये आहे. हे सगळे गुण मिळवण्याकरता त्यांनी प्रयत्न केला.

सात्त्विक प्रकृती, दैवी प्रकृती, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ती संपत्ती जास्तीत जास्त आपण मिळवायची. मनुष्य जन्म त्याकरीता आहे. बाहेरच्या संपत्तीला विशेष महत्व नाहीये. दैवी संपत्ती गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितलेली आहे. सात्त्विक प्रकृती. आपली बुध्दी सात्त्विक बनली पाहिजे. त्याकरता मनाच्या संयमाची, निग्रहाची अत्यंत जरुरी आहे.

पण अर्जुनासारखा एवढा मोठा योध्दा. त्याने सांगितले, 'मनाचा निग्रह मी करु शकत नाही.'

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवदृढम् ।<br>
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।

अर्जुनाने हात टेकले आहेत त्या मनापुढे. केवढा ईश्वर भक्त होता अर्जुन ! नामस्मरण अखंड चाललेले आहे. अर्जुन निजला म्हणजे त्याच्या केसातून 'कृष्ण, कृष्ण' असे ऐकू यायचं म्हणे. अखंड नामस्मरण आहे. गुरुभक्तीही तशीच आहे.

द्रोणाचार्यांची भक्ती केली म्हणून सगळी अस्त्रविद्या द्रोणचार्यांनी त्याला देऊन टाकली. आपल्या मुलालाही त्यांनी दिली नाही. अश्वत्थाम्यापेक्षाही जास्त प्रबल अर्जुन होता. द्रोणाचार्यांच्या मनाला पूर्ण समाधान आहे. समोर द्रोणाचार्य युध्दाला आल्यानंतर आरंभाला पायाजवळ दोन बाण मारायचे. सोडायचे फक्त हळूच. लागायचे नाहीत. म्हणजे नमस्कार करायचा त्या रुपाने. आणि मग युध्द.

युध्दाच्या वेळेलासुध्दा मनामध्ये काही मत्सर, द्वेष नाहीये. प्रसंग आलेला आहे. त्या बाजूला आहेत आपले गुरु महाराज आणि युध्दाला आलेले आहेत. म्हणून करायचे युध्द. पण सगळा संयम पाळून करायचे आहे. तर असा एवढा मोठा अर्जुन असून त्याने सांगितल की - 'चंचलं हि मनः कृष्ण.' मन अत्यंत बलवान आहे. त्याचा निग्रह करणं म्हणजे अतिशय अशक्य वाटतय मला.

'वायोरिव सुदुष्करम्' वाऱ्याला जसं बांधून ठेवणं अशक्य आहे, त्याप्रमाणे मनाला बांधून ठेवणे, स्वस्थ बसवणे हे अशक्य आहे. मग भगवंतांनी त्याला उपाय सांगितला. मनाचा निग्रहसुध्दा होऊ शकतो म्हणाले -

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येणंच गृह्यते।

मनाच्या निग्रहाचा एक अभ्यास पाहिजे. आणि वैराग्य म्हणजे विषयाकडे धावणारे जे मन आहे त्याला थांबविता आले पाहिजे. विषयाची तृष्णा हा एक मोठा दोष आहे मनाचा, तो कमी केला पाहिजे, म्हणजे आपोआप मन स्थिर होते. एकाग्रता उत्पन्न होते. ध्यान करण्याची भूमिका त्यामनाची तयार होते. मनाची एकाग्रता असल्याशिवाय ध्यान होऊ शकत नाही. एकाग्रता भूमिकेवर मन गेलं म्हणजे मग ध्यानाचा अभ्यास सुरु होतो. निरोध करणे किंवा एकाग्रता करणे महत्वाचे आहे. निरोध म्हणजे कोणतीही वृत्ती नाही. सगळ्या वृत्ती शांत होणे.



आणि एकाग्रता म्हणजे एकाच ठिकाणी मन हे स्थिर होऊन राहाणे. मनाला स्थिर होण्याची कधीही माहिती नाही. अतिशय चंचल मन आहे म्हणतात. पण त्याला स्थिर करता येतं म्हणतात. अभ्यास, प्रयत्न चालू पाहिजेत. गीतेच्या सहाव्या अध्यायामध्ये मन स्थिर कसं करावं याविषयी सगळा अभ्यास सांगितला आहे.

विषयाकडे आपले मन सारखे चाललेले असते. विषयापासून आपल्याला सुख मिळेल ही एक विचारसरणी आपल्या मनामध्ये दृढ झाली असते. अनेक जन्मांचे ते विचार आहेत. त्यामुळे धन पाहिजे आणि सुखाची सामुग्री म्हणून जी ठरविलेली आहे, आपण ती सामुग्री जमविली पाहिजे. याच विचारामध्ये मन गुंतून जाते म्हणून मनाचा निग्रह होऊ शकत नाही.

अर्जुनसुध्दा म्हणाला, 'मनाचा निग्रह करायला मी काही समर्थ नाहीये.' म्हणजे मनाचा निग्रह झाल्याशिवाय धर्माचरण होऊ शकत नाही. सुखाकडेच सारखे लक्ष असते. धन पाहिजे. सुखाचे साधन धन आहे. ते मिळविण्याकरता जर प्रयत्न सुरु झाला तर धर्माधर्माचा विचार कसा रहाणार मनामध्ये? जास्तीत जास्त धनाचा संग्रह करायचा, हाच विचार मनामध्ये असल्यामुळे मनाचा निग्रह नाही. मन सारखं त्या विषयाकडे धावते आहे. सर्व सुख साधनांचा संग्रह केल्यानंतर आपण सुखी होतो अशी समजूत आहे. त्यामुळे सुख साधनं सगळी पाहिजेत. त्याला धन पाहिजे.

आणि धनाचा विचार मनामध्ये आल्यानंतर काही धर्माकडे लक्ष लागत नाही. जितकं मिळवता येईल तितकं धन मिळवायचं. नीती अनीतीचा विचार हा मनामध्ये येतच नाही. आणि त्या वेळेला मन हे अतिशय उद्दाम बनून गेलेले असते. सत्ता मिळाली आणि त्या सत्तेचा उपयोग धन मिळविण्याकरता करायचं ठरलं. त्यावेळेला मनातले विकार

- अहंकार हा कमी कमी होत नाही, जास्ती जास्ती वाढत जातो. आपल्या सत्तेचा उपयोग धनाचा संग्रह करुन घेण्याकरता करायचा. मनामध्ये औध्दत्य, अतिशय अहंकार उत्पन्न झाल्यावर ईश्वर भजन किंवा धर्माचरण हे होऊ शकत नाही. मनाचा निग्रह होऊ शकत नाही.

अनेक विषयांच्या वासना या वाढत जात आहेत. त्या थांबत नाहीत. त्यामुळे मनही आपलं अनावर होत आहे. अहंकारही वाढतो आहे. म्हणून शंकराचार्य महाराजांनी भगवान विष्णूची विश्व संरक्षक मूर्ती ध्यानात घ्यायला सांगितली. देवाजवळच त्यांनी प्रार्थना केली. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्याप्रमाणे पसायदान मागितले असे शंकराचार्यांचे हे पसायदान आहे.

अविनय अपनय विष्णो
दमय मन शमय विषय मृगतृष्णा
भूत दयां विस्तारण
तारय संसारसागर सुखो।

संसार सागरातून तरुन जायचे आहे. संसार काही सामान्य नाहीये. तो सागरा सारखा पसरलेला आहे. परत तो एक जन्माचा नाहीये. अनेक जन्म चालू आहे . किती जन्म झाले, किती येणारेत काही पत्ता नाही. हे वासना म्हणून जे बीज आहे त्याचे कार्य आहे. अनंत वासना मनामध्ये आहेत. या जन्मामध्ये त्या वासनांची पूर्ती होऊन त्या वासना तृप्त होतील असे शक्य नाही. त्या वाढतच असतात. शेतामध्ये हरळी येतात, पुष्कळ गवत उगवलेलं असतं. उन्हाळ्यामध्ये नांगरुन टाकतात जमीन. सबंध गवत गेलं असं वाटतं आपल्याला. आता गवत राहिले नाही. धान्य चांगलं उत्तम होईल. मध्ये गवत वगैरे काही येणार नाही. सगळी जमीन नांगरुन टाकल्यामुळे गवत येणार नाही असं वाटलं तरी एक पाऊस पडल्यावर पुन्हा ती हरळी उगवते. ती काही कायमची गेलेली



नसते.

तसं मनुष्यजन्म आला म्हणजे संसार संपला असं नाहीये. ते वासनेच बीज जो पर्यंत आहे तो पर्यंत संसाररूपी हरळी म्हणा, धान्य म्हणा जास्ती जास्ती वाढत आहे. चांगले गुणही होते. उत्तम वेदाभ्यास त्याने केलेला होता. उत्तम गाणारा होता. चांगल्या विद्या, कला ह्या त्याच्याजवळ होत्या. परंतु अविनय मोठा.

अविनय अपनय विष्णोः ।
जे खळांची व्यंकटी सांडो ।

असे मागणे पसायदानात मागितले आहे.

पहिली प्रार्थना ती आहे. ज्ञानेश्वर महाराज आणि आचार्य महाराज दोघांनीही ही प्रार्थना प्रथम केली आहे.

हा जो मनामध्ये अविनय उत्पन्न झालेला आहे. गर्विष्ठपणा, अहंकार वगैरे त्यामुळे लोकांचा पाणउतारा केला जातो. मानहानी आपण करतो, लोकांचा उपमर्द करतो. तो मनातला अविनय दूर झाला पाहिजे. ही पहिली प्रार्थना आहे.

आणि तो जितका जितका कमी होईल तितकी 'दमय मन' ही दुसरी प्रार्थना नंतर केली आहे. मनाच दमन झालं पाहिजे. मनामध्ये ज्या अनेक वासना उत्पन्न होतात, त्या नाहीशा झाल्या पाहिजेत.

विषय मृगतृष्णां शमय - तिसरी प्रार्थना आहे. विषय ही मृगतृष्णा आहे. मृगजल आहे, म्हणाले. पण हरिणाला ते मृगजल वाटत नाही. हरिणाला तहान लागलेली आहे. समोर काहीतरी दिसतंय पाण्यासारखे. सूर्यकिरणांवरच पाण्याचा भास होतो आहे. आणि तो हरिण धावतो आहे. जिथे पाणी दिसतं तिथपर्यंत गेल्यानंतर तिथून तितकच लांब तसच पाणी दिसायला लागतं. किती धावणार तरी किती?

त्याप्रमाणे विषयाच्या मागे जी धाव चाललेली आहे आपल्या

मनाची त्याच्यात सुख वाटते. ती काही थांबवता येत नाही. किती मिळालं म्हणजे सुख मिळेल ते काही सांगता येत नाही. जास्तीजास्ती अशी तृष्णा ही वाढत जाते आहे. त्यामुळे अमुक इतका विषय संग्रह मिळाला, इतक्या विषयांचा स्वीकार आपण केला म्हणजे सगळे भोग मिळाले, म्हणजे सगळं सुख मिळालं आता काही याच्या पुढे शिल्लक नाही असे मनाला वाटेल असे काहीही सांगता येणार नाही. उलट जास्ती जास्ती वासना वाढत जाताहेत असे दृश्य दिसते.

म्हणून 'विषय मृगतृष्णां शमय' ही प्रार्थना केलेली आहे. विषयापासून आपण सुखी होऊ, ही समजूत गेली पाहिजे. गाढ झोप लागली असता किती आनंद असतो ! त्यासाठी कोणी झोप येण्याकरता औषध देतात. झोपेत तरी दुःख विसरावं त्या रोग्याने. त्याला झोप लागावी म्हणून औषध आहे. म्हणजे झोपेत आनंद आहे. एकदम कोणी गाढ झोपेतून उठवल्याबरोबर त्याला राग येतो, 'किती आनंदात होतो. कशाला उठवलस' असे तो म्हणतो, रागावतो.

हा आनंद किंवा हे जे सुख मिळतं आपल्याला झोपेत. त्या सुखाची साधनं आपण जी ठरवली आहेत व्यवहारामध्ये, जागृतीमध्ये, त्यापैकी कोणचं सुखाचं साधन तिथं आहे? धन नाही, सत्ता नाही. झोपेत काही याला कल्पनाच नाही. गाढ झोप लागली. सगळं विसरुन गेला. शरीरही विसरुन गेला. ज्या इंद्रियांनी विषयांच सुख उपभोगायचं ती इंद्रियही सगळी त्यावेळेला विलीन झालेली आहेत. काही इंद्रियांचा संबंध नाही. मनही निर्विकार झालं आहे.

तर एकही व्यावहारिक सुखाचे साधन तिथे नसतांना त्याला जो आनंद होतो, हा आनंद कोणता आहे? तो आत्माच आनंदरुप आहे, मुळात. पण आपलच स्वरुप तो विसरला आणि बाहेर विषयांमध्ये सुख आहे, आनंद आहे अशा समजूतीने तो वागतो आहे. हा प्रतिबंध दूर



झाला पाहिजे. आपण काही करु शकत नाही, या करता ईश्वराजवळ प्रार्थना केली. ईश्वराची जर इच्छाशक्ती असेल तर त्या इच्छाशक्तीने हे कार्य होईल.

पुन्हा शेवटची प्रार्थना आहे. 'भूतदयां विस्तारे' आचार्य महाराज ही प्रार्थना करताहेत. सर्वांच्याकरता ही प्रार्थना आहे. सर्वही प्राणीमात्रांविषयी दया मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. कोणाचंही दुःख दृष्टीस पडलं तरी वाईट वाटलं पाहिजे. स्वतःला दुःख झाल्यानंतर केव्हा दुःख जाईल, काय याचा प्रतिकार कसा करायचा, कोण मला भेटेल ही माणसाची सारखी धडपड चाललेली असते. त्याप्रमाणे मनाची तयारी, दुसऱ्याला दुःख झालेलं असतांना, जणू ते स्वतःला झालेलं आहे अशारितीने ही एक देवाजवळ प्रार्थना करायची आहे.

भूतदया हा मोठा गुण आहे. आणि हा देवानेच द्यावा. 'भूतदयां विस्तारे' 'भूता परस्परे पडो मैत्र जिवाचे' ज्ञानेश्वरांच्या पसायदानामध्ये हीच प्रार्थना आहे. सर्वांच्या मनामध्ये एकमेकांबद्दल मैत्री भावना, प्रेम भावना, दया भावना ही निर्माण झाली पाहिजे. 'एकमेका साह्य करु' ही वृत्ती निर्माण झाली पाहिजे. ते गुण आहेत. वैयक्तिक आणखी सामुदायिक राष्ट्रीय सुख ज्याला म्हणतात त्या राष्ट्रोन्नत्तीला, व्यक्तीच्या उन्नत्तीला, सगळ्यांना या गुणांची जरुरी आहे.

आणि हे गुण मिळवण्याचा प्रयत्न पांडवांनी केला. हे ईश्वर मान्य गुण आहेत. ईश्वराचा प्रसाद त्यामुळे त्यांच्यावर झालेला आहे. अन्नदान करणारी द्रौपदी उपाशी कोणी नाही याची खात्री झाल्याशिवाय जेवत नव्हती. सूर्यनारायणांनी ते पात्र देताना धर्मराजाला सांगितले, याच्यातून वाटेल तितकं अन्न मिळेल. पण द्रौपदीचं जेवण झालं की अन्न बंद होईल. जबाबदारी आता द्रौपदीवर आलेली आहे. आपल्याला भूक लागली आणि आपण इतरांच्या आधी जेवण जेवलो तर त्यादिवशी अन्न

मिळणार नाही. दुसरे दिवशी सुर्योदयानंतर मिळेल. पण मध्ये कोणी आले तर?

त्या दुर्वास ऋषींनी त्याच वेळेला गाठलं त्यांना. दुर्योधनाने मुद्दाम दुर्वास ऋषीना पाठवून दिलेलं आहे. द्रौपदीचं जेवण आटोपलेल होतं. अंशावेळेला ते ऋषी, त्यांची शिष्य मंडळी आली. परंतु त्या द्रौपदीनं मनाच दमन करणं, विषयांची जी काही धाव आहे, त्याविषय वासना कमी करणं, ते देवाजवळ मागून घेतलं होतं. तसा तिने प्रयत्न केला होता. म्हणून ईश्वराचा प्रसाद इतका तिच्यावरती झाला होता की मध्यरात्री तिने बोलवल्याबरोबर गोपालकृष्णांनी येऊन त्या संकटातून त्यांना मुक्त केलं.

हे जे मनोबल आहे ते मनोबल वाढविण्याकरता त्यांनी प्रयत्न केला. आणि त्या मनाचे बल हे निग्रहाने, निरोधाने, संयमाने उत्पन्न होते. आपल्याला वाटते एकादशी आलेली आहे. काही निर्जला एकदशी म्हणून लिहिली असते पंचांगामध्ये. आणि तशी निग्रही माणस असतात. पाणी सुध्दा घ्यायचे नाही. तीर्थ फक्त घ्यायचे. खाण्याची वेळ झाली, भूक लागली. चहाची वेळ झाली व त्याची जरुरी आहे असं वाटत आपल्याला. परंतु तपश्चर्या करणारे जे महात्मे आहेत त्यांनी मनाची तयारी अशीच केलेली आहे. काही मिळणार नाही. म्हणजे हे पाहिजे ते पाहिजे अशी जी सवय मनाला जी सारखी लागलेली आहे, ती सवय बंद करण्याकरता काही घ्यायचं नाही. जरुर नाही. त्यामुळे मनातल्या त्या वासनाच कमी कमी होऊन गेल्या. कष्ट आरंभाला झाले परंतु सगळ्या वासना काही राहिल्या नाहीत. ही ईश्वराची कृपा आहे.

ईश्वराच्या कृपेशिवाय निग्रह होऊ शकत नाही. मनाचा निग्रह साधत नाहीये आणि अहंकार दूर होत नाहीये. विषयांच्या वासना कमी कमी होत नाहीयेत. आणि हे सगळं झालं तर भूतदया ही आपोआप होते



आहे. दुसऱ्याला दुःख असलं तरी हरकत नाही, आपलं तेवढ दुःख जाऊ देत, असाच प्रयत्न करतो आपण. दुसऱ्याकडे आपलं लक्ष नाही. तर स्वतःच दुःख सहन करुन दुसऱ्याची दुःख दूर करण्याचा प्रयत्न करणारे आणखी महापुरुष असतात.

तर याप्रमाणे वागणारे जे आहेत, आपल्या शरीराचा निग्रह, मनाचा निग्रह आणि वाणीचा निग्रह हा सगळा साध्य झाला पाहिजे. निदान तो व्हावा अशी इच्छा तरी पाहिजे. तळमळ पाहिजे म्हणजे ईश्वराच्या कृपेने ते साध्य होऊ शकतं. मनाला, वाणीला, शरीराला आवरणं जर सोडून दिलं आपण, त्यात आपल्याला काही दोष दिसले नाहीत, आपण वागतो हे सगळं बरोबरच आहे. आपण काही चूक करत नाही अशीच समजूत जर आपली वाढत गेली तर सुधारणा होणार तरी कशी?

म्हणून व्यासांनी महाभारत ग्रंथ लिहून पांडव आणि कौरव यांच्या मध्ये अंतर दाखवलेलं आहे. काया, वाचा, मन यांचा निग्रह करणारे पांडव दुःख आलं तरी त्या अवस्थेतही त्यांनी अभ्यास कायम ठेवला. कौरवांचा तो अभ्यास नाहीये. जास्तीत जास्त सुख हे मिळालं पाहिजे अशी त्यांची वृत्ती आहे. आपण कपटानं राज्य घेतलं हे त्यांच्या लक्षात सुध्दा येत नाही. राज्य आपल्याला मिळालं ना आता, ते कायमचं टिकलं पाहिजे, म्हणून पांडवांनी जन्मभर वनामध्ये रहावं ही व्यवस्था त्यांनी करुन ठेवली होती. एक वर्षाचा अज्ञातवास त्यांच्या पदरात टाकला होता. ती अट घातली. त्यांना शोधून काढून पुन्हा त्यांना वनामध्ये धाडायचं अशी युक्ती केली.

तर हे दोन प्रकारचे अभ्यास आहेत. दोन प्रकारच्या मानसिक वासना आहेत. एक दुर्वासना आहे, एक सद्‌भावना आहे. पांडवांना दुःख देण्याचा प्रयत्न कौरवांनी वनात पाठवून सुध्दा केलेला आहे. त्या

घोषयात्रेच्या निमित्ताने आपल्या सगळ्या सैन्याला, वगैरे घेऊन आपलं ऐश्वर्य दाखविण्याकरता दुर्योधन वगैरे गेले आणि तिथे त्या चित्रसेन गंधर्वाने त्यांचा पराजय करुन दुर्योधनाला कैद करुन तो चाललेला आहे. मग त्याचेच लोक धर्मराजाला शरण आहे आणि म्हणाले, 'दुर्योधनाला गंधर्वानी कैद केलं आहे. पराजय झालेला आहे. त्याला तेवढं सोडवा. त्याची सुटका करा.'

भीम त्यांना म्हणाला, 'बरं झालं. आम्ही जे काम करणार होतो त्यांना कैद करण्याचं, त्यांचा पराजय करण्याचं ते गंधर्वानी केलं बर झालं की' हे ऐकून धर्मराजाने त्याला उपदेश केला, 'नीतीशास्त्राच्या दृष्टीने ही चूक आहे. आध्यात्मिक दृष्टीने ही फार मोठी चूक आहे. स्वतः तुम्हाला कैद केलं असतं तर कसं वाटलं असतं ? दुर्योधनाला कैद करुन तो घेऊन चाललाय. दुर्योधन आपल्यापैकीच आहे, ही बुध्दी पाहिजे. भावांचं वैर असेल आपलं, ते आपलं आपण पाहून घेऊ. आपल्यामध्ये वैर भाव असताना आपण पांच आणि ते शंभर. पण तो दुसरा जर कोणी आला, तिऱ्हाईत आणि तो आपल्या पैकी कुणाला त्रास देऊ लागला तर नीतीशास्त्र दृष्टीने दोघांनी मिळून त्याचा पराजय केला पाहिजे.'

तेव्हा एकी पाहिजे. फूट असली तरी सुध्दा ती बंद केव्हा करायची हे सुध्दा त्यांनी शिकविलेलं आहे. हा तिसरा शत्रू आलेला आहे. तिसरा शत्रू आलेल्या वेळेला आपल्यामध्ये असलेला जो भेद आहे तो टाकून दिला पाहिजे. ती सवय पाहिजे. नंतर भांडत बसा तुम्ही. तिसरा आल्यानंतर भांडू नका. तो एकेकाचा पराजय करील. तुम्हालाही राज्य मिळणार नाही. भावालाही मिळणार नाही. तिसराच घेऊन जाईल. हा नीतीशास्त्राचा उपदेश आहे.

त्याच्याही पुढे आध्यत्मिक धर्म जो आहे त्या भूमिकेवर धर्मराज असल्यामुळे सर्वही भूतांच्या बद्दल त्यांची समदृष्टी राहिली. म्हणून 'भूता



परस्परें पडो मैत्र जीवांचे' हा उपदेश भीम, अर्जुनाला त्यांनी केला. आणि अर्जुनाने जाऊन त्या चित्रसेन गंधर्वाचा पराजय करुन दुर्योधनाला सोडवून आणलेलं आहे. म्हणजे वनामध्ये पांडव गेले असतानासुध्दा आपलं ऐश्वर्य दाखवून त्यांना दुःखी करावं, ही इच्छा करणाऱ्या दुर्योधनाचं साम्राज्य मिळाल्यानंतर सुध्दा यांनी आपल्या मनावर ताबा ठेवलेला आहे. 'दुर्योधन सापडला, बर झालं, त्याच राज्य गेलं, त्याला घेऊन गेला.' अशी काही इच्छा सुध्दा त्यांना उत्पन्न झाली नाही. हा एक दोघांच्या वृत्तीचा फरक आहे.

काय प्रयत्न करायचा मनुष्याने हे चांगलं कळत नाही, आपल्याला. म्हणून दुर्योधनासारखे जे आहेत कौरव, त्यांना सत्ता मिळाली पाहिजे. धनधान्य, सगळी समृध्दि आपल्याला मिळाली पाहिजे, त्यातच आपलं सुख आहे असं वाटतं. पांडव तसा विचार करत नव्हते.

मुख्य सुख जे आहे ते म्हणजे अहंकार नाहीसा झाला पाहिजे, मनाचा निग्रह साध्य झाला पाहिजे. विषय वासना कमी कमी झाल्या पाहिजेत. आणि सर्वांच्या बद्दल मनामध्ये दयावृत्ती निर्माण झली पाहिजे. हा अभ्यास करुन माणसाने सुख मिळवावे आणि ते प्रयत्नांनी ईश्वर कृपेनी मिळते.

पांडवांना ते सुख मिळाले. कारण तेरा वर्ष वनवास भोगून जरी पांडव आले तरी युध्दाची त्यांना इच्छा नव्हती. धर्मराजाने मुद्दाम श्रीकृष्णांना दुर्योधनाकडे पाठवलेलं आहे. संधि करण्याकरता. युध्द नको. दुर्योधनाने कबूल केले तर आमचं अर्ध राज्य द्या. त्यांच अर्ध राज्य ते घेऊ देत. ते कबूल नसले तर आम्हाला एकेकाला एकेक गांव जरी दिलं तरी हरकत नाही. पाच गांवामध्ये आम्ही समाधान मानू. इतकी त्यांनी तडजोड केली. पांडव वनवासातून मोकळे झालेले आहेत तरी सुध्दा त्यांच्याशी युध्द करावे आणि राज्य मिळवावे अशी दुर्योधनाची इच्छा

आहे.

भूतदयां विस्तारे- आचार्य महाराज सांगताहेत. तिकडे त्यांची दृष्टी आहे. केवढा संहार होईल. कौरव पांडवांच ते युध्द झाल्यानंतर सबंध तरुण पिढी नामशेष झाली. पानिपतच्या लढाई नंतर जशी स्थिती झाली होती तशी स्थिती झाली. केवढा संहार झाला ! संहाराचा विचार धर्मराजाने केला. दया पाहिजे. दुर्योधन जरी चुकीचा वागला तरीसुध्दा आपण तसं वागणं बरोबर नाही. म्हणून गोपालकृष्णांनाच त्यांनी मध्यस्थी करायला पाठवलं आहे. तरीसुध्दा दुर्योधन त्याला कबूल झाला नाही. युध्दाशिवाय काहीही मिळणार नाही. अविनय आहे. या अविनयामुळे नुकसान झालेलं आहे. उध्दटपणा. कृष्णांनासुध्दा त्याने सांगितलं की आम्ही पांडवांना काहीही देणार नाही.

कृष्णांना कैद करण्याचा त्याने प्रयत्न केला. कृष्ण हे दूत म्हणून आलेले आहेत. राजधर्माप्रमाणे, नीतीशास्त्राप्रमाणे दूताला कैद करायचं नाही. पण काय बाह्य सुखाकडे दुर्योधनाची बुध्दी गेली, मन तिकडे गेल्यानंतर, बर वाईट हा निचार करण्याची मनाची पात्रता रहात नाही. 'कृष्णाला कैद करुन आपण ठेवू म्हणजे झालं. पांडवांच्या बाजूला कृष्ण काही सहाय्य करायला नाही. अपराध पांडवांचा आहे.' ही बुध्दी आहे. श्रीकृष्णांना कैद करु शकला नाही तो. त्यांनी आपलं ते तेज दाखवलं आणि निघून आले. तर अविनय अपनय........ दुःखमय संसार आहे ना. 'सुख पाहाता जवा पाडे दुःख पर्वता एवढे' विचार करणारे माहात्मे असा सिध्दान्त मांडतात.

आयुष्यात सुख नाही असं म्हणत नाहीत. पण थोडं आहे. दुःख जास्ती आहे. उत्तम पक्वान्न आहे. पण त्यात विष थोडं पडलेलं आहे. उत्तम बासुंदी आहे पण पाल पडली एवढचं. ते समजल्यानंतर कोण घेईल ? तसं ते दाखवतात. अगदी दुःख नाही आणि केवळ सुख आहे असा



कुणाचा अनुभव आहे ? मुद्दाम. तिथहि त्यांनी उत्तर दिलेलं आहे. 'विचारी मना तूंची शोधूनी पाहे.'

पण कोण सुखी आहे ? विचारी जो आहे तो सुखी आहे. विकारी जो आहे त्याला सुख मिळण कठीण आहे. तो सगळा अभिमान आहे. 'मी विजयी होणार आहे.' असं शेवटपर्यंत दुर्योधन समजत होता. भीष्माचार्य पडले दहा दिवसांनी. तरी अजून द्रोणाचार्य आहेत की. आपल्या बाजूला काय कमी लोक आहेत ? पांच दिवसांनी द्रोणाचार्यही गेले. कर्ण आहे अजून. मी विजय देणार नाही. कर्ण दोन दिवसांत गेला. शल्य अर्धा दिवस राहिला, तोही गेला. शेवटपर्यंत मी विजयी होणार आहे हा अहंकार मनामध्ये आहे. त्याचा अहंकार इतका होता की शेवटी अठराव्या दिवशी भीम दुर्योधनाचं गदायुध्द झालं. आणि मांडीवर गदा मारली जोराने त्याला भीमाने. तो खाली पडला. सगळ संपलेलं आहे. आता सगळे भाऊ गेले, सगळं सैन्य गेले, सेनापती गेले, आपणही पडला तरी अहंकार कमी नाही.

त्याने धर्मराजाला सांगितले, 'तुम्ही आता राज्य करा. तुमचेही गेले लोक. आमचेही गेले लोक, कोण आहे? तुम्हाला कसलं राज्याचं सुख मिळणार ? लढाई करता करता मला मृत्यु आला. मी आता स्वर्गाला निघालो. तुम्ही इथच बसा आता. रडत बसा, हे गेले, ते गेले.' म्हणजे शेवटी सुध्दा त्याने अशी अहंकाराची भाषा केली.

याचा अर्थ विचार नाहीये. विचार नसल्यामुळे सुख मिळत नाही. आणि विकार ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी सुख हे असलं तरी सुध्दा त्यामुळे मनाचं समाधान मिळत नाही. हा उपदेश आचार्य महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. आणखी संसारामध्ये जी अवस्था आहे, दुखः जास्ती आहे की सुख जास्ती आहे? सुखाकडे आपलं लक्ष कमी असलं तरी थोडं जरी सुख मिळालं तरी जास्त जास्त समजून आपण जास्तीत जास्त प्रयत्न

करतो. मनाच्या विरुध्द पुष्कळ गोष्टी घडून येतात. तरीसुध्दा तिकड आपलं लक्ष नाहीये.

या करता विचार चांगला उत्पन्न झाला पाहिजे. आणखी मनाची चांगली तयारी झाली पाहिजे. जरी क्रोधादिक विकार उत्पन्न झाले तरी सुध्दा ते आवरण्याची शक्ती त्या मनाच्या जवळ उत्पन्न झाली पाहिजे. विकारी मन होतं, विचारीही मन बनलं पाहिजे. तशी शक्ती मनामध्ये अभ्यासाने जर उत्पन्न झाली ईश्वराच्या कृपेने तर त्याला कुठेही सुख आहे. सर्वांची दुःखं तो दूर करण्याचा प्रयत्न करतो आहे. आपल्या सुखदुःखाचीही काळजी त्याला उत्पन्न होते, आणि सर्वही जगाच्या उपयोगी तो पडतो. ईश्वर कृपेने हे अशा प्रकारचे महात्मे दुसऱ्याची दुःखं निवारण करु शकतात. त्याच्यांजवळ तशी शक्ती, सामर्थ्य आहे. नुसती बोलण्यापुरती भूतदया नाहीये. त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाल्यावर ते आपल्या शक्तीने ईश्वराच्या कृपेने दुसऱ्याची दुःख दूर करु शकतीत. ही शक्ती त्यांनी मिळविलेली असते. त्याकरता हा एक प्रयत्न आहे.

ती दैवी संपत्ती आपल्याला मिळावी या करता पांडवांचा प्रयत्न जन्मभर चाललेला होता. कौरवांचे मात्र दैवी संपत्तीकडे लक्ष नाहीये. कुणीकडून तरी आपल्याकडे सत्ता राहिली पाहिजे. राज्य आपल्या ताब्यात राहिलं पाहिजे. मग कितीही लोक जावोत, जिवंत राहोत किंवा मरोत. केवळ स्वतःच्या भोगाकडे नेहमी लक्ष असणे, ही असुरी संपत्ती आहे. आपल्याला सुखभोग मिळाला पाहिजे. आपण सुरक्षित राहिलं पाहिजे. दुसरे गेले तरी हरकत नाही ही असुरी वृत्ती आहे.

सर्वेत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः । ही जी वृत्ती आहे ही दैवी प्रकृती आहे. सामान्यही सुखी झाले पाहिजेत. हा प्रयत्न करणारा महात्मा तो स्वतः सुध्दा सुखी असू शकतो. सर्वामध्ये त्याचाही अंतर्भाव होतो. सर्व आरोग्य संपन्न राहोत, कोणालाही दुःख राहू नये असा प्रयत्न



करण्याची बुध्दी आणि शक्ती ज्यांना मिळालेली आहे ते महात्मे सर्व जगाचे कल्याण करु शकतात. जगाचे कल्याण संतांच्या मुळे, विभूतींच्या मुळे होते. सर्वही जीव परमेश्वराचे अंश आहेत. 'ममैवांशो जिवलोके जिवभूतः सनातनः ।' असे गीतेत म्हटले असले तरी अंश निराळे आणि विभूती निराळ्या. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' असे म्हणतात.

ईश्वराच्या शक्तीचा विशेष रुपाने अविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे त्या सगळ्या विभूती आहेत. आणि ते विभूती म्हणून असलेले संत, महात्मे जगाच्या कल्याणाकरता प्रयत्न करत असतात. त्यांचा तो स्थायी भावच झालेला आहे ना ! ते काही दाखवण्याकरता प्रयत्न करतात असे नाही. परोपकाराकडे त्यांचे लक्ष असते. लोकांना सांगण्याकरता ते काही करत नाहीत. त्यांची मनोवृत्तीच तशी असते.

एकदा एक बाई रानातून लाकडाचा भारा घेऊन आली. तुकाराम महाराजांनी पाहिल्यावर तिला म्हणाले, 'तू दमलेली आहेस, मी घेतो थोडा वेळ.' गावात राहणाऱ्या लोकांनी काही जरी म्हटले, तरी त्यांचे तिकडे लक्ष नाही. 'तुकाराम बुवा इतके चांगले आहेत, अभंग करतात, किर्तन करतात' वगैरे लोक म्हणाले, पण त्या बाईचे दुःख पाहून त्यांनी तो भारा घेतला आणि चल, म्हणाले.

अशी मनाची वृत्ती बनवण्याकरता मनुष्यजन्म आहे. कोणती वृत्ती बनवायची. दोष वाढवायचे की गुण वाढवायचे, हे समजले पाहिजे. कोणते दोष मनामध्ये आहेत ? कोणते गुण आहेत? किती कमी आहेत? किती जास्ती आहेत? हे सगळे आपल्या मनाचे निरिक्षण करुन ते दोष घालवण्याकरता, सदगुण संपन्न मन करण्याकरता, मनःशुध्दी करता जे संत महात्मे प्रयत्न करतात, त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो. ईश्वराचं सहाय्य त्यांना होतं. आणि जरी दुखः आली तरीसुध्दा त्यात ते समाधानाने राहू शकतात.

तेच महाभारतामध्ये आहे. धर्माने वागणारा, न्यायाने वागणारा सुखी होतो. रामायणाचं हेच सार आहे. न्यायाने वागणाऱ्याला, धर्मशील महात्म्याला, पशुपक्षीसुध्दा सहाय्य करतात. वानरांनी सुध्दा रामरायांना सहाय्य केलं. दोघे होते बंधू. रामलक्ष्मण. सीतेला घेऊन गेला रावण. त्यावेळेला त्यांच्याजवळ काय होतं? कोणती अनुकूलता होती?

'अमूक एक मोठा आपला पक्ष आहे, त्या पक्षात मी आहे, त्या पक्षाचा मी अध्यक्ष आहे, इतके लोक माझे अनुयायी आहेत, इतर सैन्य आहे' वगैरे काही नाही. तशा स्थितीचं वाल्मिकींनी वर्णन केलय. प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्म म्हणजे राम आहे. पुढे सीतेला आणल्यानंतर रावणाने त्या कुंभकर्णाला जागे केले. कुंभकर्णाला काय संकट आलय याची कल्पना आली. कुंभकर्ण म्हणाला, 'तुला वाटेल ते रूप धारण करता येत रावणा. तू रामाचं रुप धारण करुन सीतेकडे का गेला नाहीस ? म्हणजे सीता आपोआप तुला वश झाली असती.'

त्यावर रावण म्हणाला, 'मी रामाचं स्वरुप धारण केल्यावर माझा रावणपणा सगळा जाईल ना ! मी सीता देऊनच टाकणार पुन्हा. प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्मच आहे राम. मी रामाचं स्वरुप धारण करणार नाही.' रामरायांना रावणासारख्या मोठ्या शत्रूची भीती नाहीये. दैवी संपत्ती आहे रामचंद्रांकडे. आपण एकटे आहोत, आपल्याला कुणाचं सहाय्य नाही, काही नाही. मारुतिराय एकटेच होते. गेले लंकेमध्ये. सगळ्या लंकेचा शोध घेतला. सीतेला भेटले. आश्वासन दिलेलं आहे. आपली एकट्याची शक्ती रावणालाही दाखवली. लंका दहन करुन आले. संख्याबळ हे केवळ बळ नाहीये. मनोबल मुख्य आहे. ईश्वराची शक्ती. ईश्वराला प्रसन्न करणारे जे गुण आहेत ते जर मनामध्ये उत्पन्न झाले तर ती मोठी शक्ती आहे. न्यायाने वागणाऱ्याला, धर्ममार्गाने जाणाऱ्याला पशुपक्षी, सगळे वानर मिळाले, सुग्रीव राजा मिळाला. सगळं सहाय्य झालं आहे.



√ ९०-२

उलट धर्ममार्ग ज्या रावणाने सोडला आहे त्यानेही पुष्कळ शक्ती मिळवली. सगळे देव काय, गंधर्व काय, सगळे ताब्यात आहेत ना? केवढी सत्ता मिळाली ! त्याची गणनाच नाही. 'मनुष्यापासून मला मरण येऊ नये,' हे त्याने मागितलंच नाही देवाजवळ. देव, गंधर्व वगैरे सगळ्या ज्या मोठमोठ्या शक्ती आहेत, त्या सर्वांना मी अजिंक्य असा झालो पाहिजे. मनुष्य माझं काय करणार आहे, असा त्याने विचार केला म्हणून मनुष्यरूपाने यावं लागलं देवाला. असा इतका समर्थ रावण असतानासुध्दा सत्ता पाहिजे, संपत्ती पाहिजे. पुष्पक विमान आहे, सगळं आहे. ते भावाकडूनच बळजबरीने आणलं होतं. कुबेराला दिलं होतं ते ब्रम्हदेवाने. सन्मार्ग ज्याने सोडला आहे त्या रावणाला, रामायणकार सांगतात, 'त्याचा सख्खा भाऊ सुध्दा सोडून जातो. तो सुध्दा त्याच्या सहाय्याला येत नाही.' बिभिषण निघून गेला. आरंभाला त्याने रावणाची समजूत करण्याचा प्रयत्न केला पण रावणाने ऐकलं नाही.

तर हे सगळं मुख्य सार आहे. मनोबल मुख्य आहे. म्हणून समर्थांनी मनाला उपदेश केला. मनाची सुधारणा, बुध्दीची सुधारणा झाली पाहिजे. भारतीय संस्कृतीमध्ये बुध्दीबल वाढविण्याकरता जास्त प्रयत्न केलेला आहे. सगळ्या मानवांचा जन्म हा त्याकरता आहे. आपल्या मनाचं, बुध्दीचं सामर्थ्य जास्ती वाढलं पाहिजे. समाजाची कामं, राष्ट्राची कामं करायची नाहीत असं नाही. जास्तीतजास्त लक्ष इकडे दिलं म्हणजे आपोआप सगळ्यांविषयी परस्पर दया उत्पन्न होते. मग एकमेकांच्या सहाय्याला कोण जाणार नाही? एकमेकांवर प्रेम करण्यासाठी राष्ट्रपतींचा वटहुकूम काढून उपयोग होईल का? सर्वांची मनं सुधारण्याची शक्ती शासनाजवळ नाहीये.

म्हणून धर्मशास्त्र ही ईश्वराची आज्ञा जी आहे, त्याप्रमाणे वागणारे जे आहेत ते शेवटी सुखी होत आहेत. निर्भय होत आहेत.

निर्दोष बुध्दी, मन ज्यांनी केलं तेच निर्भय होतात आणि लोकांनां आदर्शभूत ठरतात. लोकांचं संरक्षण करु शकतात. हे सगळं आचार्य महाराजांनी मांडलेलं आहे. म्हणून भगवान विष्णू दत्तात्रेय जे आहेत त्यांच्याजवळ हीच प्रार्थना करायची आहे.

अविनय अपनय विष्णो.........

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।



## सद्‌गुरु : स्वरुप आणि भक्ती

पुंडलिक वरदा हारि विठ्ठल।
श्री ज्ञानदेव तुकाराम ।
अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

भारतवर्षामध्ये ईश्वर आणि सद्‌गुरु यांचे विशेष महत्त्व आहे. ईश्वरभक्ती तरी असावी अथवा गुरुभक्ती तरी असावी. ईश्वरभक्तीमध्येही पुष्कळ प्रकार आहेत. गुरुभक्तीमध्येही प्रकार आहेत.

देहाने, वाणीने, मनाने ही उपासना घडावी ही त्रिकरण - तीनही साधने आहेत. देहाचाही उपयोग उपासनेमध्ये झाला पाहिजे. वाणीचाही झाला पाहिजे. मनाचा तर अत्यंत आवश्यक आहे. मनाकरता तर ही सर्व साधने आहेत. मन हे प्रथमपासूनच पाहिजे त्या उपासना मार्गामध्ये. त्यात मार्गदर्शकाची जरुरी आहे. व्यवहारातसुध्दा मार्गदर्शक लागतो, परमार्थात तर अत्यंत आवश्यकच आहे.

अनेक प्रकारचे संशय मनामध्ये उत्पन्न होत असतात. ग्रंथ जरी असले तरी केवळ ग्रंथांवरुन योग्य मार्गदर्शन घडत नाही. मनामध्ये आलेले संशय हे ग्रंथ कसे दूर करणार? प्रत्यक्ष शब्दाने, वाणीने सुधारणा करणारा असा कोणीतरी पाहिजे. सद्‌गुरुंचं, आचार्यांचं लक्षण सांगतांना कोणत्या आचार्यांना शरण जावं हे भागवतामध्ये सांगितलेले आहे.

।। शाब्दे परेच निष्णातम् ब्रह्म उपसनाश्रयम् ।।

आचार्य, गुरुपरंपरा, ज्ञानी महात्म्यांची परंपरा जी भारतामध्ये आहे, ते ज्ञानी महात्मे शब्दांनी ज्ञान प्रदान करतात. प्रश्न विचारणाऱ्या शिष्याच्या मनात जिज्ञासा असली, तरी गुरुंबद्दल श्रध्दा प्रथमपासून निर्माण झालेली नसते. इच्छा आहे, कोणी तरी मार्गदर्शन करणारा भेटला पाहिजे म्हणून. पण कोणचे प्रश्न विचारायचे, कसे विचारायचे, ही काही पध्दती त्यांना बाळगावी लागत नाही. ते आपले विचारतात. पण त्याचे कोणचेही प्रश्न जरी आले-सद्बुध्दीने असो, परीक्षा घेण्याच्या बुध्दीने असो, कोणच्याही उद्देशाने त्याने प्रश्न केले तरी शब्दांनीच त्याचे समाधान करता आले पाहिजे. शब्दांनी पूर्ण समाधान हे प्रथम होत नाही. अनेक संदेह, संशय मनामध्ये उत्पन्न होतात. कदाचित एकनिष्ठ जर शिष्य असेल, फक्त परमार्थमार्गामध्ये आपली प्रगती व्हावी असे त्याला वाटत असेल, व्यावहारिक गोष्टींपासून प्रथमपासूनच जो निवृत्त झालेला असेल आणखी आपली जी काही इष्ट देवता म्हणा, भक्ती ज्या स्वरूपावर आहे, त्याला शरण गेलेला असेल त्याच्या मनामध्ये जास्त संशय उत्पन्न करणारी साधने नसतात. त्याची आपली एक उपासना चालू असते.

'सावधान' म्हणून शब्द कानावर पडल्याबरोबर समर्थ निघाले. आरंभापासूनच त्यांची तिकडे वृत्ती होती. तसे संस्कार त्यांच्यावर झाले होते. आणि दुसऱ्या शास्त्रीय किंवा ऐतिहासिक दृष्टीने म्हणा, मारुतीरायांचे ते अवतारही होते. पण लौकिक दृष्टीने आपण विचार करायचाय. उपनयन झालेले आहे आणि विवाहाला आईच्या आज्ञेवरुन उभे राहिलेले आहेत. सावधानता त्यांच्या चित्तामध्ये प्रथमपासूनच असली पाहिजे. समर्थांचं असं एकमेव उदाहरण आहे. अंतःपट धरलेला आहे, मंगलाष्टकं सुरु झालेली आहेत, अशा स्थितीत मनुष्य निघून गेला असं दुसर उदाहरण आहे का ? एक बोट कनिष्ठिका घातल्यावर दुसऱ्या कोणाचं नांवच घेता येत नाही. ही सावधानता प्रथमपासूनच असली



पाहिजे. म्हणूनच त्यांच्याविषयी सांगतात ना, की ते रात्र रात्र मारुतीच्या मंदिरात जाऊन बसायचे, जगाची चिंता करतो म्हणायचे. त्यामुळे ते बोहल्यावरून निघून गेले. आणखी गायत्री पुरश्चरण केलं. ईश्वरशक्ती प्रतिपादन त्या गायत्री मंत्रामध्ये आहे. ईश्वराचं नांव यात नाहीये. सर्व नांवे त्याचीच आहेत. सर्वव्यापी, अंतर्बाह्य दोन्ही ठिकाणी असणारा. बुध्दीमध्येही आहे, अंतःकरणामध्येही आहे, बाह्य विश्वामध्येही आहे.

आमची बुध्दी धर्माकडे जाणारी असेल, कदाचित अधर्माकडे जाणारी असेल. जे संस्कार घेऊन आम्ही जन्म घेतलेला आहे, मागच्या जन्मात जे कर्म केलेलं आहे, तसे संस्कार आमच्या बुध्दीवर झालेले आहेत. योग्य मार्गदर्शन करणारा भेटला असेल तर चांगले संस्कार होतील. तसे घेऊन मग माणूस जन्माला येतो. धर्म, अधर्म दोन्हीकडे बुध्दी जाणार आमची!

त्या बुध्दीला प्रेरणा करणारा ईश्वर आहे. बुध्दी म्हणजे अंतःकरण किंवा मन ज्याला म्हणतात ती पंचभौतिक आहे. पंचभूतांपासून निर्माण झालेली जशी बाहेरची शरीरं आहेत तसं मनही पंचभूतांपासून निर्माण झालेलं आहे. पण शास्त्राच्या दृष्टीने मनामध्ये पंचभूतांचा सत्वांश जास्ती आहे. नैसर्गिक अशी मनाची उत्पत्ती आहे. ते सत्वांश घेऊन जन्माला आलेलं मन दुसरीकडे का जातं, राजस, तामस का बनतं तर त्याला तसा संपर्क होतो म्हणून ! संगतीचा मनावर फार परिणाम होतो. दुसऱ्याच्या मनाची, वाणीची संगती झाली की मनाचा आपला सत्वांश कमी कमी होतो. रजोगुण, तमोगुण अधिक होतो. समर्थांनी 'मनाचे श्लोक' करीत असताना 'मना सज्जना भक्तीपंथेची जावे' असे सांगितले आहे. मनाला 'सज्जना' म्हणून संबोधन केलं आहे. मन हे खरं तर चांगलं आहे. मनाने ईश्वराला जाणायचं आहे. सृष्टीकर्त्याने आरंभाला इतर जीवांप्रमाणेच मन निर्माण केले परंतु त्याचं समाधान झालं नाही.

मनुष्याला जेव्हा निर्माण केलं त्यावेळेला मात्र ईश्वराला समाधान वाटलं. हा एक योग्य आहे, हा मला जाणू शकेल. मला जाणण्याची योग्यता याच्या ठिकाणी आहे. त्याकरताच त्याला मन दिलेलं आहे. सत्वांश अधिक घालून तयार केलेलं मन हे मानवाला मिळालं आहे.

त्या मनाने ईश्वराला जाणण्याची आपली योग्यता टिकवली पाहिजे, वाढवली पाहिजे. ती टिकवणं कठिण आहे. पूर्व जन्मामध्ये अधर्माचरण करुन, तसे संस्कार घेऊन जे जन्माला आलेले असतील त्यांच्या संगतीमध्ये चांगले मन असलेला जीव सांपडला तर ते बदलतं त्याचं मन. दुसऱ्याच्या शब्दाचा, आचरणाचा त्याच्या मनावर परिणाम होतो. दुसऱ्याकडे बंगला आहे, मोटार आहे हे सगळं ऐश्वर्य पाहिल्यावर ते आपल्याला मिळावं असं वाटतं. चांगले जरी संस्कार मनामध्ये असले तरी ते टिकत नाहीत ना ! मोह उत्पन्न होतो. या मोहामुळे मनातले सगळे संस्कार बदलून जातात.

कैकयी प्रथम रामावर फार प्रेम करत होती. त्या मंथरेचं मन हे पहिल्यापासून तामस गुणयुक्त होतं. सबंध राजवाड्यामध्ये गडबड चालली आहे, वाद्यं वाजताहेत. काय चाललं आहे याची तिने चौकशी केली. तिला समजलं रामाला राज्याभिषेक होतोय. एकदम ती आपल्या मालकिणीकडे आलेली आहे. कैकयीला पलंगावर निजलेली पाहून ती म्हणते, 'अहो बाईसाहेब निजून काय राहिलात ?' कैकयीने विचारले, 'का, काय झाले?' मंथरेने सांगितले, 'रामाला राज्याभिषेक होणार आहे, तुम्हाला माहित आहे का ?' कैकयीला इतका आनंद झाला की तिने स्वतःच्या गळ्यातली रत्नांची माळ काढून मंथरेला देऊन म्हणाली, 'वा, किती चांगली गोष्ट सांगितलीस मला तू आज. माझ्या रामाला राज्याभिषेक होतो आहे.'

सावत्रभाव तिच्या मनामध्ये नव्हता कारण रामांचं आचरणंच



तसे होते. सावत्र आई आणि सख्खी आई यांच्यामध्ये त्यांनी अंतर केलं नाही. 'मातृदेवो भव', म्हणजे माता कोणचीही असो, सावत्र असो किंवा सख्खी असो. अशी दोन्हीही मातांबद्दल आदरबुध्दी मनात असल्यामुळे, कैकयीलाही रामांबद्दल प्रेम होतं. पण हे त्या मंथरेला कसं सहन होणार ! तिचा प्रयत्नवाद सुरु झालेला आहे. आणखी आपल्या मालकिणीचं मन तिने बदलून टाकले. रामावर प्रेम करणारी कैकयी मंथरा सांगेल तसं ऐकायला लागली. मंथराच मालकिण बनली. मंथरेने सांगितलं कैकयीला, 'दोन वर मागा. तुम्हाला दोन वर द्यायचं कबूल केलं आहे दशरथ राजाने ते आत्ताच मागून घ्या. रामाने चौदा वर्षे वनवास सोसला पाहिजे. वनामध्ये जाऊन राहिलं पाहिजे. भरताला राज्य मिळालं पाहिजे.' मंथरा सांगेल तसं ऐकलं कैकयीने आणि त्याचप्रमाणे घडलं सगळ रामायण पुढे.

तर ही जी मनाची स्थिती आहे. आपलं अंतःकरण शुध्द, अशुध्द काही कळत नाही आपल्याला. आपल्या मनाप्रमाणे वागणारा जो असेल तो आपला मित्र. आणि मनाच्या विरुध्द वागणारा शत्रू ठरतो. मनाच्या विरुध्द सांगणारा जो आहे तोही शत्रू ठरतो.

रावणाला किती लोकांनी सांगितलं, दुर्योधनाला किती लोकांनी सांगितलं, पण नाही, ऐकलं नाही त्यांनी. म्हणून विरुध्द जरी वाटलं आपल्या मनाला, तरी त्यावेळेला ते बरोबर नाही असं वाटतं. हितकर्ते जे असतात, ज्यांच्या मनामध्ये काही दोष नाहीत, निर्दोष ज्यांचं मन आहे त्यांना दुसऱ्याचं हित कोणतं आणि अहित कोणतं हे समजतं. समजण्याकरता सगळी शास्त्रं आहेत ना !

संतांची संगती ज्यांना झालेली असते, ईश्वराने निर्माण केलेले जे ग्रंथ आहेत, वेद, शास्त्रं वगैरे ते ज्यांनी ऐकलेले असतात, वाचलेले असतात त्यांना मानवाचं हित कोणचं आहे आणि अहित कोणचं आहे हे समजलेलं असतं. त्यांची मनोवृत्ती कुणीकडे निघालेली आहे, ती कशी

वाढत जाणार आहे, शेवटी त्याचा नाश कसा होणार आहे, हे सगळं ते ओळखू शकतात. आणि त्याबाजूने जाणारी मनोवृत्ती ते वळवण्याचा प्रयत्न करतात. संतांची संगती जी सांगितली आहे ती याकरता आहे. ते हिताचा उपदेश करतात पण आम्हाला हित, अहित याची जाणीव नाहीये. आमच्या मनाला जे बरं वाटतं तेच आम्हाला योग्य वाटतं. ते सांगणारा कोणी भेटला तर तो योग्य आहे, त्याचं ऐकायचं. त्याच्या विरुध्द जर कोणी सांगणारा भेटला तर त्याचं ऐकायची जरुरी नाही, अशीच बुध्दी बनून गेलेली असते आमची. हीच ती आग्रही वृत्ती.

त्यामुळे दुसरा कितीही चांगला जरी असला तरी त्याचा हिताचा उपदेश हा काही आपल्याला पटत नाही. आपली मनोवृत्ती जशी बनलेली असेल, पूर्वसंस्कार जसे त्या बुध्दीवर झाले असतील त्याप्रमाणे वागतो आपण. वाईट संस्कार असतील तर अधर्माचरणाकडे प्रवृत्ती होते आणि धार्मिक संस्कार असतील तर तिकडे जाते. ही प्रेरणा फक्त ईश्वर करतो. सज्जन जे असतील, सद्‌गुरु जे असतील ते हिताचा उपदेश करीत असतात. एकदा, दोनदा, दहा वेळा. दया आहे त्यांच्यामध्ये. हा चांगल्या मार्गाने निघालेला नाहीये. याचे कल्याण होणार नाही म्हणून याच्याबद्दल त्यांच्या मनात दया उत्पन्न होते. सर्वच आपले लोक आहेत असे ते समजतात ना !

आपल्या घरातला असेल तो तेवढा आपला आणि दुसरा बाहेरचा असेल तो परका ही त्यांची भावनाच नसते ना !

हे विश्वची माझे घर ।
ऐसी मती जयाची स्थिर ।।



किंबहुना चराचर ।
आपण जाहला ।।

हे जे ज्ञानेश्वर महाराज सांगतायत तशी ज्ञानी महात्म्यांची वृत्ती बनलेली असते. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये दया आहे, कृपा आहे. हे पहिलं लक्षण आहे त्यांचं. भगवान् श्रीहरींनी उध्दवजींना उपदेश करताना हे लक्षण सांगितलं. ज्ञानी महात्मे जे उपदेश करीत असतात त्यांच्या शब्दामध्येही सामर्थ्य असते.

ज्यांची बुध्दी काही कारणाने बदललेली असेल- मूळ चांगली आहे, सात्विक आहे, धार्मिक आहे, संस्कार सगळे चांगले आहेत, कुसंगतीने फक्त थोडीशी बदललेली आहे- अशा वेळेला जर संतांची भेट झाली तर त्यांच्या शब्दांचा परिणाम लगेच होतो. रोग झाल्यावर लगेच जर डॉक्टरने तपासून औषध दिले तर तो लगेच बरा होतो. पुष्कळ काळ न तपासता गेल्यानंतर चांगल्या प्रसिध्द डॉक्टरला दाखवलं तरी तो काय करणार ? जुनाट रोगावर औषधाचा उपयोग कसा होणार ? रोग्याने त्या डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणे पुष्कळ दिवस औषध घ्यायला पाहिजे. तितका विश्वास रोग्याला नसतो. त्याला वाटतं किती दिवस औषध घ्यायचं ?

तर अशाप्रकारचे जे असतील सज्जन महात्मे, सद्‌गुरु, त्यांच्या शब्दामध्ये सामर्थ्य आहे.

शाब्दे परेच निष्णातम्.........

हे सद्‌गुरुंचं लक्षण त्यांनी सांगितलं आहे. शब्दामध्येही निष्णात आहेत, शब्दज्ञानही उत्तम आहे. कुठेही व्यवहारात व्याख्यान देणं नाही, कुठं जाणं नाही, काही नाही. पण मनाचा पूर्ण विचार झालेला आहे. स्वतःच्या मनाचे कोणचे कोणचे दोष आहेत याचा विचार करुन ते स्वच्छ केलेलं आहे आणि आता दुसऱ्याचे मन निर्दोष करण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला आहे. त्यांचं स्वतःचं कार्य संपलेलं आहे. व्यक्तिगत काही कार्य

राहिलेलं नाही. पूर्ण आनंद त्यांनी मिळवलेला आहे. त्यामुळे अशा महात्म्यांचं लोकांकडे लक्ष जाणं हे लोकांचेसुध्दा सुदैव आहे. कोण आपल्याला उपदेश करणार आहे अशाप्रकारचा ? यांना काय जरुर आहे? असे वाटून उपयोग नाही. महात्मे सांगतात तो चांगला मार्ग आहे. पण त्या मार्गाने आपलं मन जाऊ शकत नाही. काहीतरी मनामध्ये प्रतिबंध आहे याची जर जाणीव असेल तर त्याकरता सांगणारा जो आहे त्याचे ऐकावे. कोणचे प्रतिबंध कसे दूर करता येतील हे तो सांगू शकतो ना ! त्याकरता प्रयत्न करणं. हा शब्दांचा परिणाम ज्यांच्यामुळे होतो असेही महात्मे आहेत.

त्यांना परब्रह्माचं ज्ञान झालेलं आहे. स्वतःलाही ज्ञान झालेलं आहे. दुसऱ्यालाही ज्ञान देऊ शकतात ते. ज्ञानेश्वरी आहे, एकनाथी भागवत आहे, अमृतानुभव आहे, ग्रंथ करून ठेवले आहेत संतांनी. प्रत्यक्ष ते असताना जर एखादा जिज्ञासू बुध्दीने गेलेला असेल त्यांच्याजवळ, तर त्यालासुध्दा ते सांगू शकतात ना ! इतके ग्रंथ निर्माण करणारे जे आहेत त्यांना काय दुसऱ्याला सांगता येणार नाही? तर शब्दांनी दुसऱ्याला ज्ञान करुन देणारे असे ते ज्ञानी महात्मे असतात. पूर्ण आत्मज्ञान त्यांना झालेले असते. परमेश्वराचे पूर्ण ज्ञान झालेले असते. त्याचे पूर्ण स्वरूप त्यांनी जाणलेले असते. म्हणजे ईश्वररूप ते झालेले असतात. ईश्वरामध्ये आणि त्यांच्यामध्ये भेदच राहात नाही. जीवभाव ज्यांचा गेलेला आहे. जीवन्मुक्त ज्यांना म्हणतात. शरीर आहे पण मुक्त आहेत. कोणचंही बंधन नाही, अहंकार नाही, दंभ नाही.

भगवद्गीतेमध्ये दैवी संपत्ती आणि असुरी संपत्तीचे भगवंतांनी पुष्कळ वर्णन केलेलं आहे. दैवी संपत्तीचा विकास त्यांनी करून घेतलेला आहे, त्यामुळे असुरी संपत्ती कशाला येईल त्यांच्याजवळ? शांती आहे, राग नाही. नाथ महाराजांना राग आणण्याकरता बक्षिस लावावे लागत



होते, ही ऐकतो गोष्ट आपण. ही पूर्ण शांतीची स्थिती आहे. मन, बुध्दी अत्यंत स्थिर व्हायला पाहिजे. मनात कोणतेही विकार, तरंग येऊन उपयोग नाही. समुद्राचे पाणी शांत आहे, लाटा नाहीत काही नाही. तशी स्थिती ज्यांची ज्ञानप्रभावामुळे झाली आहे असे ज्ञानी महात्मे हे, जाणायचे ते जाणतात. जे बाहेर पसरलेले आहे त्याची त्यांना जरूरच नाही. जे राहाणारच नाहीये ते जाणून घेतलं काय किंवा त्याच्याबद्दल आसक्ती धरली काय, उपयोग काय आहे?

पुष्कळ आयुष्य मिळालं, पुष्कळ संपत्ती मिळाली तरी सुख मिळेल असं नाही. एक राजा चांगला होता. प्रजाजनांचं त्याच्यावर प्रेम होतं. त्या सगळ्या लोकांनी ईश्वराची भक्ती केली, प्रार्थना केली. प्रसन्न झाले ईश्वर. त्यांनी लोकांना विचारले, 'काय पाहिजे ? ' लोक म्हणाले, 'आमच्या राजाला दहा हजार वर्षे आयुष्य द्या.' राजाला काही विचारलं नाही, काही नाही. 'तुमचा राजा दहा हजार वर्षे जिवंत राहील' असं ईश्वराने सांगितले. लोकांनी राजाला येऊन सांगितले, 'राजेसाहेब, तुम्हाला आनंदाची बातमी आहे. ईश्वराने तुम्हाला दहा हजार वर्षे आयुष्य दिले आहे.' राजा म्हणाला, 'काय केलंत तुम्ही ! मला आधी विचारलं का नाहीत ? मी इतकी वर्षे जगणार म्हणजे माझ्या देखत तुम्ही सगळे जाणार. मी इतकी वर्षे जगून काय करायचं ?' म्हणजे राजाचं आयुष्य वाढविलं त्या प्रजाजनांनी प्रेमाने, पण हित साधलं नाही. राजाची दृष्टी वेगळी आहे.

हा विचार ते ज्ञानी महात्मे करतात. आयुष्य पुष्कळ आहे. परंतु मनाला शांती नाही, मनाला समाधान नाही. त्यामुळे अनित्य आणि दुखःमय सगळे आहे. अशा लोकांमध्ये तू जन्माला आला आहेस, असे भगवान् सांगताहेत. तेव्हां पूर्ण आणि नित्य आनंद जर तुला पाहिजे असेल तर माझं भजन तू कर. तर नित्य काय आहे आणि अनित्य काय

आहे याचा पूर्ण विचार ज्यांनी केला आहे त्यांचं मनही तयार झालेले आहे. विवेकसंपन्न मन आहे. प्रत्येक वेळेला विवेक आहे. पूर्ण हित कोणचं इकडे त्यांचं लक्ष आहे. आपल्या मनाला कसं बर वाटतं इकडं लक्ष नाही.

तर तो विचार पूर्ण मनामध्ये असल्यामुळे ह्या बाह्य संसारामध्ये कितीही उत्कर्ष दिसला, वाटला तरी ते सर्वही अनित्य आहे. दोन वर्गच त्यांनी केले आहेत.नित्य कोणचे आहे आणि अनित्य कोणचे आहे हे समजून घेण्याकरता मन आहे. पण ते मन शुध्द झाले पाहिजे. ते शुध्द करण्याकरता त्याच्यामध्ये अशुध्दी किती प्रकारची आहे, ती कशी दूर करता येईल, त्याचे उपाय कोणचे हे जाणणारे कोणीतरी भेटले पाहिजे.

रोग्याला काही स्वतःला कोणचा रोग झालाय कळत नाहीये. तो किती वाढला आहे, केव्हां जाईल याचे ज्ञान त्याला नाही ना ! जो शरीरशास्त्रज्ञ असेल त्याच्याकडेच त्याला जावे लागेल. तो सांगेल त्याप्रमाणे औषध वगैरे उपाय करावे लागतील.

तर अशा संतांची, सद्‌गुरुंची जर भेट झाली तर योग्य मार्गदर्शन ते करीत असतात. असे जे महात्मे आहेत त्यांचं वर्णन महाराजांनी केलं आहे. गुरुस्तुती म्हणून सात आठ श्लोक आहेत. कोणी एक भक्त, तुकाराम नावाचा, गाणगापूरला देवाची सेवा करीत होता. महाराजांना देवांनी आज्ञा केली, 'ह्याला तुम्ही काहीतरी मार्गदर्शन करा.' त्यावेळेला हे स्तोत्र त्यांनी केलं आहे. त्यापैकी एक श्लोक आहे, महत्वाचा आहे,-

अखंड आत्मा अविनाशी दत्त ।
तया पदी लाविती जे स्वचित्त ।
वित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ ।
तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ।।



या गुरुस्तुतीतल्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी 'तो पूर्ण आनंद गुरु समर्थ' असे आहे. पूर्ण आनंदरूपी सद्‌गुरु आहे. 'ब्रम्हानंदम् परम सुखदम्....' हे आनंदरूप सद्‌गुरुंचं स्वरूप आहे.

तर असे जे गुरु आहेत, पूर्ण आनंदरूप बनून गेलेले आणि ते समर्थ आहेत. शिष्याची सुधारणा करण्याचं सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. त्याचं वर्णन केलेले आहे-

अखंड आत्मा अविनाशी दत्त.......

गुरुमहाराजांच्या जवळ काय आहे ? आत्मस्वरूप जे आहे, ईश्वररूप, ते त्यांच्याजवळ आहे. ते ईश्वरस्वरूप म्हणजे एक आहे, अखंड आहे. ईश्वरभक्तीमध्ये जे अनेक प्रकार असतात, त्यातून जाता जाता, ईश्वर एक आहे ही बुध्दी झाली पाहिजे. तरच तो ज्ञानाचा अधिकारी होतो. ईश्वर आणि जीव एकरूपच आहेत हे शेवटी कळायचं आहे. मी ब्रह्मरूपच आहे, मी संसारी नाही, हे शेवटी कळायचे आहे.

पण अगोदर जीव कोण आहे हे स्पष्ट कळले पाहिजे. ईश्वर कसा आहे हे सुध्दा कळले पाहिजे. मग जीव आणि ईश्वर एक आहे हे नंतर ज्ञान होतं. त्यातही पुन्हा सद्‌गुरु हे ईश्वराचे स्वरूप आहे हे समजत नाही. ईश्वर श्रेष्ठ आहे अशी कोणाची बुध्दी असते, तर दुसऱ्या कोणाला वाटतं, सद्‌गुरु हे निराळे आहेत, सद्‌गुरु हेच श्रेष्ठ आहेत. इथे श्रेष्ठकनिष्ठ व्यवहार काही उपयोगी नाही. विश्व निर्माण करणं, त्याचं संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा उपसंहार करणं ही ईश्वराची कार्ये आहेत.

जीवांच्या बुध्दीतले दोष काढून टाकणं, त्यांची बुध्दी, मन हे स्थिर करणं, त्या बुध्दीमध्ये आत्मप्रकाश- ईश्वरस्वरूपाचा प्रकाश करणं हे कार्य सद्‌गुरुंचं आहे. ईश्वराचं ऑफिस निराळं आहे आणि सद्‌गुरुंचं ऑफिस निराळं आहे. निराळं आहे याचा अर्थ ते वेगवेगळे आहेत काय ?

तर नाही, कार्य करणारी रूपं वेगळी वेगळी आहेत.

म्हणून सद्‌गुरु स्वरूपाने हे कार्य परमात्मा करतो आहे. दत्तात्रेय, श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंहसरस्वती, वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज, शंकराचार्य महाराज ही सगळी ईश्वराची रूपं आहेत. सद्‌गुरुरूपानी आलेली आहेत. अज्ञानातून जीवाला बाहेर काढायचं हे कार्य त्यांच्यापुढे आहे. आणि ते कार्य अखंड चालायचं आहे. म्हणून सद्‌गुरुमूर्ती अदृश्यरूप नाही, ईश्वराचेच ते एक रूप आहे. ईश्वरानेच सद्‌गुरुंचं रूप घेतलेलं आहे आणि त्यारूपाने ईश्वराचे कार्य चाललेले आहे.

तर हे जे ज्ञानी महात्मे आहेत, जे ईश्वररूप बनलेले आहेत, तेच सद्‌गुरुरूप आहेत. त्यांचं पहिलं लक्षण सांगितले आहे-

अखंड आत्मा अविनाशी दत्त ।
तया पदी लाविती जे स्वचित्त ।

आपलं अंतःकरण त्या परमेश्वराच्या चरणी ज्यांनी लावलेलं आहे. दुसरं काही नाही मनात. 'विषय तो त्यांचा झाला नारायण' म्हणतात. मनामध्ये दुसरा विषय नाही. त्याच आनंदामध्ये ते निमग्न आहेत. मनामध्ये ईश्वराशिवाय दुसरं काही नाही.

संसारात राहूनही त्यांना त्याचं काही भान नाही. नाथ महाराज संसारीच होते. पूजा अर्चा चालू आहे, उत्सव वगैरे चालू आहे, त्याचप्रमाणे प्रवचनं चालू आहेत. अखंड चाललेलं आहे. अखंड ईश्वराचं अनुसंधान चाललेलं आहे. ही स्थिरता बुध्दीमध्ये उत्पन्न झाली पाहिजे ना ! स्थितप्रज्ञाची जी लक्षणे सांगितली आहेत दुसऱ्या अध्यायामध्ये भगवंतांनी, ती इथे दिसतात. मनामध्ये कोणच्याही वासना राहून उपयोग नाही. असे झाले म्हणजेच त्याची बुध्दी स्थिर झाली. त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.



परमात्म्याच्या स्वरूपाच्या ठिकाणी अखंड अंतःकरण लागलेलं आहे. ते ईश्वरस्वरुप झालेलं आहे-

अखंड आत्मा अविनाशी दत्त ।

अखंड म्हणजे ज्याच्यामध्ये भेद काही नाही. अनंत देव आहेत भारतामध्ये. ईश्वराचं पूर्ण दर्शन म्हणजे परमेश्वर एकच आहे हे जाणणे. मी सुध्दा त्याच्यापेक्षा वेगळा नाही. हे ईश्वराचं पूर्ण दर्शन आहे. नामदेवांना सुध्दा पाठवलं पांडुरंगनी 'जा, तुला पक्कं व्हायचंय ना. कच्चं मडकं म्हटलं म्हणून आपला अपमान झाला असं वाटतंय ना. ईश्वराचं पूर्ण दर्शन होण्याकरता पूर्ण ज्ञानी जो महात्मा आहे त्याच्याकडे तुला जायला पाहिजे.' वेळ लागत नाही. नामदेव गेले. त्यांना सद्‌गुरु भेटले. त्यांच्या एका वाक्यानेच नामदेवांना पूर्ण बोध झालेला आहे. कारण सगुण भक्ती त्यांनी मिळवली होती ना ! साक्षात्कार झाला होता. त्यामुळे ती पूर्णता यायला वेळ लागला नाही.

तर आत्मस्वरूप परमात्मा हा अखंड आहे म्हणजे एक आहे. सर्वत्र ईश्वर एक आहे ही बुध्दी पाहिजे. गणेश पुराणामध्ये गणेशांनी गीतेचा उपदेश वरेण्य राजाला केला तेव्हां हे सांगितल. शिव असो, विष्णु असो, शक्ती असो, सूर्यनारायण असो. बाहेरुन दिसणारी ही रुपं ! ह्या सर्वही स्वरुपामध्ये अभेद आहे. एकच तत्व आहे. ही बुध्दी ज्याला उत्पन्न झाली तो मोठा योगी आहे. अखंड आहे परमात्मा, सर्वत्र एक आहे. हे त्याला कळलेलं आहे.

प्रल्हादजींच्या मनामध्ये आपल्या बापाबद्दल द्वेष काही आला नाही. प्राण घेणारा बाप आहे. 'हरीचं भजन सोडलं पाहिजे. माझा शत्रू आहे हरी. माझ्या भावाला त्याने मारलेलं आहे. त्याचं तू भजन करतोस ?' ह्या वक्तव्यावर प्रल्हादजी म्हणाले, 'मी भजन करीतच नाही. बुध्दीला प्रेरणा करणारा तो परमेश्वर आहे. त्याच्या प्रेरणेनेच माझी बुध्दी तिकडं

जाते !' इतकी शुध्द भक्ती आहे अंतःकरणामध्ये म्हणजे कर्तृत्व स्वतःकडे घेतच नाही. मी भजन करतच नाही. आणि ही खरी गोष्ट आहे.

आपण उपासना करतो आहेत असं ज्याला वाटतं त्याची उपासना पूर्ण व्हायला अजून अवधी आहे अस समजावं.

~~यदपि~~ केनापि देवेन हृदिस्थितेन
यथा नियुक्तोसि तथा करोमि ।।

अशी बुध्दी आहे प्रल्हादजींची. त्यामुळे पित्याने जरी प्राण घेण्याचे अनेक प्रयत्न केले- तरीसुध्दा मनावर काहीही परिणाम नाही. तापलेल्या तेलाच्या कढईत टाकले. कड्यावरुन ढकलले, गुहेत कोंडून धूर करुन गुदमरवून टाकण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष पिताच त्यांच्या जीवावर उठला होता. पण त्यांच अखंड भजन चाललय.

चांगले आणि वाईट ही खालची वृत्ती आहे. चांगले वाईट काही नाही. त्याच्या त्या बुध्दीलाही प्रेरणा करणारा ईश्वरच आहे. मला त्याच्या भक्तीची प्रेरणा करणाराही तोच आहे. त्यात विरोधाचं कारण काय आहे? हा माझा शत्रू असं समजण्याचं कारण काय?

यामुळे जरी कोणी कितीही त्रास दिला, काही श्रम, कष्ट झाले तरी त्याच्याबद्दल उपेक्षा बुध्दी त्यांची, ज्ञानी महात्म्यांची असते. कारण भौतिक सुखाकडे त्यांच लक्षच नाहीये. खांबातून नरसिंह प्रगट झाले आणि हिरण्यकश्यपूचा नाश केला त्यांनी. तेव्हा प्रल्हादजी म्हणाले, 'माझ्या पित्याचा उध्दार करा. अज्ञानामुळे त्यांनी तुम्हाला ओळखलं नाही. तुमची शक्ती माहीत नसल्यामुळे त्यांनी तुमचा द्वेष केला. त्याबद्दल त्यांना क्षमा करा.' पण भगवंतांनी त्यांना सांगितलं, 'तुझ्या एकट्या पित्याचाच नव्हे तर तुझ्या एकवीस पिढ्यांचा उध्दार झाला आहे. कारण त्यांच्या कुळामध्ये तुझ्यासारखा महान् भगवद्भक्त निर्माण झाला.' इथे भक्ताचं महत्व देवाने वर्णन केलं आहे.



तर ईश्वर स्वरुप अखंड आहे, ही जर भावना मनामध्ये दृढ झाली तर राग द्वेषादिक विचार कशाला निर्माण होतील? मन हे अत्यंत स्थिर, शांत राहिलं पाहिजे आणि परमात्मा अविनाशी आहे हे जाणले पाहिजे. ईश्वरस्वरुप हे अविनाशी आहे, परमात्मा हा अविनाशी आहे. जीवाला जोपर्यंत देहाभिमान सुटलेला नाही तोपर्यंत तो जीवात्मा विनाशी आहे. पुन्हा मृत्यू आहे, पुन्हा जन्म आहे. तो समजतो आहे म्हणून आहे. 'मला मृत्यू येणार आहे,' हे तो समजतोय म्हणून त्याला मृत्यू आहे.

पण शुध्द मी कोण आहे, हे जर त्याला कळून आले तर तोही तसाच अविनाशी आहे.देह अनित्य आहे. देहामध्ये राहाणारा जीवात्मा नित्य आहे. आरंभालाच हा उपदेश अर्जुनाला भगवंतानी केलेला आहे. भगवान म्हणाले,अनेक जन्म जीवाचे जातात पण जीव नष्ट होत नाही. घेतलेलं शरीर सोडणं म्हणजे मृत्यू आहे. नविन शरीर धारण करणं म्हणजे जन्म आहे. मृत्यू कायमच आहे. ही जाणीव अगोदरच त्याला करून दिलेली आहे. आणि मग ईश्वरस्वरूप कसं आहे, विश्वव्यापी कसं आहे, ते विश्वरूप दाखवलं त्याला.

म्हणून ईश्वर अविनाशी आहे ही उपासकाच्या मनामध्ये भावना पाहिजे. आपल्याला मृत्यू येणार, आपला नाश होणार असं अज्ञानाने वाटते कारण देहालाच तो, 'मी' समजतो. देहाला मृत्यू ठरलेलाच आहे. देहाबरोबर मलाही मृत्यू आहे कारण देह म्हणजेच मी आहे, असं जरी तो समजत असला, तरी आपला उध्दार करणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे म्हणून तो सर्वांचा गुरु होऊ शकतो. आणि हे ज्ञान झाल्यानंतर उपासनाही दृढ होते आहे. तर याप्रमाणे, 'अखंड आत्मा अविनाशी दत्त । तया पदी लाविती जे स्वचित्त ।' हे एक ज्ञानी महात्म्यांचे, सज्जनांचे, सद्गुरुंचे लक्षण त्यांनी सांगितले आहे.

त्यांच्या मनामध्ये अखंड परमात्मरूप आहे. सगुण निर्गुण

कोणचंही दत्तरूप का होईना ते त्यांच्या मनामध्ये आहे. सगुणही तो आहे आणि निर्गुणही तोच आहे. आणि दुसरी बाजू त्यांनी दाखवली आहे- 'वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ ।' हा जो संपूर्ण भ्रम आहे- संसार ज्याला आपण म्हणतो तो त्याच्या दृष्टीने भ्रम आहे. आपल्याला तो भ्रम वाटत नाही. आपल्याला तो सगळा खराच वाटतो. तसे संस्कार अनेक जन्मांपासून आमच्याकडे आलेले आहेत, आमच्या बुध्दीवर झालेले आहेत. तर संसार सत्य आहे, सगळीही सुखं दुःखं वगैरे खरी आहेत. असेनात. पण ही सगळी दुःखं घालवणारा सगळी सुखं देणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे. ही बुध्दी जर कायम असेल तरी कल्याण आहे.

पण हा सर्व भ्रम आहे. हा भ्रम ज्यांच्या मनातून पूर्ण गेलेला आहे ते ज्ञानी आहेत ही एक दुसरी बाजू दाखवली आहे. हा दोष नाही आणि ईश्वराच्या ठिकाणी अखंड चित्त लागलेलं आहे, मन स्थिर झालेलं आहे. झोपसुध्दा नाही. समाधीचा अभ्यास करणारे जे महात्मे आहेत त्यांना झोप कुठली लागणार ? आहार विहाराकडे लक्ष नाही. काय आवश्यक असेल तेवढं करायचं. आणखी अखंड अनुसंधान करायचं. संन्यास आश्रम तेवढ्यासाठी सांगितलाय ना ! सगळ्या व्यापातून ज्यांचं मन बाजूला झालं आहे. त्याग सगळ्याचा ज्यांनी केला आहे मनातून. बाहेरून त्याग नाही. बाह्य त्यागाला त्याग म्हणत नाहीत. त्यांना दुसरं काहीही करायचं नाही फक्त ईश्वराचं अनुसंधान करायचं आहे. निर्गुणाचं किंवा सगुणाचं एकच रूप आहे. सद्गुरुंच अनुसंधान केलं तरी हरकत नाही, ईश्वराच्या ज्या अनेक लीला झाल्यात त्यांच अनुसंधान झालं तरी हरकत नाही. पण दुसरा विषय नाही.

तेव्हां मनाला दुसरा विषय नसणं ही जी मनाची स्थिती त्यांनी बदलून टाकली आहे त्याला किती प्रयत्न करायला लागला असेल ! ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी त्यांचं मन इतकं स्थिर झालं आहे म्हणून त्यांच्या



जवळ गेल्यानंतर दुसऱ्या गोष्टीच नसतात. त्यांच्याकडून नेहमी पारमार्थिक गोष्टी आपल्याला ऐकायला मिळतात, ईश्वराचे गुण ऐकायला मिळतात. आणि त्यामुळे आपल्या मनावरही परिणाम होतो.

संसारही आहे मनामध्ये आणि ईश्वराचं अनुसंधानही आहे, असं दोन्ही होऊ शकत नाही. ईश्वराचं अनुसंधान जरी असलं तरी ते सकाम असणारं आहे.सांसारिक सुखाकडे अधिक लक्ष लागलेलं आहे. आणि त्या प्रमाणे सगळी सुखं आपल्याला मिळावीत म्हणून ईश्वराकडे लक्ष लागलय. तोही दोष आहे म्हणून त्यांनी दोन विभाग केले. संपूर्ण संसार, धन लोभ म्हणून जो आहे तो त्यांच्या मनातून पूर्णपणे गेलेला आहे. काही नाही. त्याच्याकडे लक्षंच नाहीये. राहिलं काय आणि नाही राहिलं काय. 'ठेविले अनंते तैसेची रहावे' हा एक त्यांचा मोठा गुण आहे.

सांसारिक दृष्टीने हा अभ्यास आहे. आणि परमेश्वर चिंतना मध्ये अनन्य झालेत ना ते ! अन्य सगळं मनातलं काढून टाकून ईश्वराचं चिंतन करतायत. दुसरा कोणचाही विचार मनात न आणता, ईश्वराच्या निर्गुण स्वरुपाचं चिंतन अखंड चालू आहे. त्याचे सामर्थ्य किती असेल ! ईश्वर निरंतर मनामध्ये आल्यानंतर ईश्वराला अवतार घ्यावा लागतो ना !

प्रल्हादजींनी काही मागितलं नव्हतं. सगळं सहन करीत होते ते. नाथमहाराजही सगळं सहन करीत होते. ज्ञानी महात्म्यांची तितिक्षा मोठी असते. आणि त्या तितिक्षेचा परिणाम असतो. परमेश्वराला कशाचाच अभिमान नाही. अत्यंत अलिप्त ईश्वरस्वरुप आहे. शंकराचार्य महाराजांनी ईश्वराला पावसाची उपमा दिली आहे. पर्जन्याप्रमाणे ईश्वर आहे, त्याला काही दोष द्यायचं कारण नाही. उत्तम जमिनीमध्यें पाऊस पडला तर उत्तम पीक येईल. खडकावर पडला, समुद्रात पडला तर फुकट जाईल. तो दोष काय त्या पावसाचा आहे काय ! जमीन कशी आहे, कोणच्या जमिनीत तो पाऊस पडलाय त्या जमिनीचा गुण आहे. पाऊस हा काही

त्याला उपकरण नाही.

अनुकूल आणि प्रतिकूल या दृष्टीने परमात्मा अलिप्त आहे. ज्याने ज्याने जशी कर्म केलीयेत, त्याला त्याला तशी फळ देऊन मोकळा, पुन्हा काही नाही. कोणचाही पक्ष नाही काही नाही. अशी स्थिती असताना सुध्दा प्रल्हादाला जिवंत ठेवलं पाहिजे अशी बुध्दी का व्हावी ईश्वराला ? अलिप्त बुध्दी असताना फक्त सृष्टीचं कार्य चाललं आहे, जीवांच्या कर्माप्रमाणेच चाललेलं आहे. त्याचं सुध्दा स्वतःकडे कर्तृत्व घेत नाहीत म्हणे, सृष्टी निर्माण करताना जीवांची कर्म त्याने लक्षात घेतली आहेत. त्या कर्माप्रमाणे सृष्टी विषम झाली आहे. आणि त्याच फलही देण्याचं कार्य चालू आहे.

पण अशी स्थिती असतानासुध्दा प्रल्हादजींचा अभिमान त्यांनी का धारण केला ? त्याला जिवंत ठेवण्याकरता भगवान्, स्वतंत्र नरसिंहाचा अवतार घेऊन आले. हिरण्यकश्यपूने त्रैलोक्याची सत्ता मिळवली आहे. तपश्चर्या केलेली आहे. पण वृत्ती बदलली नाही. तपश्चर्या करुन ब्रम्हदेवांकडून वर मिळवला आणि त्रैलोक्याची सर्व सत्ता ताब्यामध्ये आणलेली आहे. पण तो स्वतःला ईश्वर समजतोय. प्रल्हादजी स्वतःला ईश्वर समजत नाहीयेत. असेल, तत्वज्ञानाच्या दृष्टीने ती भूमिका असेल पण उपासकाच्या भूमिकेमध्ये जे प्रल्हादजी आहेत ते भक्त म्हणूनच राहिले.

मारुतीरायांनी रामचंद्रांना सांगितलं, देहदृष्ट्या मी 'दासोहम्'. मी देहदृष्टीने तुमचा दास आहे. तुमच्या आज्ञेचं पालनं करणं माझं कर्तव्य आहे. जीवदृष्ट्या तुमचा अंश आहे. या देहामध्ये राहाणारा मी जीवात्मा आहे, असं जेव्हा वाटतं त्यावेळेला मी तुमचा अंश आहे. पण तुम्ही किती मोठे आहात आणि मी अंश तो केवढा ! समुद्राच्या लाटेबद्दल बोलायचं झाले तर लाट ही केवढी असणार, समुद्र केवढा असणार ! म्हणजे



जीवदृष्ट्या तुमचा अंश मी अविनाशी असलो, तरी लहान आहे. आणि ती आत्मदृष्टी उत्पन्न झाली की 'मी' ही गेला. 'वासुदेवः सर्वम्.' ज्ञानभूमिकेवर गेलेल्याला सगळंच ईश्वररूप आहे.

परंतु भक्तांची जी भूमिका आहे, त्या भूमिकेवर असणारे जे महान भक्त आहेत, ते मात्र भक्तच राहातात. 'दासोहम्' असे म्हणून प्रल्हादजींनी तुमची मला दास्यभक्ती द्या असं मागून घेतलं शेवटीं, सेवा करायला.

भगवान सदाशिवांनीसुध्दा असा विचार केला आहे. शंकर हे विष्णूंचे भक्त. देवची म्हणजे रामचंद्रांची सेवा करायची आहे म्हणाले. कोणच्या रूपाने सेवा करावी? त्यांनी हे वानराचं रूप पसंत केलं. कुठंही झाडाची फळं मिळतील ती खावी, पाणी प्यावं नदीचं, आणि सेवा करावी. पगार वाढ करा, अमूक करा, संप करा काही प्रश्न नाही. मालकाला काहीही त्रास नाही. नुसती अखंड सेवा घडली पाहिजे. देवाकडून काही घ्यायचं नाही. सेवा फक्त करायची. त्यामुळे आपण या दास्यभक्तीमध्येच रहावं असं त्यानां वाटलं. ज्ञानी भक्त झालेले शुक्राचार्य, महाराजांच्यासारखेसुध्दा भागवताचं अखंड अनुसंधान करताहेत. भगवान् श्रीहरींच्या लीलांचं अनुसंधान त्यांचं अखंड चाललंय ! त्यांना त्या निर्गुण निराकार आत्मज्ञान समाधीमध्ये राहता येणार नाही असं नाही.

तर ही जी भक्ती आहे ईश्वराची किंवा जे ईश्वरस्वरूप सद्गुरु आहेत, ज्यांनी ईश्वरस्वरूप जाणलेलं आहे आणि अंतःकरण आपलं त्या ठिकाणी स्थिर केलेलं आहे अशा प्रकारचे जे महात्मे आहेत त्यांच्या मनांतला संसारभ्रम सगळा दूर झालेला आहे. वित्तभ्रमा हा शब्द घातलाय महाराजांनी. वित्त म्हणजे द्रव्य. धन ज्याला आपण म्हणतो. शास्त्रकारांनी दोन विभाग त्याच्यामध्ये केलेले आहेत. - शेतीवाडी, घरदार, द्रव्य हे सगळं मानुष वित्त. आणि दैववित्त म्हणून एक आहे.

देवाने दिलेलं वित्त म्हणजे उपासना. हे ज्याने मिळवलेलं आहे. मानुषवित्ताकडे लक्ष ठेवलेलं नाही. दैवी वित्ताची उपासना करण्याकडे अखंड लक्ष लागलं आहे. आणि ती उपासना त्याची पक्की झालेली आहे . उपासना पक्की होणं याचा अर्थ त्याचा भ्रम गेला पाहिजे. मी उपासना करतो आहे अशी कर्तृत्वभावना नाहीशी झाली पाहिजे. सद्‌गुरुंची उपासना असो किंवा ईश्वराची उपासना असो, एकच आहेत ते दोघेही. उपासनेचं कर्तृत्व जोपर्यंत मनामध्ये आहे तोपर्यंत उध्दार नाही. मी उपासना करणारा आहे असं जर वाटत असेल तर त्यामुळेही अधःपात होतो.

भागवतामध्ये जयविजयांची कथा आलेली आहे. भगवान् विष्णूंचे द्वारपाल दोघे होते. अगदी विष्णूंसारखं रूप. सरूपता होती. विष्णूलोकात कुठंतरी राहिले असं नाही. विष्णूंचं ज्याठिकाणी स्थान आहे, तिथं दारावर आहेत. आणि त्यांच्याप्रमाणेच रूप आहे. इतक्या उच्च गतीला पोहोचलेले अशा प्रकारचे जयविजय, पण त्यांच्याही अंतःकरणामध्ये अभिमान होता म्हणा किंवा मनाकडे इतकं लक्ष त्यांनी दिलं नाही म्हणा. ब्रम्हदेवांचे मानसपुत्र सनक,सनंदन, सनत् कुमार बालवेषामध्ये तिथे आले. पहिल्यापासून बालरूपच त्यांचं आहे म्हणतात.

कालानी शरीरामध्ये जास्ती जास्ती परिणाम होतो, रूपांतर होत जातं. लहान असलेलं शरीर मोठं होतं. तरूण असलेलं शरीर वृध्द होतं. शरीराचं रुपांतर होणं, शरीरावर परिणाम होणं, हे कालाचं कार्य आहे. कोणीही असो, वृध्दावस्था ही येणारच त्या शरीराला. पण यांना तसं नाही. पाच वर्षांचे कायम आहेत. ज्ञानी महात्मे. अनेक जन्मांचं सुकृत आहे त्यांचं. पूर्ण ज्ञान मिळालेलं आहे. शक्ती मिळालेली आहे. आपलं शरीर वाटेल तसं ते ठेऊ शकतात. त्यामुळे लहान मुलं आलेली आहेत. देवाच्या दर्शनाला जाणार आहेत पण दारावर असलेल्या जयविजयांनी

२४



त्यांना आत जायचं नाही म्हणून सांगितलं. ब्रम्हलोकातून आले होते ते, ज्ञानी महात्मे होते. पण बाह्यरुपाला पाहून जयविजयांना वाटलं ही लहान मुले आहेत. विष्णूंच्या रूपामध्ये असलेले ते द्वारपाल. सरूपता मुक्ती ज्यांना मिळाली आहे, रोज ज्यांना विष्णूंचं दर्शन होतय पण त्यांना ह्या लहान मुलांची ओळख पटली नाही. त्यांनी ह्यांना सांगितलं, 'तुम्ही तिथे जायला योग्य नाही आहात.'

भगवंताच्या प्रेरणेनेच सगळं झालं. बुध्दीत सुधारणा व्हायला पाहिजे ना ! रावणादिक अधर्माच्या मार्गाने गेले, त्यांची सुधारणा झाली नाही. हे जयविजय भक्तीच्या मार्गाने गेले तरीसुध्दा त्यांच्या बुध्दीची सुधारणा झाली नाही. या सृष्टीमध्ये ईश्वराची लीला चालू आहे. रामावतारामध्ये शेवटी सर्व अयोध्यावासी लोकांना घेऊन रामराय निजधामास गेले. कृष्णावतारामध्ये अनेक असुरांचा नाश केला, सज्जनांचं संरक्षण केलं आणि शेवटी यादवांचा नाश करुन गेले. हे म्हणाले, पुढे चालू राहाणार. चांगली भूमिका मिळालेली आहे पण ती टिकली पाहिजे ना! मनाची सुधारणा करण्याकडे त्यांची दृष्टी नाही. त्यामुळे ते(जयविजय) जरी आपले भक्त असले तरी त्यांची सुधारणा झाली पाहिजे ही भगवंतांची दृष्टी आहे. सुधारणा म्हणजे पुढच्या कोणच्यातरी जन्मात त्या सर्व यादवांचा नाश करुन ते गेले. दोन्ही कार्यं चालू आहेत.

तर ते चौघे ब्रम्हज्ञानी महात्मे विष्णूदर्शन करायला आलेले आहेत. सगुण भक्तीही मनामध्ये पुष्कळ आहे. निर्गुण श्रेष्ठ आणि सगुण कमी अशा प्रकारची भावना मनामध्ये नाहीये. इकडे त्यांना प्रतिबंध झाल्यावर त्यांनी जयविजयांना सांगितलं, 'तुम्ही इथे राहू शकत नाही. विष्णूलोकामध्ये राहायला तुम्ही अपात्र आहात.' परस्पर व्यवस्था झाली. त्यांचे काही प्रसंग पाहिले असतील विष्णूंनी. पूर्वी एकदा लक्ष्मीदेवीलासुध्दा अडवलं होतं जयविजयांनी. तिनेही शाप दिला होता.

तर, 'वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ' यांच्याबद्दल हा प्रसंग चाललेला आहे. मी उपासना करणारा आहे, मोठा भक्त आहे हा भ्रम आहे. प्रल्हादजींनी आपल्या पिताजींना आणि गुरुजींनाही सांगितलं, 'मी भक्ती करत नाही. हृदयस्थ जो श्रीहरी परमात्मा आहे त्याच्या इच्छेने भजन चाललेलं आहे. मी काहीही करत नाही.' हे ज्ञानच आहे. भक्तीच्या भूमिकेवर असून सुध्दा ज्ञानी आहेत. कर्तृत्व आपलं नाही म्हणतात.

'तुम्ही या ठिकाणी राहू शकत नाही.' ज्ञानी महात्मे आहेत. 'शाब्दे परेच निष्णातम्' म्हणजे शब्दातही सामर्थ्य आहे. आशीर्वाद देतील तर तोही मोठा आहे. म्हशीला दूध नाही ती बाई म्हणती आहे, नुसती बांधली आहे तिला दूध येत नाही. पण नरसिंह सरस्वती म्हणतात, 'अहो, ती दूध देणारी म्हैस आहे.' महात्म्यांचा शब्द आहे. ती जर हट्टानी म्हणाली असती, 'नाही देत म्हैस दूध, तुम्ही काय सांगता !' तर महाराज निघून गेले असते. पण तो महात्मा सांगतो आहे. म्हणून ती गेली म्हशीजवळ आणि दूध मिळालं. अशीही शब्दामध्ये शक्ती आहे.

मनातले सगळे विकार जर दूर करता आले आणि मनामध्ये अखंड परमात्म्याचे अनुसंधान जर चालू झाले तर त्या मनाची अशी शक्ती निर्माण होते. जो संकल्प होईल त्याप्रमाणे कार्य घडते. जो शब्द निघेल त्याप्रमाणे कार्य होतंय. ती शक्ती आम्हाला नाहीये, म्हणून सगळं खोटं आम्हाला वाटतं. 'असं घडूच शकत नाही' असं आम्ही म्हणतो आणि बाजूला राहातो. ही शक्ती खरी आहे, असं जरी वाटलं तरी प्रयत्नाला आम्ही लागू.

'विष्णूलोकांमध्ये रहाण्याला तुम्ही अपात्र आहात. हे जे मनोविकार तुमचे आहेत- हा अमूक आहे याला आत सोडायचे नाही वगैरे- ते विकार ज्या लोकामध्ये आहेत, त्या मृत्यूलोकामध्ये तुम्ही जाल.' असे म्हणून, भगवान् महाविष्णू आले बाहेर. त्यांनी सनत् कुमारांना



सांगितलं, तुम्ही दिलेल्या शापाला माझी मान्यता आहे. तुमच्या मुखातून निघालेल्या वाणीप्रमाणे होईल. तीन जन्मानंतर हे परत या ठिकाणी येतील असं त्यांना सांगा, म्हणाले. आता हे दोघेही जय विजय ऐकताहेत तिथे. आपल्या हातून अपराध घडलेला आहे. ज्यांना आपण अडवलं, ते महात्मे आहेत, ज्ञानी आहेत, त्यांना आपण ओळखले नाही आणि त्यांना पुन्हा प्रतिबंध केला दर्शनाला, ह्या स्वतःच्या दोषांकडे त्यांचे लक्ष नाही. 'आम्ही मोठे भक्त आहोत देवाचे. द्वारपाल आहोत. केवढा मोठा अधिकार दिला आहे आम्हाला.' ही अहंकाराची भावना मनामध्ये आहे. ह्या अहंकारामुळे, कर्तृत्वाभिमानामुळे त्यांचा जेव्हां अधःपात झाला त्यावेळेला त्यांच्या मनामध्ये असे विचार आले, की या विष्णूंची आम्ही इतकी सेवा केली तरी शेवटी त्यांनी आमच्यासाठी काहीच केलं नाही.

विरोधी वृत्ती उत्पन्न झाल्यामुळे ते दैत्य झाले. जाताना, पडताना जरी त्यांनी म्हटलं असतं, देवाने आमच्यावर कृपा करावी, तरी ते निदान चांगल्या जन्माला आले असते, पण हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू का झाले, तर खाली पडताना त्यांच्या मनात आले, 'देवाची आम्ही इतकी सेवा केली असताना देवाने आमच्यासाठी काहीच केलं नाही. आमचं केवढ नुकसान झालं.'

तिथून ते खाली आले मृत्यू लोकावर. पण इथे आल्यावर त्यांच्या बुध्दीवरचे ते भक्तीचे सगळे संस्कार नाहीसे झाले. हरिचा द्वेष तीन जन्म त्यांनी केला. केवढं नुकसान झालं. संतांचा अपमान करणं आणि स्वतःच्या उपासनेचा अभिमान धारण करणं यामुळे त्यांना मृत्यूलोकावर यावे लागले.

वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ ।

हा भ्रम गेला. प्रार्थना उपासना एक दैववित्त आहे. उपासना ही दैवी संपत्ती आहे. त्या उपासना मार्गाला आपण लागलेलो आहोत. परंतु

त्या ईश्वराची कृपा आहे ती. त्या सद्गुरूंची कृपा आहे म्हणून ही गुरूभक्ती घडते आहे. म्हणून त्या ईश्वराची उपासना, भक्ती आपल्या हातून घडती आहे. ही बुध्दी अंतःकरणामध्ये निरंतर ठेवून जर उपासना झाली तर त्यांना तो दोष लागत नाही. अहंकार उत्पन्न होत नाही ना !

म्हणून हा एक त्यांचा मोठा गुण सांगितला आहे-

तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ।

पूर्ण आनंदरूप ते झालेले आहेत. त्यांनी सर्व वित्त भ्रम सोडलेला आहे. संसाराची उपेक्षा केलेली आहे. संसारातून मन बाजूला काढून घेतलेलं आहे. ते ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी लावलेलं आहे. ईश्वर एक आहे, ही भावना आहे मनामध्ये. त्यामुळे शत्रुमित्र ही भावनाच नाहीये. म्हणून कोणीही, कितीही, कसाही त्रास दिला तरी त्यांच्या मनावर परिणाम होत नाही ना ! त्यांचं मन शांतच असतं, राग यायचा नाही म्हणून काही राग यायचा थांबत नाही. अहंकार जोपर्यंत अंतःकरणामध्ये आहे तोपर्यंत रागद्वेषादि विकार मनामध्ये राहाणारच. अहंकारामुळे संसारही होतो. अहंकारामुळेच परमार्थही होतो. इथे अहंकार म्हणजे शुध्द अहंकार आहे. याच मार्गाने मला जायचय. तो मार्ग मला नाही घ्यायचा. विरक्त महात्मे संसार टाकून जाताहेत.

तुलसीदासजी संसारीच होते. एक रात्र देखिल बायकोला माहेरीसुध्दा पाठवायचे नाही. पण पूर्वीच्या सुकृताचे फळ मिळायची वेळ आली. बायकोच्याच वाक्याने त्यांच मन एकदम बदललं आहे. ती म्हणाली, 'या रक्त मांसाच्या शरीरावर तुम्ही तुमचं चित्त ठेवता! तेच जर त्या आत्मारामाच्या ठिकाणी ठेवलतं तर तुमचा उध्दार होईल.'

जर महात्म्यांची कृपा झाली तर संसार बाजूला होतो. संसार मनातून जाणे शक्य आहे. आणि मग ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर होतं. ती सगळी जबाबदारी घेण्याची शक्ती आणि योग्यता सद्गुरुंच्या ठिकाणी



आहे. असे दोन प्रकार त्यांनी दाखवले. ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी बुध्दी स्थिर झाली आहे. मन दुसरीकडे जातच नाही. संसार बुध्दीतला सगळा मावळलेला आहे. ज्ञानेश्वर महाराज एका ओवीत म्हणत, विश्वाभास सगळा मावळून गेलेला आहे.

तो आत्मसूर्य परमात्मा चित्तामध्ये प्रगट झाला आहे. आणि पूर्ण आनंदरूप ते झालेले आहेत. तेच कृतार्थ झालेले आहेत. काय मिळवायचं ते त्यांनी मिळविलेलं आहे. ते सगळ्या समाजातल्या जीवांचं कल्याण करू शकतात.

इतरांना तशी योग्यताच नाहीये. स्वतःचीच सुधारणा झालेली नाही. मनामध्ये भगवंताबद्दल प्रेम नाही, अंतःकरणात अनेक दोष भरलेले आहेत, तिथे दुसऱ्याला काय शिकवणार ? म्हणून ही योग्यता त्या ज्ञानी महात्म्यांच्या ठिकाणी, सद्गुरुंच्या ठिकाणी असते. ईश्वरस्वरूप सद्गुरुंची भेट होण्याला सुध्दा आरंभाला ईश्वराला शरण जावं लागतं, भगवद् भक्तीची आवश्यकता असते. कर्मानुष्ठान व्हावं लागतं. म्हणून पहिल्यापासून गुरु आणि भक्ती बरोबरच आहेत.

आपल्याला शास्त्राने सांगितलेली कर्म करायची आपण, पण त्याच्या बरोबर ईश्वराची उपासनाही घडली पाहिजे. ईश्वराची अनेक प्रकारची ध्यानेही भगवंतांनी गीतेत सांगितली आहेत, विष्णूंचं ध्यान काय आहे, शंकरांचं ध्यान काय आहे. ज्या ज्या देवतेबद्दल आपल्या मनापासून प्रेम वाटत असेल त्या त्या देवतेच्या ठिकाणी आपलं मन स्थिर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उपासना मार्ग पहिल्यापासून चालू पाहिजे. कर्मामध्ये शुध्दी ही ईश्वराच्या कृपेने होती. ती उपासना जशी अधिक अधिक वाढत जाईल, तसं तसं मन शुध्द होत जाईल. आणि उपासक ईश्वररूप होईल. ईश्वररूप होणं, उपास्यरूप होणं ही उपासनेची शेवटची मर्यादा सांगितली आहे. त्याचं ध्यान करता करता तद्रूप होऊन जाणं महत्वाचं आहे.

शंकराचार्यांचे शिष्य पद्मपादाचार्य, नरसिंहाचे मोठे उपासक होते. नरसिंहाचे ध्यान करता करता शेवटी नरसिंहरूप होऊन जायचे. पद्मपादाचार्य नाहीतच, तिथे नरसिंहच दिसायला लागायचे. अशी उपासना आहे. हा ध्यानाचा परिपाक आहे. शुध्द अंतःकरणाने, अहंकार, रागद्वेषमल रहित अंतःकरण झाल्यानंतर ध्यानाला सुरवात झाली म्हणजे त्या ध्यानामध्ये प्रगती होते. आणि अशा त्या ध्यानाने मनाची, बुध्दीची स्थिरता होता होता त्याचा परिपाक समाधीमध्ये होतो. मनाची जास्ती स्थिरता म्हणजे समाधी आहे.

पूर्वावस्थेमध्ये त्याच मनाला 'ध्यानस्थ महिमनः' असे म्हणतात. ते अत्यंत स्थिर झाल्यावर त्याला समाधी अवस्था म्हणतात. ह्या सगळ्याही अवस्था ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात. ईश्वराच्याच कृपेने ईश्वररूप झालेले पण आपल्याप्रमाणेच मानवरूप धारण करून आलेल्या ज्ञानी महात्म्यांची गांठ भेट होते. त्यांच्याबद्दल आपल्या मनामध्ये श्रध्दाही निर्माण होती. तीही पाहिजे. जरी ज्ञानी महात्मे आपल्याला भेटले तरी त्यांना ओळखता आले पाहिजे. सनत् कुमारांना जयविजयांनी ओळखलं नाही. त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागून साधनाभ्यास चालू असताना मनाची प्रगती कशी कशी होत जाते ते पाहिले पाहिजे. त्यांच्या कृपेने आश्चर्यकारक प्रगती होऊ शकते.

म्हणून या श्लोकामध्ये महाराजांनी सद्गुरुंचं स्वरूप सांगितलं आहे. संसाराची ते पूर्ण उपेक्षा करतात. संसाराचा विचार बिलकूल त्यांच्या मनात येत नाहीत. हैद्राबादला भटजीबापू म्हणून एक महाराज होते म्हणतात. मोठे शिवभक्त होते आणि उत्तम गवई होते. शंकरांचं पार्थिव लिंग करायचं, त्याची पूजा करायची आणि मग गाण्याला सुरवात करायची. समाधी अवस्थाच ती. कोणीही आला गेला, त्याला जेवायला घालायचं, त्याचा आदर सत्कार करायचा. एकुलता एक मुलगा होता,तोही



गेला त्यांचा. काही परिणाम नाही. 'त्याचा इतकाच संबंध होता, गेला,' म्हणाले.

त्या वेळेला विदर्भातून कोणी मंडळी त्यांचं गाणं ऐकण्यासा हैद्राबादला आली. त्या मुलाला न्यायची तयारी चाललेली होती. हे स्वस्थ बसले होते. तयारी झाली की जायचं. कारण ह्यांच्या हातूनच पुढचे संस्कार होणार. ती मंडळी म्हणाली, 'महाराज, आम्ही आपलं गाणं ऐकण्याकरता आलोय.' हे म्हणाले, बरय. तंबोरा आणतो. आणि म्हणायला लागले.

मनामध्ये जर संसार असता तर शक्य झालं असतं ? किती शोक झाला असता, राग आला असता ! या वेळेला गाणं ऐकता काय तुम्ही ! पण नाही. संसार नाहीच मनामध्ये. मग मुलगा राहिला काय आणि गेला काय.

तर ही अत्यंत मोठी विलक्षण वृत्ती आहे. उदासीन अवस्था आहे, पुन्हा ईश्वराच्या ठिकाणी तितकीच तन्मयताही आहे. दोन्ही आहे. आणि अशा दोन्हीही अवस्थेमध्ये असणारे महात्मेच जगाचं कल्याण करू शकतात. पूर्ण शक्ती त्यांच्या जवळ आहे. अशी संतांची उदाहरणे आपण ऐकतो. पूर्वीच्या काळामध्ये यवनांनी पुष्कळ त्रास दिला आहे. अनेक मंदिरांची नासधूस केली. पण या संतांनी आपल्या भगवद् भक्तीच्या प्रभावाने हा वैदिक धर्म टिकवला आहे. आस्तिक्य बुध्दी सर्वांच्या मनामध्ये पक्की केलेली आहे. उध्दार होण्याला किती काळ लागला असेल ! संसार मनातून जायचा म्हणजे काही काळ लागणार नाही का ! शक्य आहे का. लगेच संसार मनातला जाईल कसा !

आपण अविनाशी आहोत. पहिली जाणीव भगवंतांनी करून दिली आहे. तू अविनाशी आहेस. जीव जरी असला तरी तो अविनाशी आहे, अनादि आहे, अनंत आहे. ही पक्की जाणीव ठेवून उपासना

करायची. हा जन्म गेला तर पुढचा जन्म आहे.

तर हे सगळे उपाय, निरनिराळ्या प्रकारचा उपदेश सद्‌गुरुंच्याकडून आपल्याला ऐकायला मिळतो आणि त्यामुळे मनामध्ये येणारे सगळे संशय दूर होतात. रमण महर्षींच्याकडे विचारायला गेलेल्या युरोपियन गृहस्थांच्या ( पॉल ब्रंटन ) मनातले सगळे संशय गेले ना ! सद्‌गुरुंच्या नुसत्या दृष्टीनेच संशयाची निवृत्ती होते. इतकं सामर्थ्य त्यांचं आहे. म्हणजे ईश्वराचं साक्षात स्वरूपच आहे ज्ञानी महात्मा म्हणजे. भगवान सांगतात , ज्ञानी महात्मा हे माझे स्वरूप आहे.

तेव्हां अशी आपल्या मनात सद्‌गुरुंची भक्ती उत्पन्न व्हावी. भक्तीतही पुष्कळ प्रकार आहेत. प्रतिबंधही पुष्कळ येतात. ते कसे दूर करायचे, काय करायचे हे सगळं ते समजावून सांगतायत आणि तशी गुरुभक्ती जर साधकाच्या कडून घडली तर मग मात्र तो परमार्थ मार्गामध्ये उत्तम प्रगती होऊन आत्मज्ञानाच्या जास्त जास्त जवळ जातो. ईश्वराचं पूर्ण दर्शन त्याला त्या अभ्यासाने होते. साधनाभ्यासाने पूर्ण ईश्वरदर्शन झाल्यावर तो कृतार्थ होतो.

वर्षातून काही काल का होईना अशा प्रकारच्या महात्म्यांचे आपल्याकडून अनुसंधान घडावे. आपल्याला मनाची, बुध्दीची तयारी कशी करायची आहे हे समजून येण्याकरता तरी हे चिंतन घडले पाहिजे. त्याचं मन कसं झालेलं आहे ? तेवढं आपलं मन कसं होईल? संसाराबद्दल पूर्ण उपेक्षा, संसार नाहीच मनात.मुलगा गेला तरी नाही, असला तरी नाही. आणि ते मोकळं झालेलं मन ईश्वराच्या ठिकाणी स्थिर होतं. ते पुन्हा संसाराकडे येत नाही. हा एक मोठा चमत्कार आहे. त्यांची उपेक्षा बुध्दी इतकी झालेली आहे की संसाराबद्दल कसलीच आसक्ती नाही. इतकी विरक्ती आहे.



विरक्तीचे सुध्दा पुष्कळ प्रकार आहेत. शास्त्रकारांनी, महात्म्यांनी पुष्कळ सांगून ठेवलं आहे. त्याचं जेवढं चिंतन होईल तेवढं करायचं. परमात्म्याच्या ठिकाणी मन स्थिर करणं आणि संसारातून मन बाजूला काढणं ही दोनच साधनं आहेत. या दोन साधनांनीच सगळं कल्याण होत असतं. ही दोन साधनं उत्पन्न होण्याकरता मात्र सहाय्याची जरूरी आहे. सद्‌गुरुंचं सहाय्य पाहिजे. ईश्वरभक्ती, गुरुभक्ती म्हणून पाहिजे. वैदिक धर्मामध्ये याला फार महत्व दिलं गेलं आहे. सर्वांना भक्तीचा अधिकार आहे. त्यात अधिकार अनधिकार हा विचार नाही. ईश्वराची उपासना, सद्‌गुरूंची उपासना आबाल वृध्दांना सगळ्यांना करता येते.

पण आत्मकल्याण करून घ्यायचंय इकडे दृष्टी पाहिजे. अहंकार त्याच्याबद्दल उत्पन्न होऊन उपयोग नाही. अहंकार मनामध्ये उत्पन्न झाला की उपासकांमध्येसुध्दा भांडणं, कलह, द्वेष उत्पन्न होतो. म्हणून वैयक्तिक आपलं कल्याण झालं पाहिजे. हे आपलं पक्क ध्येय ठरवून त्याप्रमाणे प्रयत्न सुरू करावा. महात्मे ईश्वराच्या प्रेरणेने कार्य करताहेत. कुठे कोणचे महात्मे कार्य करताहेत आपल्याला माहीत पण नाही. काय कार्य चाललंय, आपल्याला काही ते समजून येत नाही. पण जग ज्याने निर्माण केलं त्याला जगाची काळजी असणार ना ! आपण अनेक व्याख्याने, सभा संमेलने करतो पण त्याचा उपयोग काही होत नाही. सुधारणा होत नाही.

त्याकरता जगाला निर्माण करणारा जो आहे तो खरा मालक आहे. बंगला ज्याने बांधला त्याच्या डागडूजीकडे लक्ष देणं त्याला भागच आहे ना ! त्याप्रमाणे ईश्वराचे लक्ष असतं. त्याच्या आज्ञेप्रमाणे आपण वागण्याचा प्रयत्न करायचा आहे. त्याच्या प्रेरणेप्रमाणे कार्य करणाऱ्या महात्म्यांवर विश्वास ठेवून, ते ज्या मार्गाने गेले तो मार्ग आपल्याला मिळावा अशी ईश्वराजवळ प्रार्थना करायचीये.

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।